अकोला । शनिवार
दि. ७ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ९७
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

आज बकरी ईद

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

## थोडक्यात

### मोदींना सरेंडरची सवय - राहुल गांधी



**नालंदा :** शुक्रवारी बिहारच्या राजगीरमध्ये राहुल गांधी म्हणाले, मोदींना सरेंडरची सवय आहे. ट्रम्प यांनी ११ वेळा जाहीरपणे सांगितले की त्यांनी मोदींना शरणागती पत्करायला लावली. पंतप्रधान काहीही बोलू शकले नाहीत. ट्रम्प खोटे बोलत आहेत असे त्यांनी का म्हटले नाही?. ते इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये अत्यंत मागासलेल्या समाजाला संबोधित करत होते. त्यांच्या ३० मिनिटांच्या भाषणात ते पुढे म्हणाले, मोदीजी प्रत्येक भाषणात म्हणायचे की मी ओबीसी आहे. जातीच्या जनगणनेबद्दल बोलल्यानंतर ते म्हणतात की भारतात कोणतीही जात नाही. जर जात नाही, तर तुम्ही ओबीसी कसे झालात?

### राजकीय एकता कायम राहिली पाहिजे - मोहन भागवत



**नागपूर :** नागपूरमधील कामगार विकास कार्यक्रमानिमित्त पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, पहलगाम हल्ल्यानंतर दिसणारी राजकीय एकता कायम राहिली पाहिजे. भागवत म्हणाले, पहलगाम हल्ल्यामुळे संपूर्ण देश दुःखी आणि संतप्त होता. लोकांना असे वाटत होते की दोषींना शिक्षा व्हावी आणि त्यांच्यावर कारवाई व्हावी. आपल्या सैन्याने शौर्य दाखवले आणि सरकारनेही कठोर कारवाई केली. भागवत म्हणाले, भारताला शक्तिशाली होण्याशिवाय पर्याय नाही. आपण आपल्या सर्व सीमेवर वाईट शक्तींचा प्रभाव पाहत आहोत. भागवत यांनी हिंदू समाजाला एकत्र येऊन भारतीय सैन्याला मजबूत बनवण्याचे आवाहन केले, जेणेकरून अनेक शक्ती एकत्र आल्या तरी ते त्यांचा पराभव करू शकणार नाहीत.

# जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन!

## स्वर्गाला भारताशी जोडण्याचे १३० वर्षांचे स्वप्न पूर्ण

**जम्मू-काश्मीर, दि. ६** वृत्तसंस्था





जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीवर जगातील सर्वात उंच रेल्वे पूल तयार झाला आहे. या पुलामुळे काश्मीर खोऱ्याला देशाच्या इतर भागांशी जोडले जाणार आहे. १३० वर्षांपासूनचे स्वप्न आता पूर्ण झाले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कटरा येथून वंदे भारत ट्रेनला हिरवा कंदील दाखवला. २७२ किमी लांबीचा उधमपूर-कटरा-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे मार्ग देशाला समर्पित केला. चिनाब पुलाच्या निर्मितीमध्ये अनेक अडचणी आल्या, तरी २२ वर्षांच्या अथक परिश्रमानंतर हे स्वप्न साकार झाले आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जम्मू आणि श्रीनगर रेल्वे मार्गावर बनलेल्या चिनाब ब्रिजला एक इंजिनीअरिंग मार्बल म्हटले आहे. या पुलाच्या वैशिष्ट्यांबद्दल बोलताना ते म्हणाले की, याचे डिझाइन खूप किचकट आहे आणि त्याचे फाउंडेशन अर्ध्या फुटबॉल मैदानाएवढे आहे आणि त्यात ३०,००० टन स्टील लागले आहे. तसेच, ते म्हणाले की हा जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज आहे.

काश्मीरच्या विकासाची गाथा लिहिणाऱ्या या पुलावरून आजपासून रेल्वे सेवा सुरू झा ली आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा भाग असलेला हा चिनाब पूल दोन टोके कौडी आणि बक्कल गावाला जोडतो. हा पूल बनवण्याचे काम एफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ने केले आहे. या प्रकल्पात व्हीएसएल इंडिया आणि दक्षिण कोरियाची अल्ट्रा कन्स्ट्रक्शन अँड इंजिनीअरिंग कंपनी (पान २ वर)

# रिझर्व्ह बँकेची रेपो दरात ५० बेसिस पॉइंट्सची कपात!

* गृहकर्जावरील व्याजात मोठी बचत
* कोट्यवधी भारतीयांना मोठा दिलासा

**मुंबई, दि. ६** वृत्तसंस्था




रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने एक मोठा निर्णय घेतला आहे. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तिसऱ्यांदा रेपो दरात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवारी रिझर्व्ह बँके गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, चलनविषयक धोरण समिती ने व्याजदरात ५० बेसिस पॉइंट्सची कपात करण्यास मंजूर दिली आहे. त्यानंतर आता प्रमुख व्याजदर ५.५ टक्क्यांवर आला असून केंद्रीय बँकेच्या या निर्णयामुळे कर्जाचा भरणाऱ्या कर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रिझर्व्ह बँकेने तिसऱ्यांदा लाखो कर्जदारांना तिसऱ्यांदा व्याजदर कपातीची भेट दिली पण यावेळी ने जंबो कपात जाहीर केली. आरबीआयने याआधी फेब्रुवारी आणि एप्रिल २०२५ मध्ये रेपो दरात एकूण ५० बेसिस पॉइंट्सची कपात केली आहे. आणि सध्याच्या ५० बेसिस पॉइंट्सच्या कपातीसह २०२५ च्या पहिल्या सहामाहीत रेपो दरात एकूण १०० बेसिस पॉइंट्सची घट झाली आहे.

५० वर्षांच्या कालावधीसाठी ५० लाख रुपयांच्या गृहकर्जावर सुमारे ३,१६४ रुपयांनी कमी होईल तर १ कोटी आणि १.५ कोटी रुपयांच्या कर्जाचा मासिक हप्ता अनुक्रमे अंदाजे ६,३२९ रुपये आणि ९,४९३ रुपयांनी कमी होऊ शकतो. ही बचत मोठी नसली तरी यामुळे परवडणारी क्षमता, विशेषतः उच्च-किमतीच्या गृहकर्ज बाजारात सुधारते. (पान २ वर)

# माझा राजा आज छत्रपती शिवाजी महाराज झाला!

## रायगडावर डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा

**महाड, दि. ६** वृत्तसंस्था



६ जून १६७४ ते ६ जून २०२५ म्हणजे तब्बल ३५१ वर्षांचा कालावधी. याच दिवशी स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज छत्रपती झाले होते. याच दिवशी किल्ले रायगडाने शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा अनुभवला होता. याची प्रचिती आजही येते. शुक्रवारी पुन्हा एकदा जय शिवराय, जय शिवाजी जय भवानी अशा घोषणांनी दुर्गराज रायगड दुमदुमून गेला. राज्यातील तसेच देशातील कानाकोपऱ्यातून आलेल्या शिवप्रेमींना पुन्हा शिवराज्याभिषेक सोहळा याचि देही याचि डोळा पाहण्याची अपूर्व संधी मिळाली.

शिवछत्रपतींचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळा किल्ले रायगडावर शुक्रवारी (६ जून) अत्यंत उल्हासात साजरा झाला. पावसाळ्यातील आल्हाददायी वातावरण, अशातच ढोल-ताशांचा गजर आणि शिवकालीन वेशभूषेत आलेले शिवभक्त यामुळे रायगडावर जणू शिवकाळ अवतरला होता. दोन दिवसांपासून किल्ले रायगडावर पारंपरिक मर्दानी खेळ, पोवाडे, जागरण, गोंधळ आणि ढोल ताशे नगारे यांच्या गजर सुरू होता. श्री शिवराज्याभिषेक सोहळा समिती अनेक वर्षांपासून रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक दिनोत्सव समितीच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करत आहे. यंदाही समितीने अत्यंत नियोजनबद्ध असे दिमाखदार सोहळ्याचे आयोजन केले. राज सदरेवर शिवराज्याभिषेक सोहळ्याला सुरुवात झाल्यानंतर लाखो शिवभक्तांनी शिवरायांच्या नामाचा एकच जल्लोष केला. शिवराज्याभिषेक गीताने या सोहळ्याची सुरुवात झाली. यावेळी संभाजीराजे छत्रपती आणि त्यांचे पुत्र शहाजीराजे यांनी विधिवत पूजा केली. तसेच महाराष्ट्रातील विविध नद्यांच्या जलाने शिवप्रतिमेवर जलाभिषेक करण्यात आला. राज सदरेवरील (पान २ वर)

### कोरोना रुग्णांची संख्या ५३ पट वाढली

**नवी दिल्ली :** देशात कोरोनाव्हायरसचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, गेल्या २० दिवसांत रुग्णांची संख्या ५३ पट वाढली आहे. १६ मे रोजी देशभरात कोविडचे ९३ सक्रिय रुग्ण होते, ज्यांची संख्या आता ४८६६ वर पोहोचली आहे. देशातील २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कोरोना पसरला आहे. दररोज ५०० हून अधिक रुग्ण वाढत आहेत. केरळमध्ये सर्वाधिक १४८७ रुग्ण आहेत. त्यानंतर दिल्लीत ५६२, पश्चिम बंगालमध्ये ५३८, महाराष्ट्रात ५२६ आणि गुजरातमध्ये ५०८ सक्रिय रुग्ण आहेत. जानेवारीपासून कोरोनाच्या नवीन प्रकारांमुळे ५२ मृत्यू झाले आहेत. त्यापैकी १५ दिवसांत ५० मृत्यू झाले आहेत. गुरुवारी दिल्लीत कोविडमुळे आणखी दोन मृत्यूंची नोंद झाली.

# अभिनेता दिनो मोरियाच्या घरावर ईडीकडून छापे!

## मिठी नदी घोटाळा प्रकरण

**मुंबई, दि. ६** वृत्तसंस्था



मिठी नदी गाळ उपसा घोटाळा प्रकरणात बॉलिवूड अभिनेता दिनो मोरिया याच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. याच प्रकरणात आता ईडीनं मोठा कारवाई केली आहे. आज सकाळी दिनो मोरियाच्या घरावर ईडीनं छापा टाकाला आहे. त्यामुळं आता दिनो मोरियाचा पाय आणखी खोलात जात असल्याचं दिसत आहे.

दिनो आणि त्याचा भाऊ सँटिनो यांची दोन वेळा आर्थिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकानं चौकशी केली आहे. या वेळी दोघांनी काही कागदपत्र पोलिसांकडं सादर केल्याचं म्हटले जात आहे. मध्यस्थ आणि कंत्राटदारांना गाळ उपशाचे कंत्राट मिळविण्यासाठी मदत केल्याचा संशय दोघांवर आहे. मिठी नदीतील गाळ (पान २ वर)

# आरसीबी अधिकाऱ्याला विमानतळावरून अटक

**बंगळुरू, दि. ६** वृत्तसंस्था



बेंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिसांनी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू (आरसीबी)चे मार्केटिंग प्रमुख निखिल सोसाळे याच्यासह अन्य तिघांनाही अटक केली आहे. ते इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए नेटवर्क्सशी संबंधित आहेत. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) चे सचिव शंकर आणि कोषाध्यक्ष जयराम यांच्याही घरी पोलिसांनी धडक दिली. मात्र ते घरी नव्हते. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिस आयुक्तांसह ८ अधिकारी निलंबित करण्यात आले आहेत.

निखिल सोसाळे हे विमानाने मुंबईला जाण्याच्या तयारीत होते. त्यांना बंगळूरु विमानतळावर अटक करण्यात आली. त्याची चौकशी सुरू आहे. डीएनएचे इतर ३ कर्मचारी किरण, सुमंत आणि सुनील मॅथ्यू यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे आणि त्यांना (पान २ वर)

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण; मास्टरमाइंडला अटक!

**जालंधर, दि. ६** वृत्तसंस्था



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील सूत्रधार झीशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडातील सरे पोलिसांनी अटक केली आहे. ही अटक कोणत्या प्रकरणात करण्यात आली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

१२ ऑक्टोबर २०२४ च्या रात्री बाबा सिद्दीकींची त्यांचा मुलगा झिशान सिद्दीकीच्या ऑफिसबाहेर गोळ्या घालून हत्या करण्यात आली. गँगस्टर लॉरेन्स गँगने या हत्येची जबाबदारी घेतली. टोळीने दावा केला होता की, बाबा सिद्दीकींचा बॉलीवूड स्टार सलमान खानशी जवळचा संबंध होता. म्हणूनच त्यांची हत्या करण्यात आली. लॉरेन्स गँगचे सलमान खानशी जुने वैर आहे. पोलिस तपासात असे दिसून आले, की सिद्दीकींच्या हत्येमागील सूत्रधार जालंधरचा रहिवासी झीशान अख्तर होता. हत्येनंतर तो परदेशात पळून गेला. त्यानंतर असा दावा करण्यात आला की पाकिस्तानी डॉन (पान २ वर)

## प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या., कारंजा (लाड)

र.नं. ७६०, पुंजाणी कॉम्प्लेक्स, मेन रोड, कारंजा लाड, जि. वाशिम. फोन : ०७२५६ -२२४९८३

आपणा सर्वांची आस्था प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था
प्रशिक फार्मर प्रोड्युसर कंपनी आपल्या सेवेत

### सन २०२४-२५ संस्थेची स्थिती

| | |
|---|---|
| सभासद | ३२७४ |
| निधी | ५०५४७९३७ |
| नफा | २५१५४८२२ |
| भागभांडवल | १४९६७५७३ |
| कर्ज | ५०३९७७४२५ |
| ऑडीट वर्ग | अ |
| ठेवी | ६०४६६६६९६ |
| गुंतवणूक | ३०११२५९१२ |
| एन.पी.ए. | ० % |

संस्थेचे सामाजिक कार्य-कोविड-१९ मध्ये पोलिस दलाचा भेटवस्तू देऊन सत्कार, गोरगरीब झोपडपट्टीतील लोकांना धान्य वाटप मुख्यमंत्री निधी- आर्थिक सहाय्य

### आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वप्नपूर्ती कर्ज योजना

लखपती कर्ज योजना
वाहन कर्ज
ठेव तारण कर्ज
सोने तारण कर्ज
घर दुरूस्ती कर्ज
अल्प मुदती कर्ज
दीर्घ मुदती कर्ज
कॅश क्रेडीट
सभासदांसाठी मालतारण कर्ज योजना

### ठेवीवरील व्याजदर

| | |
|---|---|
| ४५ ते ९० दिवस | ७.00% |
| १८० ते ३६५ दिवस | ८.00% |
| २ वर्षापेक्षा जास्त ३ वर्षापर्यंत | ९.५0% |
| ९१ ते १७९ दिवस | ७.५0% |
| १ वर्षापेक्षा जास्त २ वर्षापर्यंत | ९.00% |
| ३ वर्षांच्या वर ६६ महिन्यांपर्यंत | १0.00% |
| मासिक ठेवीवर (RD) | ९.00% |
| बचत ठेवीवर व्याज | ४.00% |

### सहकार्यातून विकासाकडे

* संगणीकृत शाखा
* इलेक्ट्रीक भरणा स्वीकृती केंद्र
* ATM सुविधा, QR कोड सुविधा
* RTGS, NEFT, SMS सुविधा
* ८७ महिन्यात दामदुप्पट
* १२३ महिन्यात दामतिप्पट
* ज्येष्ठ नागरिकांसाठी १% जास्त व्याजदर
* संस्थेचे स्वत:चे मालतारण गोडावून

ॲड. रवींद्र रामटेके
अध्यक्ष

आकाश भा. कऱ्हे
उपाध्यक्ष

तथा समस्त
संचालक मंडळ

# समलैंगिक जोडपे कुटुंब बनवू शकतात : मद्रास हायकोर्ट

## महिलांना जोडीदारासोबत राहण्याची परवानगी



**चेन्नई, दि. ६** वृत्तसंस्था

**मद्रास उच्च न्यायालयाने दोन महिलांना कुटुंब म्हणून एकत्र राहण्याची परवानगी दिली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की लग्न हा कुटुंब तयार करण्याचा एकमेव मार्ग नाही, समलैंगिक जोडपे कुटुंब तयार करू शकतात.**

न्यायमूर्ती जी आर स्वामीनाथन आणि व्ही लक्ष्मीनारायणन यांच्या खंडपीठासमोर एका महिलेने दाखल केलेल्या रिट याचिकेवर सुनावणी सुरू होती. महिलेने म्हटले होते की तिच्या जोडीदाराला तिच्या कुटुंबातील सदस्य जबरदस्तीने घरात डांबून ठेवत आहेत आणि तिला भेटू देत नाहीत. न्यायालयाने म्हटले, असे दिसते की महिलेला जबरदस्तीने तिच्या घरी नेऊन मारहाण करण्यात आली. तिने आम्हाला सांगितले, की तिच्या कुटुंबातील सदस्यांनी तिला काही विधी करण्यास भाग पाडले जेणेकरून ती सामान्य होईल. या वर्षी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध १३ पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. न्यायालयाने या याचिका फेटाळून लावल्या होत्या. न्यायालयाने म्हटले होते की, रेकॉर्डमध्ये कोणतीही त्रुटी नाही आणि निर्णयात व्यक्त केलेले विचार कायद्यानुसार आहेत आणि यामध्ये कोणताही हस्तक्षेप समर्थनीय नाही. २०२३ मध्ये माजी मुख्य न्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती हिमा कोहली, न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती रवींद्र भट आणि न्यायमूर्ती पीएस नरसिंह यांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायमूर्ती हिमा कोहली वगळता मुख्य न्यायाधीश चंद्रचूड, न्यायमूर्ती कौल, न्यायमूर्ती भट आणि न्यायमूर्ती नरसिंह यांनी आलटून पालटून निकाल दिला. सरन्यायाधीशांनी प्रथम सांगितले, की या प्रकरणात ४ निकाल आहेत. एक निकाल माझा, एक न्यायमूर्ती कौल यांचा, एक न्यायमूर्ती भट्ट यांचा आणि एक न्यायमूर्ती नरसिंह यांचा आहे. यामध्ये, आपल्याला किती पुढे जायचे आहे याबद्दल काही प्रमाणात सहमती आणि एका प्रमाणात असहमती आहे.

### न्यायालय फक्त कायद्याचा अर्थ लावू शकते



» १७ ऑक्टोबर २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यास नकार दिला. ५ न्यायाधीशांच्या घटनापीठाने म्हटले होते, की न्यायालय विशेष विवाह कायद्यात बदल करू शकत नाही. न्यायालय फक्त कायद्याचा अर्थ लावू शकते आणि त्याची अंमलबजावणी करू शकते. माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले होते, की विशेष विवाह कायद्यातील तरतुदी बदलण्याची गरज आहे की नाही हे ठरवणे संसदेचे काम आहे.

# पान 1 वरून...

## जगातील सर्वात उंच रेल्वे...

देखील सामील आहे. कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने उत्तर रेल्वेच्या वतीने या संपूर्ण प्रकल्पाची देखरेख केली. चिनाब पुलाचे डिझाइन फिनलंडच्या डब्ल्यूएसपी ग्रुप आणि जर्मनीच्या लिओनहार्ड्ट एंड्रा एंड पार्टनरने पूर्ण केले. या पुलाला ब्लास्ट प्रूफ बनवण्याचे श्रेय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेला जाते. चिनाब नदीच्या तळापासून ३५९ मीटर उंच असलेला हा रेल्वे पूल जगातील सर्वात उंच रेल्वे पूल आहे. या पुलामुळे काश्मीरच्या बर्फाळ वाऱ्यांचा आनंद घेता येणार आहे. चिनाब पूल प्रकल्पाला २००३ मध्ये मंजुरी मिळाली आणि कामाला सुरुवात झाली. अनेक अडचणींमुळे २००९ पर्यंत केवळ मूलभूत कामेच पूर्ण झाली. २०१७ मध्ये ३२०० कर्मचारी आणि अभियंत्यांनी काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. २०२१ मध्ये पुलाच्या आर्कचे काम सुरू झाले आणि रूळ टाकण्यात आले. सुमारे २२ वर्षांनंतर, आज ६ जून रोजी या पुलावरून रेल्वेगाडी धावली आहे.

उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक २७२ किमीचा आहे. या रेल्वे मार्गावर ३६ बोगदे आहेत, ज्यांची लांबी ११९ किमी आहे. रेल्वे मार्गावर ९४३ रेल्वे पूल आहेत. हा पूल पॅरिसच्या एफिल टॉवरपेक्षा ३५ मीटर जास्त उंच आहे. हा पूल -१० डिग्री सेल्सियस ते ४० डिग्री सेल्सियस पर्यंतचे तापमान सहन करू शकतो. या पुलाची क्षमता १२० वर्षांपर्यंत आहे. ४० किलोपर्यंतच्या स्फोटकांचाही या पुलावर काही परिणाम होणार नाही. ८.० तीव्रतेच्या भूकंपाने देखील या पुलाला कोणताही धोका होणार नाही. २६० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वादळ देखील या पुलाचे नुकसान करू शकणार नाही. पुलाचा प्रत्येक भाग ६३ मिलीमीटरच्या ब्लास्ट-प्रूफ स्टीलने बनवलेला आहे.

## रिझर्व्ह बँकेची रेपो दरात...

आता रिझर्व्ह बँकेने रेपो रेट कपात केल्यामुळे लोकांच्या गृहकर्जाचा कमी होईलच पण, नवीन कर्ज घेणाऱ्यांना कमी व्याजावर कर्ज मिळण्याचा रस्ता मोकळा झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार रेपो दर कपातीनंतर बँका सहसा कर्जाचा कालावधी समायोजित करतात. बहुतेक बँका काही दिवसांत ग्राहकांना सूचनांद्वारे रेपो दराच्या फायद्यांची माहिती देतात तर, अनेक बँका फ्लोटिंग-रेट कर्ज देताना कर्जदारांना कालावधी किंवा समायोजित करायचा आहे का असे देखील विचारतात. कर्ज मंजुरीनंतर तुम्हाला या अटी बदलायच्या असतील तर मदतीसाठी तुमच्या बँकेशी किंवा शी संपर्क साधू शकता.

## माझा राजा आज छत्रपती...

उत्सव मूर्तीस अभिषेक करण्यात आला. येथील छत्रपती शिवरायांच्या सिंहासनारुढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. यानंतर संभाजीराजे छत्रपती आणि रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय मानवंदना देण्यात आली. शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने किल्ल्यावर प्रचंड जल्लोषाचे वातावरण होते. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीकडून सोहळ्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले होते. तर विविध शासकीय विभाग आणि जिल्हा प्रशासनाने अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, सावलीसाठी मंडप, मोफत बससेवा आदी सुविधा शिवप्रेमींना पुरवल्या.

शिवछत्रपतींच्या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न होत नसल्याची खंत व्यक्त करत हे गडकिल्ले जतन करण्यासाठी आमच्या ताब्यात द्यावेत, असे आवाहन संभाजीराजे छत्रपती यांनी यावेळी सरकारला केले. तसेच सरकारने हा सोहळा राष्ट्रीय दिन म्हणून साजरा केला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील आवर्जून शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी उपस्थित राहिले होते. शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने महाराजांचे आशीर्वाद घेतल्याचे सांगून मराठा आरक्षणाचा लढा आपण कायम लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## अभिनेता दिनो मोरियाच्या...

उपशामध्ये १३०० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार झाल्याचा आरोप लोकप्रतिनिधींनी केल्यानंतर चौकशीसाठी आर्थिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करण्यात आलं होतं. उपायुक्त संग्रामसिंह निशाणदार यांच्या पथकानं प्राथमिक चौकशी केली आणि त्यामध्ये जी माहिती आणि पुरावे आढळले त्यावरून आझाद मैदान पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. या तक्रारीवरून पोलिसांनी सहायक अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी प्रशांत रामुगडे, उपप्रमुख अभियंता गणेश बेंद्रे, उप प्रमुख अभियंता तायशेट्टे हे पालिका अधिकारी, अ‍ॅक्युट डिझाइन्स, कैलास कन्स्ट्रक्शन कंपनी, एन. ए. कन्स्ट्रक्शन, निखिल कन्स्ट्रक्शन कंपनी, जे. आर. एस इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदार कंपन्या, जय जोशी, केतन कदम, भूपेंद्र पुरोहित हे मध्यस्थ आणि मॅटप्रॉप टेक्निकल सर्व्हिसेस कंपनीचे दीपक मोहन, किशोर मेनन यांच्यावर गुन्हा दाखल केला. मध्यस्थ केतन कदम आणि जय जोशी या प्रकरणात अटकेत आहेत. अटकेत असलेल्या दोन मध्यस्थांपैकी एकाला कंत्राट मिळवून देण्यासाठी मदत केल्याचा दिनो मोरियो आणि त्याच्या भावावर आरोप आहे. या सगळ्या प्रकरणात दिनो मोरियानं मौन बाळगलं आहे. पोलिस अधिकाऱ्यांना तपासात सहकार्य करणार असल्याचं त्यानं म्हटलं. केतन कदम आणि जय जोशी यांच्या कॉल रेकॉर्ड्सचा तपास सुरू असतानाच त्या दोघांनी अनेकदा दिनो मोरियाशी संपर्क केल्याचं समोर आलं आणि पोलिसांनी तपासाची दिशा बदलली.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण...

शहजाद भट्टीने त्याला पळून जाण्यास मदत केली होती. १२ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९:३० वाजता, महाराष्ट्र सरकारचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची मुंबईतील वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलवर हत्या करण्यात आली. बाबा सिद्दीकी त्यांचा मुलगा झिशानच्या ऑफिसमधून बाहेर निघताच त्यांच्यावर ६ गोळ्या झाडण्यात आल्या. दोन गोळ्या सिद्दीकींच्या पोटात आणि एक छातीवर लागली. त्यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे रात्री ११.२७ वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी उत्तर प्रदेशातील बहराइच येथून हरीश कुमार, कैथल (हरियाणा) येथून गुरमेल बलजित सिंग, बहराइच (उत्तर प्रदेश) येथून धर्मराज कश्यप आणि पुणे (महाराष्ट्र) येथून प्रवीण लोणकर यांना अटक केली. लॉरेन्स टोळीने या हत्येची जबाबदारी घेतली. बाबा सिद्दीकी हे रिअल इस्टेट व्यवसायातही सहभागी होते. तथापि, ते राजकारण आणि व्यवसायापेक्षा बॉलिवूडमधील त्यांच्या संबंधांसाठी अधिक प्रसिद्ध होते.

## आरसीबी अधिकाऱ्याला...

क्यूबन पार्क पोलिस ठाण्यात आणले आहे, जिथे त्यांची चौकशी सुरू आहे. चेंगराचेंगरीत निष्काळजीपणाचे कारण, नियम, कार्यक्रमाची परवानगी आणि सुरक्षा मानकांशी संबंधित गोष्टींकडे दुर्लक्ष याबाबत पोलीस तपास करत आहेत. पोलिस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी सांगितले की, हे प्रकरण गुन्हे तपास विभागाकडे सोपवण्यात येणार आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत १० जून रोजी पुढील सुनावणीसाठी सरकारला अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. मुख्यमंत्री सिद्धारमैया यांनी बेंगलुरूचे पोलिस आयुक्त बी. दयानंद, केंद्रीय विभागाचे डीसीपी शेखर एच. टेककन्नावर, स्टेडियम प्रभारी अतिरिक्त पोलिस आयुक्त विकास कुमार, सहायक पोलिस आयुक्त सी. बालकृष्ण आणि कब्बन पार्क पोलिस ठाण्याचे निरीक्षक एके गिरीश यांना तात्काळ निलंबित केले. शुक्रवारी, मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव के. गोविंदराज यांना बडतर्फ करण्यात आले, तसेच माहिती विभागाचे प्रमुख हेमंत निंबालकर यांची बदली करण्यात आली.

# कृषी विद्यापीठात वृक्ष लागवडीने साजरा झाला जागतिक पर्यावरण दिन!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी या संकल्पनेने सेवारत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने राज्य तथा राष्ट्रीय स्तरावर अनेकानेक कालसुसंगत पीकवाण, शेतीपयोगी यंत्रे -अवजारे तथा तंत्रज्ञान शिफारसी देत आत्मनिर्भर कृषी क्षेत्रासाठी आपली कटिबद्धता सिद्ध केली आहे. कृषी विद्यापीठाचे मुख्यालय अकोला येथे असून विद्यापीठाचे प्रक्षेत्रावर कृषी संशोधनासह नानाविध वनसंपदा तथा पशुपक्षी संपदा राष्ट्रीय पातळीवर दखलपात्र ठरत आहे. अकोले करांसाठी तर विद्यापीठ प्रक्षेत्र निरोगी सुदृढ आरोग्यदायी शरीरासाठी ऑक्सिजन पार्क म्हणून सुपरिचित आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्ताने आज विद्यापीठ प्रक्षेत्रावर विविध प्रजातींच्या १७०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला तथा राष्ट्रीय छात्र सेनेच्या ११ महाराष्ट्र बटालियन अकोला यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित या महत्त्वाकांक्षी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे सह ११ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग



ऑफिसर कर्नल व्ही एन शुक्ला, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे,सहयोगी अधिष्ठाता डॉ. ययाति तायडे, डॉ.शैलेश हरणे, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापुरचे मुख्य बीजोत्पादन अधिकारी डॉ. शिवाजी नागपुरे, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, वनविद्या महाविद्यालयाचे प्रा. डॉ. हर्षवर्धन देशमुख, राधादेवी गोयंका महाविद्यालयाच्या डॉ. श्वेता मेंढे, विद्यापीठाचे एनसीसी ऑफिसर डॉ. दारासिंग राठोड, श्रीमती उज्वला शिरसाट यांचे सह राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स तथा विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. जागतिक हवामान बदलाच्या या कालखंडात भूतलावरील सर्वांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे काळाची गरज असल्याचे सांगताना कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी निसर्गचक्र सुरळीत ठेवण्यासाठी वृक्ष लागवडीसह वृक्ष संवर्धनाची महत्त्व विषद केले व कृषी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील निसर्गराजीचे संवर्धन करण्यासाठी एकात्मिक प्रयत्नांची गरज प्रतिपादित केली. या वर्षाच्या ५ जून २०२५ जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना प्लास्टिकमुक्त वसुंधरा हि असून, एनसीसी च्या मुख्यालयातून प्राप्त परिपत्रकानुसार एक कॅडेड एक वृक्ष या संकल्पनेनुसार वृक्ष लागवडीच्या मोहिमेला विद्यापीठात एनसीसी विभागाद्वारे सुरुवात करण्यात आले. या प्रसंगी कमांडिंग ऑफिसर कर्नल व्ही एन शुक्ला यांनी उपस्थिताना संबोधन केले. एनसीसी बटालियन चे सुभेदार मेजर कमल सिंग, कंपनी हवालदार विजय वानखडे, जेसिओ देवराज व बरेच अधिकारी कर्मचारी सहभाग नोंदविला. एनसीसी छात्र सिनिओर अंडर ऑफिसर अथर्व नानोटे, आदित्य, व इतर विद्यार्थीच्या पुठाकाराने व श्रीमती लेप्ट. उज्वला शिरसाट यांच्या आभार प्रदशान्रे कार्याकर्माची सांगता झाली.

# चाइल्ड हेल्पलाइनचा पुढाकार : तेल्हाऱ्यात बालविवाह थांबविण्यात यश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :**महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षा व्दारे संचालीत चाईल्ड हेल्पलाईन अकोलाच्या पुढाकाराने तेल्हारा तालुक्यातील एका गावात होणारा बालविवाह थांबविण्यात यश आले आहे. चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या क्रमांकावर तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाया एका गावात १६ वर्षीय बालीकेचा विवाह एका २७ वर्षांच्या युवकांशी होणार असल्याची माहीती प्राप्त झाली. सदर माहीती तात्काह चाईल्ड हेल्पलाईन समन्वयीका हर्षाली गजभीये यांनी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अकोला, बालकल्याण समिती अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच जिल्हाबाल संरक्षण अधिकारी यांनी दिली तसेच हिवरखेड पोलीस स्टेशनचे पी.एस.आय श्री. रामचंद्र जाधव यांना त्या बालविवाहाबाबत माहीती देण्यात आली त्यानुसार हिवरखेड पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी पोहचले असता विवाह नसुन भंडारा असल्याचे उपस्थीतांनी सांगीतले तेव्हा चाईल्ड हेल्यलाईनची चमु सुध्दा त्या ठिकाणी पोहचली व बालीका अल्पवयीन असल्याचे निर्देशनास आले. नवरदेवाची वरात थांबविण्यात आली बालीकेचे आई वडील, वरा कडील मंडळी यांची हिवरखेडपोलीस स्टेशन येथे बैठक घेण्यात आली व त्यांना बालविवाह प्रतिबंध अधिनीयम २००६ बाबत माहीती देण्यात आली मुलींचे वय १८ वर्ष पुर्ण व मुलांचे वय २१ वर्ष पुर्ण असणे विवाहा करीता आवश्यकआहे या क्या पेक्षा कमी वयाचे विवाह होत असल्यास तो बालविवाह होतो बालविवाहा झाल्यास त्यावर वधुचे आई वडील, विवाह समारंभात सहभागी मंडळी, विवाह सोहळा लावणारे, वाजंत्री, पत्रिका छापणारे या सर्वांवर बालविवाह अधिनीयम २००६ अंतर्गत गुन्हे दाखल होतात या बाबत समुपदेशनकरण्यात आले व बालीकेस बालकल्याण समिती समोर सादर करणे बाबत सुचना पत्र देण्यात आले.बालकल्याण समिती समक्ष बालीका व तीचे आई वडील सादर झाले नंतर वयाचे १८ वर्ष पुर्ण झाल्या शिवाय करणार नसल्याचे हमीपत्र लिहून घेण्यात आले व गावचे ग्रामसेवक, सरपंच, अंगणवाडी सेवीका यांची साक्ष नोंदवण्यात आली गावचे सदरची कार्यवाही ही जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजु लाडुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# चित्रकला, निबंध अन् पथनाट्याद्वारे विद्युत सुरक्षा जनजागृती

## विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांचाही प्रभावी सहभाग

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** महावितरण प्रशासनाकडून सध्या विद्युत सुरक्षा सप्ताह सुरु आहे. या अंतर्गत अकोला जिल्ह्यात चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा ,पथनाट्य आदी विविध कार्यक्रम पार पडले. विशेष म्हणजे पथनाट्यासाठी बाहेरील कलाकारांना न बोलवता महावितरणच्याच कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने पथनाट्याचे सादरीकरण करत गर्दीच्या ठिकाणी पदनाट्याचे सादरीकरण करून वीज सुरक्षेबाबत माहिती दिली. मागील काही वर्षात महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे अपघात कमी करण्याला महावितरणला यश आले आहे.परंतू जनतेचे तसेच विशेषता लहान मुलांचे विद्युत अपघात होऊ नये यासाठी महावितरण कंपनिच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी चित्रकला स्पर्धा,पथनाट्य



आणि दहा उपविभागात बाजाराच्या तसेच गर्दीच्या परिसरात विद्युत सुरक्षेचा जागर करण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता अजितपालसिंह दिनोरे यांच्या मार्गदर्शनात आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रभाकर दहापुते, सुशिल जयस्वाल,अजयकुमार कराळे साहेब, रमेश थोरात, यांच्या सक्रीय सहभागाने यंत्रचालक संजय पूरकर, प्रविण कोगदे, रोशन समदूरे, नितीन कारंजकर या महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी कौलखेड मधील गजानन महाराज मंदिर समोर , नवीन बस स्टॉप अकोला आणि गर्दीच्या ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण करत विद्युत अपघात,त्याचे परिणाम आणि निर्माण होणारी कौटूंबिक परिस्थितीची जाणीव करून देत वीज ग्राहकांना विद्युत सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. कार्यकारी अभियंता गोरक्षनाथ सपकाळे यांच्या मार्गदर्शनात उपकार्यकारी अभियंता बाळापूर अनिल शेगाकार,उपकार्यकारी अभियंता मुर्तीजापूर अभय कदम यांच्या पुढाकाराने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांना विद्युत अपघात कसे टाळावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच कार्यकारी अभियंता अनिल उईके यांच्या मार्गदर्शनात उपकार्यकारी अभियंता दिपक राठोड आणि राहूल डाबरे यांच्या पुढाकारातून अकोट विभागात विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत माहिती देण्यात आली.

# छावा संघटनेने समाजसेवेचा जपला शब्द !

## १०० विद्यार्थ्यांना वॉटर बॅगचे वितरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** रक्तदानासारख्या पवित्र व अत्यावश्यक उपक्रमात संपूर्ण महाराष्ट्रात '' रेकॉर्ड ब्रेक '' कामगिरी करणारी छावा संघटना समाजसेवेच्या कार्यातही आपला ठसा उमटवीत आहे. छावा चे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांच्या नेतृत्वाखाली समाजसेवेच्या कार्यासाठी छावा ची टीम सज्ज झाली आहे. या समाजसेवेच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून शिवराज्याभिषेकाच्या पूर्वसंध्येला येथून जवळच असलेल्या आळंदा गावातील १०० विद्यार्थ्यांना छावा संघटनेतर्फे उत्तम दर्जाच्या वॉटर बॅग चे वितरण करण्यात आले . येथील प्रख्यात समाजसेवक रितेश मिर्झापूरे यांच्या सहयोगातून आळंदा येथील खंडेराया मंदिराचे प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता छावा चे जिल्हा प्रमुख शंकरराव वाकोडे, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, रितेश मिर्झापुरे, अनिरुद्ध भाजीपाले, प्रमोद पाटील या कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित होते.

जय हनुमान व्यायाम शाळा आळंदा यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष दिलीप



ढोरे, उपाध्यक्ष सुनील खाडे, सचिव रमेश नागे, यांचे सह विशाल बेंद्रे, बंटी बावस्कर, सचिन खाडे, वैभव काळे, सतीश वानखडे, नंदू खाडे, आकाश खाडे, बबलू खाडे आदींचे सहकार्य लाभले. याप्रसंगी व्यायामशाळेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या विद्यार्थ्यांनी १४ मे रोजी अकोला येथे संपन्न झालेल्या छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या सोहळ्यात भाग घेऊन आपापल्या कला सादर केल्या होत्या. छावा चे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांनी सुरू केलेल्या छावा संघटनेच्या या समाजसेवेच्या उपक्रमात छावा चे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. दीपक मोरे, डॉ. श्रीराम लाहोळे, डॉ. संजय सरोदे, प्रदीप खाडे, डॉ. किरण लढा, डॉ. विनीत हिंगणकर, अरविंद कपले, डॉ. रणजीत कोरडे, डॉ. हर्षवर्धन मालोकार, डॉ. एस. एम. अग्रवाल, डॉ. उमेश गडपाल, डॉ. निलेश दायमा, योगेश गोतमारे, अमोल हिंगणे, बबलू वसु, अनिरुद्ध भाजीपाले, मनोहर मांगटे पाटील, श्याम कोल्हे, निवृत्ती वानखडे, अरविंद बाणेरकर, श्याम कुलट, प्रकाश गवळी, रणजीत ठाकरे, श्रावण लांडे, आशिष कापसे, भारत भडांगे आदी सहकार्य करीत आहेत. भविष्यातही विविध गावांमध्ये जाऊन हे समाजसेवेचे उपक्रम राबविले जातील अशी माहिती शंकरराव वाकोडे यांनी दिली आहे.

# १२ जूनला राष्ट्रवादीच्या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हा - आ. संजय खोडके



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** गुरुवार १२ जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे अकोला जिल्हा दौऱ्यावर येत आहेत त्यानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अकोला जिल्हा ग्रामीण मेळावा येथे आयोजित करण्यात आला असून या मेळाव्याला हजारोच्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच लाडक्या बहिणींनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अमरावती विभागीय समन्वयक तथा आमदार संजय खोडके यांनी आज ५ जून गुरुवारला शासकीय विश्रामगृह अकोला आयोजित नियोजन बैठकीत आव्हान केले.

यावेळी मंचकावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल दादा मिटकरी जिल्हाध्यक्ष मोहम्मद बदरुज्जमा, जि.प.च्या माजी अध्यक्षा संध्याताई वाघोडे, काशिराम साबळे, रुपाली वाकोडे, उज्वला राऊत, प्रतिभा अवचार, हरिभाऊ वाघोडे, मंजुषा देशमुख, डॉ. विशाल इंगोले, पुंडलीकराव अरबट, रवि पवार, संदीप खारोडे आदी उपस्थित होते. यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले विचार व्यक्त करून जास्तीत जास्त पदाधिकारी व कार्यकर्ते सभेला उपस्थित राहावे या संदर्भात नियोजन केले. यावेळी आ. अमोल दादा मिटकरी यांनी मा. अजित दादा खूप वर्षानंतर अकोला येथे येत असून त्यांचे विचार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांनी आपली ताकद पणाला लावावी असे आवाहन केले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष मो. बदरूजमा यांनी सर्व जिल्हाध्यक्ष, फ्रंटल,सेल चे आजी-माजी पदाधिकारी तसेच जिल्हा ग्रामीण पदाधिकाऱ्यांचा आढावा घेऊन लाडक्या बहिणीसह पदाधिकाऱ्यांनी मा.अजित दादांचे विचार ऐकण्यासाठी हजर राहावे असे आवाहन केले कार्यक्रमाचे संचालन किशोर तेलगोटे यांनी केले.

# योग वर्गातर्फे वृक्षारोपण, वृक्ष दिंडी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** ५ जुन ''जागतिक पर्यावरण दिनानिमित्त''टिळक पार्क रामदास पेठ येथे , योग वर्गातर्फे वृक्षारोपण, वृक्ष दिंडी आयोजित करण्यात आली होती. अतिशय आकर्षक अशी दिंडी होती. महिलांनी हिरव्या रंगाच्या साडया परिधान केल्या होत्या.'दिंडी मधे झाडे लावा, झाडे जगवा अशा घोषणा देण्यात आल्या''



सदर आयोजन पतंजलि योग परिवार, व निलेश देव मित्र मंडळ यांचे तर्फे करण्यात आले होते. यामध्ये पतंजलि जिल्हा प्रमुख मा.डॉ सुहास काटे,भारत स्वाभिमान जिल्हा प्रमुख मा.श्री हरीशजी माखिजा, पतंजलि योग समिति सह जिला प्रमुख श्री हरीश पारवानी, टिळक पार्क योग ग्रुप मुख्य शिक्षिका डॉ सुनिता कावळे, डॉ भोंडे, विनायक पांडे, योग ग्रुप अध्यक्ष, मीनाताई गणगणे, ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष नारायण अंधारे लोकमान्य जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष किरण चौक, सचिव श्रीकांत चाळीसगावकर यांचे मार्गदर्शनाखाली सकाळ ६ ते ७.०० या वेळेत योगासने व ७.०० वाजता वृक्ष दिंडी व त्यानंतर ७.३० वाजता वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. त्यापुर्वी निलेश देव मित्र मंडळ व धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प यांचे तर्फे निलेश देव यांनी त्यांच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सर्व योग साधक व वृक्ष प्रेमी यांना सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी,सेंद्रिय खतांच्या पिशव्या मोफत वाटप केल्या. त्यानंतर डेंग्यू प्रतिबंधासाठी डासांच्या आजारांपासून बचाव करण्यासाठी पाईप जाळी मोफत वितरण केली.श्रध्दा , विज्ञान आणि पर्यावरण यांचा त्रिवेणी संगम साधत आपण या उपक्रमातुन नदी व निसर्गाचे रक्षण करतो.आपण निर्माल्याचा योग्य उपयोग केला तर त्यामुळे पर्यावरण निश्चितच बहरेल. डॉ सुहास काटे सर यांनी सुध्दा पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले. या प्रसंगी योग साधक महिला व पुरुष, वृक्ष प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी श्रीकांत चाळीसगावकर, प्रदीप बांधवकर,किरण चौक, डॉ सुरेश राठी, सुरेश दरेकर,के एल . अप्तूरकर, अशोक राऊत,सुभाष शेकोकार, सतीश फडणीस,अजय ऊपाध्याय, उपाध्यक्ष चंद्रशेखर फुलझेले, अतुल पंचवाटकर, किशोर बांधवकर, कुलभूषण बोंबले, बिपिन सुरडकर, जगदीश अग्रवाल, श्री चोरे,यदुराज तायडे,श्रीधर देशपांडे, श्री जाधव,, डॉ ऋषिता मुनोत, , वंदनाताई चिंचोळकर, मिनाताई गणगणे , सीमा फडणवीस, मंजिरी कुळकर्णी, नेहा पांडे, रेणुका मेश्राम,,विशाखा राजे, नलिनी ताई वानखेडे, समृद्धी शिरवळकर,सौ.राठी, संगीता कुळकर्णी, सौ गाडगे, सौ परनाटे सौ.सुरडकर, शुभांगी रेलकर, सौ वैद्य,सुरेखा जाधव,कल्पना गायकवाड, प्रियंका ताठे, यामिनी उपाध्याय,ईतरही महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. निलेश देव मित्र मंडळ व धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प तर्फे दिलीप देशपांडे,जयंत सरदेशपांडे,, राजेंद्र गुन्नलवार, शशिकांत हिवरखेडकर,अजय शास्त्री, नरेंद्र परदेशी, शैलेश देव, निलेश दुधलम,सौ रश्मी देव,स्नेहा गोखले यांनी खत वितरण कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले पर्यावरण दिवस कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ सुहास काटे, डॉ सुनिता कावळे, श्रीकांत चाळीसगावकर, प्रदीप बांधवकर, श्री राऊत , किरण चौक, क्षितिजा वडी यांनी परिश्रम घेतले. शेवटी शांतीपाठ म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वच्छता अभियान, वृक्षारोपण ; वृक्ष व कापडी पिशवी वाटप



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र यांच्यावतीने जागतिक पर्यावरण दिन निमित्त विविध पर्यावरण संरक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संत गजानन महाराज पालखी मार्गाची स्वच्छता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाद्वारे करण्यात आले यावेळी गाडगेबाबा यांच्या वेशभूषेत श्री महादेवरावजी भुईभार यांनी स्वच्छते संबंधी जागृती केली यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र संचालक डॉ.संजय तिडके, विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ नितीन मोहोड, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. सचिन भुतेकर प्रा.शुभम राठोड प्रा.मयुरी गुडघे प्राध्यापक मयुरी गावंडे विद्यापीठाचे ब्रँड अँबेसिडर रोहन बुंदेले उपस्थित होते.सोबत प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यां तर्फे कापडी पिशव्या व वृक्ष वाटप करण्यात आले. महाविद्यालय परिसरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे डॉ. संजय तिडके यांच्या प्रमुख उपस्थित वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कु. सायली गोतमारे रोशन चव्हाण पायल मोडक, आचल राऊत, समीक्षा चक्रनारायण ,अभिषेक चव्हाण, विवेक सरनाईक आदी उपस्थित होते.

# रशियाने सुरु केला जीवघेणा बदला; युक्रेनवर ड्रोन अन् मिसाईल्सचा मारा

**कीव, दि.६ वृत्तसंस्था**

अखेर रशियाने युक्रेनच्या ड्रोन हलल्याचा बदला घेण्यास सुरुवात केली आहे. रशियाने गुरुवारी मध्येरात्री युक्रेनवर ड्रोन आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली आहेत. युक्रेनची राजधानी कीव, तसेच आणखी प्रमुख शहरांना लक्ष्य करण्यात आले आहे. युक्रेनच्या 'ऑपरेशन स्पायडर बेव' हा हल्ला करण्यात आला आहे. युक्रेनने ऑपरेशन स्पायडर वेब राबवत रशियाच्या दोन लष्करी तळांवर हल्ला केला होता. यामध्ये रशियाचे मोठे नुकसान झाले होते. रशियाच्या बॉम्ब ताफ्याचा मोठा भाग पूर्णत: उद्ध्वस्त झाला होता. या हल्ल्यानंतर रशियामध्ये संताप उमटला होता. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिनही तीव्र संतापले होते. त्यांनी युक्रेनच्या हल्ल्यांना योग्य प्रत्युत्तर देण्यात येईल असे म्हटले होते. यानंतर रशिया युक्रेनवर मोठ्या हल्ल्याची तयारी करत असल्याचेही समोर आले होते. या हल्ल्याच्या एकदिवस आधी ट्रम्प यांच्याशी फोनवरुन संवाद साधताना



व्लादिमिर पुतिन यांनी रशियन हवाई तळांवर केलेल्या ड्रोन हल्ल्याचा बदला घेण्याचे आवाश्न दिले होते. तथापि पुतिन यांनी आपले आक्रमक वचन सिद्ध करुन दाखवले.रशियन सैन्याने युक्रेनियन प्रदेशांमध्ये हवाई हल्ला सुरु केला आहे. युक्रेनने दिलेल्या माहितीनुसार, रशियाचे -९५ बॉम्बर्स युक्रेनच्या प्रदेशावर उड्डाण करत बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा करत आहे. कीव, टेर्नो पिल, खमेलनित्सिकी ओबाल्ट, ल्विव्ह आणि लुत्सक येथे मोठे हल्ले केले आहेत.युक्रेनची राजधानी कीवमध्ये अनेक ठिकाणी भीषण स्फोट झाले असल्याची माहिती कीव प्रशासनाचे प्रमुख तैमूर तकाचेन्का यांनी दिली. त्यांनी म्हटले की, आमच्या हवाई संरक्षण यंत्रणांनी क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हाणून पाडण्याचा प्रयत्न केला, परंतु यामध्ये त्यांना अपयश आले. यामुळे अनेक भागांमध्ये भीषण स्फोट होऊन आग लागली आहे. सोलोमिन्स्की, होलोसिव्हस्की, डार्नित्स्की, निप्रोवस्की आणि शेंचेकेविस्की यासाह अनेक शहरांमध्ये स्फोटांचे आवाज येत आहे.कीवचे महापैर विटाली क्लित्स्को यंनी दिलेल्या माहितीनुसार, रशियाच्या हल्ल्यात चार जमांचा मृत्यू झाला आहे. तसेच २० जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### ट्रम्प प्रशासनाचा आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या न्यायाधीशांना दणका

**वॉशिंग्टन:** अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय च्या चार न्यायाधीशांवर निर्बंध लादले आहेत. यामुळे जगभरात गोंधळ उडाला आहे. यामागचे कारण इस्रायल आणि हमासमध्ये सुरु असलेल्या युद्धात इस्रायलवर लावलेल्या युद्धगुन्ह्यांचे आरोप आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने हे आरोप बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. बेनिन, पेरु, स्लोव्हेनिया आणि युगांडा येथील न्यायाधीशांवर निर्बंध लादण्यात आले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने निवेदन जाहीर करत सांगितले आहे की, या न्यायाधीशांची अमेरिकेतील मालमत्ता गोठवण्यात येणार आहे. तसेच इतरही काही निर्बंध लादण्यात येतील. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिया यांनी या न्याधीशांना अमेरिकेचा मित्र देश इस्रायलवर बेकायदेशीर आणि निराधार आरोप केले आहेत. एक राजकीय संस्था बनत चालली आहे. ही संस्था अमेरिकेच्या मित्र देशांवर खोटे आरोप लावत असल्याचेही रुबियो यांनी म्हटले. तसेच रुबियो यंनी हेही स्पष्ट केले की, यामुळे अमेरिका आणि इस्रायलसह आमच्या मित्र देशांच्या सार्वभौमत्वाचे आणि राष्ट्रीय सुरक्षेचे उल्लंघन होत आहे.या न्याधीशांपैकी दोन न्यायाधीशांनी अफगाणिस्तानमधील अमेरिकन कर्मचाऱ्यांविरुद्ध तपासाला मंजुरी दिली होती, तर इतर दोन न्यायाधीशांनी इस्रायलचे पतंप्रधान नेतन्याह आणि माजी संरक्षण मंत्री योव गॅलेंट यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले होते.

### तृणमूल खासदार महुआ मोईत्रा विवाह बंधनात



**कोलकाता :** वादग्रस्त विधानांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांचा विवाह झाला आहे. ओडिशातील बिजू जनता दलाचे नेते आणि माजी लोकसभा सदस्य पिनाकी मिश्रा यांच्याशी त्यांनी विवाह केल्याचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले आहे. हा विवाह परदेशात झाल्याचे समजते. मात्र, अद्याप या दोन्ही नेत्यांनी विवाहाच्या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही. मात्र, त्यांच्या विवाहाचे छायाचित्र सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्याने त्यांच्या संबंधात बरीच चर्चा होत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार त्यांच्या विवाहाचे वृत्त सत्य असून विवाह सभारंभ भारताबाहेर झाला. महुआ मोईत्रा या ५० वर्षांच्या असून त्या पश्चिम बंगालमधून दोनदा लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आल्या आहेत. लोकसभेतील जहाल भाषणांमुळे त्या प्रसिद्ध आहेत.त्यांच्यावर सांसदीय नियमांचा भंग केल्याचा आरोपही करण्यात आला होता आणि त्यांच्यावर कारवाईही करण्यात आली होती. त्या अर्थशास्त्र या विषयातील पदवीधर आहेत. त्यांनी त्याच्या करीअरचा प्रारंभ बँकिंग क्षेत्रातून केला होता. नंतर त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. प्रथम त्या आमदार म्हणून विधानसभेवर निवडून आलेल्या होत्या. त्यांचे पती पिनाकी मिश्रा हे ६५ वर्षांचे असून ते इतिहास या विषयाचे पदवीधर आहेत. ते ओडिशातील बिजू जनता दल या पक्षाचे नेते असून त्या पक्षाचे माजी खासदारही आहेत.

### मुंबई विद्यापीठाच्या 'आयडॉल'ची प्रवेश प्रक्रिया लवकरच

**मुंबई :** अनेकांना विविध अडचणींमुळे आणि घरातील जबाबदाऱ्यांमुळे शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडावे लागते. मात्र या परिस्थितीत अनेकांना शिक्षणाची आवड खुणावत असते. त्यामुळे आयुष्यातील विविध जबाबदाऱ्या आणि नोकरी सांभाळून शिक्षण घेणाऱ्यांसाठी मुंबई विद्यापीठाअंतर्गतचे दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र ('सीडीओई' पूर्वीचे 'आयडॉल') गेल्या अनेक वर्षांपासून एक पर्याय म्हणून उपलब्ध आहे. 'आयडॉल'मधील पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे.दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये एम.ए. (इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, शिक्षणशास्त्र, मानसशास्त्र, संज्ञापन आणि पत्रकारिता, जनसंपर्क), एम. कॉम. (ॲडव्हान्स अकाउंटन्सी), एम. कॉम. (बिझनेस मॅनेजमेंट), एम.एस्सी. (गणित) एम.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान), एम.एस्सी. (संगणकशास्त्र), एमएमएस, एमसीए या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. याचबरोबर पोस्ट ग्रॅज्युअट डिप्लोमा इन फायनॅन्शिअल मॅनेजमेंट या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. या शैक्षणिक वर्षापासून एम. ए. समाजशास्त्र हा अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरु केला जात आहे.

# पीओके सरकारला भारताची भीती; दहशतवाद्यांना मिळणारा निधी रोखला

**मुजफ्फराबाद, दि.६ वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर अंर्तत भारताने पाकिस्तान अन् पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्डे नष्ट केले होते. भारताच्या या स्ट्राइकमुळे झालेल्या नुकसानीनंतर जैश-ए मोहम्मद सारख्या दहशतवादी संघटना आता भरपाईसाठी जाहीरपणे लोकांकडून देणगी मागत आहेत. आता या दहशतवादी संघटनांपासून अंतर राखण्यासाठी पाकव्याप्त काश्मीरच्या सरकारने एक आदेश जारी केला आहे. जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा समवेत एकूण ६६ दहशतवादी संघटनांना कुठल्याही प्रकारची देणगी देणे बेकायदेशीर असल्याचे आदेशात म्हटले गेले आहे. या दहशतवादी संघटनांना कुणीही देणगी दिली तर त्याच्या विरोधात कारवाई केली जाणार आहे. तसेच संबंधिताला एक वर्षाची शिक्षा होऊ शकते असा इशारा आदेशात देण्यात आला आहे.पीओके सरकारकडून जारी आदेशात एकूण ६६ दहशतवादी संघटनांची नावे आहेत. यात जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा, तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान, बलूच लिबरेशन आर्मी देखील सामील आहे. परंतु पाकिस्तानचा इतिहास पाहता हा आदेश केवळ एफएटीएफच्या ग्रे लिस्टमध्ये येण्यापासून वाचण्यासाठी जगासमोर खोटे चित्र निर्माण करण्यासाठीचा प्रयत्न असण्याची शक्यता आहे. ४ महिन्यांपूर्वी पीओकेत जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांना रावळकोट स्टेडियममध्ये कार्यक्रमाची अनुमती देण्यात आली होती.

# ट्रम्प यांच्याशी वाद आणि १५२ अब्ज डॉलर्स पाण्यात

## इलॉन मस्क यांच्या टेस्लाचे मोठे आर्थिक नुकसान

**वाशिंग्टन, दि.६ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनामधून उद्योगपती इलॉन मस्क बाहेर पडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आणि इलॉन मस्क यांच्यामध्ये वाद सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांपासून ट्रम्प आणि मस्क हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत, त्यामुळे दोघांमधील मतभेद समोर आले असून अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात याची चर्चा रंगली आहे. यातच आता इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात बोलणं चांगलंच महागात पडलं आहे.



टेस्लाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून इलॉन मस्क यांचं १५२ अब्ज डॉलर्सचं नुकसान झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. टेस्लाचे शेअर्स गुरुवारी तब्बल १४ टक्के घसरले असून बाजारमूल्यात १२.६ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आधी मैत्री आणि त्यानंतर त्यांच्या विरोधात बोलणं महागात पडलं आहे. तसेच मस्क यांना ट्रम्प यांच्या वादाचा परिणाम मस्क यांच्या टेस्ला कंपनीवर होत असल्याचं दिसून येत आहे. टेस्लाच्या शेअर्समध्ये गुरुवारी १४ टक्के घसरण झाल्याने त्याचं बाजारमूल्य १५२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान मानलं जात आहे. तसेच गेल्या पाच ट्रेडिंग सत्रांपैकी चार सत्रांमध्ये या शेअरमध्ये घसरण झाली आहे. दरम्यान, टेस्लाच्या शेअर्समध्ये मे महिन्यात २२ वाढ झाली होती. मात्र, मस्क आणि ट्रम्प यांच्यातील वादानंतर या आठवड्यात टेस्लाच्या शेअर्समध्ये जवळपास १८ टक्क्यांची घट झाली. तसेच या वर्षी आतापर्यंत टेस्लाचे शेअर्स जवळपास ३० टक्के घसरले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत बोलताना इलॉन मस्क यांनी एक मोठं विधान केलं आहे. इलॉन मस्क यांनी म्हटलं की, "माझ्याशिवाय ट्रम्प निवडणूक हरले असते.

# गाझातील प्रत्येक कारवाईचा आम्ही बदला घेणार

## हुथींनी पुन्हा इस्रायलच्या विमानतळाला केले लक्ष्य

**जेरुसेलम, दि.६ वृत्तसंस्था**

इस्रायलच्या गाझामध्ये कारवाया सुरुच आहे. पुन्हा एकदा गुरुवारी (०६ जून) इस्रायलने लेबनॉनची राजधानी बेरुतवर हल्ला को आहे. यामध्ये बेरुतमधील इमारतींना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्याचा बदला म्हणून पुन्हा एकदा येमेनच्या विद्रोह्यांनी इस्रायलच्या बेन गुरियान विमानतळावर हल्ला केला आहे. हे विमानतळ इस्रायलचे प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. हुथींच्या हल्ल्यामुळे विमानताळावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. यापूर्वी देखील गेल्या महिन्यांत ४ मे रोजी इस्रायलच्या बेन गुरियन विमानतळावर हल्ला करण्यात आला होता.
या हल्ल्याची माहिती हुथींच्या प्रवक्त्याने दिली. त्यांनी म्हटले की, तेल अवीवच्या पूर्वेकडील बेन गुरियन विमानतळावर क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला आहे. गाझातील लादलेल्या इस्रायलच्या उरासमारीच्या गुन्ह्यानुळे आणि लेबनॉनमधील बेरुतवर केलेल्या इस्रायली हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही



कारवाई करण्यात आली आहे.हुथी बंडखोरांचे प्रवक्ते जनरल याह्या सारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईमध्ये पॅलेस्टाईन-२ क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला. इस्रायलच्या गाझातील कारवायामुळे हा हल्ला करण्यात आला. विमानतळावरील हवाई वाहतूक बंद करणे आणि लाखो स्थायिकांना बॉम्ब आश्रयस्थानांमध्ये पळून जाण्यास हुथींनी भाग पाडले. हा त्यांच्या पूर्व निर्धारित उद्देश होता.इस्रायलच्या सैन्याचे गाझाली हल्ले आणि मानवतावादी मदत बंदी धोरण सध्या सुरुच आहे. यामुळे गाझातील लोकांना उपासमारीचा सामाना करावा लागत आहे. पायभूत सुविधा देखील मिळणे कठीण झाले आहे. यामुळे हुथींचे प्रवक्ते याह्या सारी यांनी गाझाच्या लोकांसाठी हा बदला घेतला असल्याचे म्हटले आहे.त्यांनी म्हटले की, " ही कारवाई निरापराध पॅलेस्टिनी लोकांसाठी एक विजय आहे. गाझातील इस्रायलच्या गुन्ह्यांना आणि बेरुतमधील दक्षणेकडील हल्ल्यांना आक्रमक प्रत्युत्तर आहे. येमेनी जनता आणि लढाऊ सैन्य गाझातील पॅलेस्टिनी लोंकाच्या पाठिशी आहे" जोपर्यंत इस्रायलाची गाझातील आक्रमकता संपत नाही, तोपर्यंत आवाज उठवला जाईल असेही याह्या सारी यांनी म्हटले आहे.दुसरीकडे अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने इस्रायलविरोधी कारवाई करणाऱ्या आणि नेतन्याहूंच्या अटक वॉरंट जारी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या न्यायाधीशांवर निर्बंध लादले आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

# ईशान्य भारतात महापुराचा कहर ;पूरस्थिती अद्याप कायम

**डिबांग, दि.६ वृत्तसंस्था**

अरुणाचल प्रदेशात पावसामुळे झालेल्या विविध घटनांत बारा जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील २१४ खेड्यातील सुमारे ३३,२०० नागरिकांना भूस्खलन आणि महापुराचा सामना करावा लागला आहे.
डिबांग जिल्ह्यातील स्थिती गंभीर असून तेथे एक पूल वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. प्रशासन आता ड्रोन आणि हेलिकॉप्टरच्या मदतीने साधनसामग्री पोचविण्याचा प्रयत्न करत आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये पूरस्थितीत सुधारणा झाली आहे. आसाम रायफल्स आणि लष्कराकडून पूरग्रस्त भागात मदतकार्य वेगाने सुरू आहे. मणिपूरमधील सुमारे १.६५ लाख लोकांना फटका बसला असून ३५,२४२ घरांची पडझड झाली आहे.
सिक्कीम राज्यातही मदतकार्य सुरू असून भूस्खलन झालेल्या ठिकाणी पुनर्वसनाचे काम सुरू झाले आहे.आसाम आणि अरुणाचल प्रदेशातील स्थिती अत्यंत बिकट असून आसाममध्ये महापूर आणि भूस्खलनामुळे १९ जणांचा मृत्यू झाला आहे. ईशान्येकडील राज्यांतील मृतांची संख्या ५० वर पोचली आहे.आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानुसार, राज्यातील २१ जिल्ह्यांत महापूराचा परिणाम जाणवत आहे.

# राष्ट्रहित म्हणजे पक्षविरोध नव्हे-शशी थरूर

**वॉशिंग्टन, दि.६ वृत्तसंस्था**

"राष्ट्रहितासाठी काम करणे म्हणजे पक्षविरोधी कारवाया असे कोणाला वाटत असल्यास त्यांनी स्वत:ला प्रश्न विचारण्याची गरज आहे," असा टोला काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी आज स्वपक्षीयांना लगावला. थरूर यांची भाजपशी जवळीक वाढली असल्याची चर्चा होत असली तरी त्यांनी मात्र आज काँग्रेस सोडण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले.
'ऑपरेशन सिंदूर'बाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी अमेरिकेत गेलेल्या दौऱ्यात शशी थरूर यांचा समावेश आहे. पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने घेतलेल्या भूमिकेचे समर्थन केल्याबद्दल काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी थरूर यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. थरूर हे भाजपचे 'सुपर प्रवक्ते' आहेत, असा टोलाही काही नेत्यांनी मारला होता. 'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीत बोलताना थरूर यांनी या नेत्यांवर टीका केली.





ते म्हणाले,"कोणी जर देशसेवा करत असेल, तर अशा टीकेकडे लक्ष देण्याची फार गरज नसते. मात्र, अशी देशसेवा करणे म्हणजे पक्षाच्या विरोधात कारवाया करण्यासारखे कोणाला वाटत असेल तर त्यांनी आम्हाला प्रश्न विचारण्याऐवजी स्वत:ला प्रश्न विचारावेत. आम्ही येथे पक्षमोहिम चालविण्यासाठी आलेलो नाहीत. आम्ही एकसंध भारताचे प्रतिनिधी म्हणून आलो आहोत."पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर शरणागती पत्करल्याचे विधान काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केले होते. याबाबत प्रतिक्रिया विचारल्यावर थरूर यांनी, लोकशाहीमध्ये अशी टीका होणे ही सर्वसामान्य बाब आहे,

# पाकिस्तानच्या मानगुटीवर द्विराष्ट्र सिद्धांताचे भूत

## मोहन भागवतांनी पाकला म्हटले 'दुटप्पी देश'

**नवी दिल्ली, दि.६ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी नागपूरमध्ये आयोजित कार्यकर्ता विकास वर्गाच्या समारोप समारंभात राजकीय विधान करत पाकिस्तानला दुटप्पी देश म्हटले. द्विराष्ट्र सिद्धांताच्या सिद्धांतावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, "ही कल्पना अजूनही पाकिस्तानला भुतासारखी सतावत आहे" असे म्हणत त्यांच्यावर टीका केली.
मोहन भागवत यांनी यावेळी, "पाकिस्तानच्या मनात द्विराष्ट्र सिद्धांताचे भूत आहे. शांततेत राहता यावे म्हणून ते वेगळे झाले आणि वेगळे होताच त्यांनी अशांतता निर्माण करण्यास सुरुवात केली. जोपर्यंत हा दुटप्पीपणा दूर होत नाही, तोपर्यंत देशात धोके कायम राहतील. "असे म्हटले आहे. काश्मीरमधील पहलगाम येथे ऑपरेशन सिंदूर दरम्यान दहशतवादी हल्ल्याच्या बातमीमुळे देशात संताप आहे



अशा वेळी हे विधान आले आहे. भागवत हे निदर्शनास आणून देत होते की पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देऊन भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करतो.
आदिवासी नेते अरविंद नेताम यांनी कार्यक्रमात आदिवासी भागात धर्मांतराचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, मोहन भागवत यांनी त्याला हिंसाचार म्हटले. ते म्हणाले की, "जर एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने आपली उपासना पद्धत बदलली तर काही हरकत नाही, परंतु लोभ किंवा दबावाखाली धर्म बदलणे ही हिंसा आहे." असे म्हटले. ते म्हणाले की,"धर्मांतर ही हिंसा आहे. ज्यांना त्यांच्या मूळ धर्मात परत यायचे आहे त्यांना परत आणले पाहिजे. आरएसएस बऱ्याच काळापासून घर वापसी मोहिमेच्या बाजूने आहे आणि या विधानाकडे त्याच विचारसरणीचे पुनरुज्जीवन म्हणून पाहिले जात आहे.
कार्यक्रमात आदिवासी नेते नेताम यांनी आदिवासी भागात नियोजनबद्ध पद्धतीने धर्मांतर होत असल्याचा मुद्दाही उपस्थित केला. मोहन भागवत यांनी याला पाठिंबा दर्शवला आणि म्हणाले: जर एखाद्या व्यक्तीने जबरदस्ती किंवा फसवणुकीमुळे आपला धर्म बदलला तर त्याला त्याच्या मूळ धर्मात परतण्याचा अधिकार असला पाहिजे. समाजाने अशा लोकांना बहिष्कृत न करता त्यांना पाठिंबा द्यावा.

# अमेरिकेच्या जय-वीरूची जोडी का तुटली?

**नवी दिल्ली, दि.६ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्यातील वाद आता चांगलाच विकोपाला गेला आहे. ट्रम्प आणि मस्क हे खूप जवळचे मित्र होते, पण आता त्यांच्यात काहीच आलबेल नसल्याचे दिसत आहे. दोघेही सार्वजनिक व्यासपीठांवर एकमेकांवर हल्लाबोल करत करत आहेत. नुकतेच डोनाल्ड ट्रम्प यांनी मस्क यांना धमकीही दिली आहे. त्यांनी,मस्कचे सर्व सरकारी करार रद्द केले जातील" अशी उघडपणे धामिर्कच दिली आहे. तर दुसरीकडे, मस्क यांनी ट्रम्प यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.
डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्यातील वादाला एक विशेष विधेयक कारणीभूत ठरले आहे.

## मस्क यांनी ट्रम्प यांना चोख उत्तर दिले

"ट्रम्प खोटे बोलतोय, हे बिल मला एकदाही दाखवले गेले नाही." असा दावा केला आहे. मस्क यांनी असेही म्हटले आहे की जर त्यांनी ट्रम्पला पाठिंबा दिला नसता तर ट्रम्प निवडणूक हरले असते. ट्रम्प आणि मस्क यांच्यातील संघर्षामुळे वॉशिंग्टन डीसीच्या राजकारणात बरीच खळबळ उडाली आहे. रिपब्लिकन खासदारही द्विधा मनस्थितीत आहेत. त्यांना समजत नाही की त्यांनी ट्रम्पसोबत जावे की मस्कसोबत जावे.

मस्क यांनी ट्रम्प यांच्या कर आणि खर्चाशी संबंधित विधेयकावर भाष्य केले होते. त्यांनी त्यावर जोरदार टीका करत हे सार्वजनिक पैसे वाया घालवण्याचे विधेयक आहे. हे लज्जास्पद आहे" असे म्हणत ट्रम्प सरकारवर टीका केली होती. मस्क यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. त्यात त्यांनी "हे सर्व सहनशीलतेच्या पलीकडे आहे. हे विधेयक रात्री मंजूर झाले आहे, जेणेकरून त्यावर अधिक चर्चा होऊ नये." असे म्हणत गंभीर आरोप केले होते.
एलॉन मस्क यांनी केलेल्या टीकेमुळे ट्रम्प यांचा राग अनावर झाला. मस्क यांच्या टीकेला उत्तर देताना त्यांनी," विधेयकावरील या टिप्पणीने ते खूप निराश आहेत" असे म्हटले. तसेच ट्रम्प यांनी दावा केला की, मस्क यांना या विधेयकाबद्दल सर्व काही माहित होते, परंतु त्यांनी आधी त्यावर प्रतिक्रिया दिली नव्हती." अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी पुढे



सांगताना,"जेव्हा मस्क यांना कळेल की इलेक्ट्रिक वाहनांच्या अनुदानात कपात केली जात आहे, तेव्हा त्यांच्या कंपन्यांना अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होईल." असा आरोप देखील यावेळी त्यांनी केला. तसेच हा आरोप करताना ट्रम्प यांनी मस्क यांना धमकी देत मास्क यांना देण्यात येणारी सर्व सरकारी अनुदाने भविष्यत बंद करण्यात येतील अशी थेट धमकीच त्यांनी दिली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले. आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## ठाकरे मनोमिलनाच्या केवळ गप्पाच?

उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसेना यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. या दोघांनी एकत्र यावे अशी इच्छा मात्र असंख्य जणांची आहे. तथापि, राजकारणात एकत्र येणे किंवा विभक्त होणे हे भावनेच्या आधारावर घेतले जाणारे निर्णय नसतात. तेथे सरळसरळ नफा-नुकसानीचा हिशेब असतो. तसे जर नसते तर विचारधारेत काडीचेही साम्य नसलेले पक्ष गेल्या पाच वर्षात एकत्र आले नसते. त्याहीपुढे म्हणजे आपल्या पितृपक्षाशी फारकत घेऊन नवीन चूल मांडण्याची घाई काही नेत्यांनी केली नसती. त्यांना त्यांच्या लाभाचे गणित खुणावत होते व त्यानुसार नेत्यांनी निर्णय घेतले. राज्याच्या राजकारणात झालेल्या उलथापालथीचा सगळ्यांत लाभार्थी जर कोणी ठरला असेल तर तो भारतीय जनता पक्ष अन् सगळ्यांत जास्त तोटा जर कोणाचा झाला असेल तर ठाकरे या ब्रँडचा. या भूमिकेतून विचार करायचा झाल्यास ठाकरे बंधूंकडे एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही. फक्त पहिला फोन कोणी करायचा यातच त्यांनी वेळ घालविला तर महाराष्ट्राचे नंतर बघता येईल, त्यांचे नुकसान आणखीनच वाढत जाईल व कदाचित आता डागडुजीची मुळीच शक्यता नाही येथपर्यंत ते जाऊन पोहोचतील. राज्यातील फोडाफोडीत दोन्ही ठाकरेंच्या पक्षांना जवळपास शून्यावर यावे लागले आहे. राज ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या पक्षातील नेते न फोडता वेगळा पक्ष स्थापन केला आणि आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीद्वारे त्यांचे शिलेदार जमविले. पहिल्या सर्वच मग त्या स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांना भरभरून मते मिळाली. दिल्लीच्या केजरीवालांनी पहिल्याच प्रयत्नात सरकार स्थापन केले तसे राज करू शकले नाहीत. त्याचे कारण दिल्ली वेगळी आणि महाराष्ट्र वेगळा. शिवाय केजरीवालांचे राजकारण वेगळे आणि राज यांची शैली वेगळी. ते मराठी आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर हेलकावे घेत राहिले. उद्धव ठाकरे यांच्याकडे पित्याने उभी केलेली एक जवळपास अर्धा शतकाचा इतिहास असलेली भरभक्कम संघटना होती. या संघटनेत कट्टर आणि निष्ठेची चाड असलेले नेते होते. बाळासाहेबांच्या हयातीत त्यांच्या शिवसेनेला हादरे बसले तथापि, रस्त्यात एखादा खड्डा आल्यावर थोडा धक्का बसावा एवढीच त्याची व्याप्ती होती. खरा हादरा बसला तो एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर. त्यांनी जवळपास ९० टक्के लोकप्रतिनिधी आपल्यासोबत नेले आणि उद्धव यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. तरीही पक्षसंघटना व विशेषत: शिवसैनिक त्यांच्यासोबत असल्यामुळे त्यांना फिकीर नव्हती व सरकार गमावल्याचा धक्का ते सहन करू शकले. आता ती स्थिती नाही. पक्षसंघटनेलाच गळती लागली आहे. मुंबईपासून नाशिक आणि विदर्भ आणि मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातूनही उद्धव सेनेतून आउटगोईंग सुरू आहे. हे सगळे थोपवण्यात बाळासाहेबांकडे ज्या धडाडीचे नेते होते व त्यांचा जो वचक होता तो उद्धवसेनेकडे सध्या नाही हे वास्तव आहे. हीच अवस्था राज यांच्या मनसेचीही आहे. स्थापनेपासून नाशिक महापालिकेचा अपवाद वगळला तर कुठलीही सत्ता नाही व ती येण्याची शक्यताही दिसत नसल्यामुळे नियमितपणे राज यांच्या सेनेतून आउटगोईंग सुरूच आहे. पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उड्या मारण्याला दोन्ही ठाकरेंनी आतापर्यंत फारशी धूप घातली नसली, तरी आता महाराष्ट्रातील स्थिती ती नाही जी दहा वर्षापूर्वीपर्यंत होती. भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र बऱ्यापैकी काबीज केला आहे. केंद्रात आणि राज्यातील सत्ता त्यांच्याकडे आहेच, मात्र, अनेक महापालिका आणि अन्य संस्थांवर त्यांनी पद्धतशीर जम बसवला आहे. शरद पवारांच्या आव्हानाचा सामना करीत सहकार क्षेत्रातही शिरकाव केला आहे. राज्यातील विविध समाजांचा विचार करता प्रत्येक समाजात आपला एक चेहरा उभा करून त्यांना भक्कम पाठबळ देत नेता म्हणून प्रस्थापित करण्यातही भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांना यश मिळाले आहे. शिवसेना संपवू शकणार नाही याची कल्पना भाजपला होती आणि आहे. पण ती खिळखिळी केली जाऊ शकते याची त्यांना खात्री होती आणि त्यांनी उपलब्ध सर्व पर्यायांचा वापर करून आपले ध्येय साध्य केले. बाळासाहेबांच्या हयातीत जी मंडळी तिसऱ्या किंवा चौथ्या रांगेत होती किंवा जे रांगेपर्यंतही पोहोचले नव्हते ते आज सत्तेत आहेत व आपल्या राजकीय जीवनाची ज्या पक्षातून सुरुवात केली त्या पक्षाच्या नेतृत्वाला आव्हान देत आहेत. अर्थात, राजकारणात उदय आणि अस्त असतो; पण भरारी घेण्याची व त्याकरिता योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचीही संधी मिळत असते. एका मुलाखतीत राज यांनी महाराष्ट्राकरिता एकत्र येण्याचे सूतोवाच केले व त्याला बहुदा पहिल्यांदाच उद्धव यांनी जाहीरपणे सकारात्मक प्रतिसाद दिला. आतापर्यंत घडलेली ही एकमेव सकारात्मक बाब. पूर्वी उद्धव यांनी काही बोलायच्या आत त्यांचे सरदारच मनसेनेला मोडीत काढून मोकळे व्हायचे. आता आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि अन्य मंडळीही सकारात्मक बोलत आहेत. एका ठिकाणी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आंदोलनही केले. महाराष्ट्राचा एक स्वभाव आहे. कुटुंबात निर्माण झालेली कटुता फार काळ टिकत नाही व लोकांनाही ती आवडत नाही. दोन्ही भावांनी एकत्र येणे त्यांच्या स्वत:साठी आणि मराठी माणसासाठी आवश्यक आहेच, पण त्याहीपेक्षा अधिक राज्यात एक समर्थ आणि सक्षम पर्याय असावा, किमान सरकारवर अंकुश ठेवू शकेल अशी शक्ती असावी म्हणूनही ते आवश्यक आहे. फोन कोणी करायचा यापेक्षा अधिक प्रगल्भपणे निर्णय घेण्याची सध्या गरज आहे. शुक्रवारचा दिवस राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याच्या चर्चेवरच गाजला. जनतेच्या मनात जे असेल तेच घडेल असे सूतोवाच उद्धव ठाकरे यांनी केले आहे परंतु प्रत्यक्षात काय घडते हे येणारा काळच सांगेल.

### महामार्ग





लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

हे महामार्ग जरूर करा
वहीत जमीन घेऊ नका
महाराष्ट्रातील बळीराजा
देशोधडीला लावू नका

हा समृद्धी पूर्ण झाला
आता शक्तीपीठ करू
रम्य सोहळा तो रंगला
मंत्र्यांचे सुतोवाच सुरू

आधीच अनेक मार्ग आहेत
भ्रष्टाचारी कुरण चरण्याचे
तुम्ही भर घालीत आहात
कोण शक्तिपीठ समृद्धीचे?

### ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



स्वराज्य रक्षक शिवराय छावा ।
घेतो शंभू धावा रक्षणासी ॥

औरंगजेबाला उरून पुरले ।
धोक्याने मारले गद्दारानी ॥

शत्रूंचीही माय माय जाणायचे ।
शंभू करायचे स्त्री रक्षण ॥

बुद्धिवंत शंभू ज्ञानवंत शंभू ।
शूरवीर शंभू यशवंत ॥

बुद्धी आणि शक्ती क्षत्रिय, पंडित।
होते अलौकिक शंभू राजे ॥

शूरवीर आणि कविमन होते ।
ज्ञायप्रिय होते शंभूराजे ॥

# त्याग आणि बलिदानाचा सण : ईद अल-अज़हा



दिन विशेष

प्रविण बागडे
नागपूर 9923620919



ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला. इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो. त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुर्बानीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात. या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कार्याची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता. असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे. वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. पण मक्का त्याकाळी वाळवंट होता,त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते. हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेत: पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते. या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो. यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही. नमाजानंतर इमाम उपदेश देतात.

नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते. इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते. नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून. बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुर्बानी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो. एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल-अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष संवर्धनाचा करूया संकल्प

प्रासंगिक



अर्चना वऱ्हाडपांडे
अमरावती




**झाडे लावा झाडे जगवा**
**स्वच्छ हिरवळीत श्वास घ्या**
**निसर्गाच्या रक्षणाचा घेऊन ध्यास**
**साऱ्यांच्या सहकार्याचीआस**
**पृथ्वीला घेऊ देऊ श्वास!**

पाच जून हा दिवस संपूर्ण जगात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करतो .खरे तर !प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की ,त्याने पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे. शाळा महाविद्यालयातून पर्यावरण दिनानिमित्त रॅली वृक्षदिंडीचे आयोजन करणे गरजेचे आहे . तसेच पथनाट्याद्वारे निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा याद्वारेही जनजागृती ही होते .वृक्षांचे महत्त्व सांगणारे फलक जागोजागी लावले पाहिजेत .वृक्षांचे घोषवाक्य असलेले फलक सुद्धा लावले पाहिजेत नुसते पर्यावरण दिनाचे फोटो, सेल्फी काढून पर्यावरण दिन साजरा होणार नाही ना !तर आपण काही गोष्टींचा संकल्प करू शकतो .जसे उदाहरणार्थ --बाजारात भाजी आणायची असेल तर कापडी पिशवीच वापरा, कागदी पिशव्या वापरा .फळ विक्री,भाजी विक्री इत्यादी ठिकाणी प्लास्टिक बॅगचा सर्रास वापर करण्यात येत आहे. त्यामुळे तो वापर कटाक्षाने टाळला पाहिजे. पाच जून २०२५ ची भारतात थीम आहे .बीट प्लास्टिक पोल्युशन म्हणजे प्लास्टिकचे पूर्णपणे निर्मूलन करा. पण फक्त पाच जूनलाच पर्यावरण दिन का साजरा करायचा? प्रत्येकाने ठरवले तर आपण रोजच पर्यावरण दिन साजरा करू शकतो. चला तर मग; आपणही ठरवू एक दिवस नाही तर रोजच पर्यावरण दिन साजरा करायचा .

१.झाडे लावा झाडे जगवा
२. पाणी अडवा पाणी जिरवा.
३..पाण्याचा काटकसरीने वापर करा .
४. निसर्गाचे रक्षण करा
.५.प्लास्टिकचा वापर टाळा.

आपण शहराचे सुशोभीकरण करण्यासाठी रस्ते रुंदीकरणासाठी हजार वृक्षांची कत्तल करतो म्हणजे एकीकडे वृक्षारोपण कार्यक्रम राबवतो आणि दुसरीकडे झाडे तोडतो. पर्यावरणाचा समतोल ढासळतो. ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते .तेव्हा प्रत्येकाने एक रोप लावण्याचा संकल्प करायला हवा आणि ते झाड जगवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. आपण सारेच वसुंधराचे सेवक आहोत याचे भान ठेवू.माणसाने कितीही प्रगती केली तरी निसर्गाची ताकद अफाट आहे याची प्रचिती नेहमी येत असते उदाहरणार्थ -चक्रीवादळ, भूकंप इत्यादी वसुंधरेच्या रक्षणाचा संकल्प करूया. पर्यावरणाचा समतोल राखू या. पर्यावरण म्हणजे आपल्या भोवती असलेल्या निसर्ग किंवा आपल्या सभोवती असलेले हवा, पाणी आणि माती म्हणजेच पर्यावरण. जागतिक पर्यावरण दिनाचा उद्देश म्हणजे जगातील प्रदूषणाची पातळी दररोज वाढत आहे .प्रदूषणाची वाढती पातळी हे निसर्गाला घातक आहे हे कमी करण्यासाठी पर्यावरण दिन साजरा केला जातो. पर्यावरणाची गुणवत्ता वाढवणे तसेच जागरूकता निर्माण करणे हाच जागतिक पर्यावरण दिनाचा उद्देश आहे.

**कापडी पिशवी घरोघरी**
**पर्यावरणाचे रक्षण करी**

# मनाच्या ओटांवरची अक्षरगाथा - अक्षरेच माझे सांगाती...

समीक्षण



डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९

अक्षरांशी मैत्री हे केवळ साहित्यिकांचे नव्हे, तर संवेदनशील मनांचे लक्षण असते. शब्द हे केवळ संवादाचे माध्यम नसून, अंतःकरणात उसळणाऱ्या भावनांचे, विचारांचे, अनुभवांचे साक्षीदार असतात. डॉ. मनोहर घुगे यांच्या 'अक्षरेच माझे सांगाती' या चारोळी संग्रहात अशाच साक्षीदार अक्षरांचे सहज, सुगंधी आणि सजीव दर्शन होते.

एक डॉक्टर म्हणून रुग्णांची नाडी हातात घेणारे डॉ. घुगे जेव्हा कवी म्हणून मनोविकारांची लय पकडतात, तेव्हा त्या लयींतून निर्माण होणाऱ्या शब्दांचं संमेलन म्हणजेच ह्या चारोळ्या. इथे केवळ शब्दांचा खेळ नाही, तर काळाच्या स्पंदनांची आणि माणसाच्या अस्तित्वाच्या धडधडती ओळखीची कवने आहेत.

या संग्रहातील चारोळ्या साध्या, सुलभ आणि आपल्या आजूबाजूच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या आहेत. यातून ते आपल्या अनुभवसिद्ध प्रगल्भतेने वेदना, विडंबन, विषाद, विरह, विनोद, विडंबकता आणि व्यथांची कवाडे उघडतात.

ह्या चारोळ्यांमध्ये ते कधी स्वत:शीच बोलतात, कधी समाजाला आरसा दाखवतात, तर कधी आयुष्याच्या चिमुकल्या क्षणांना अमरत्व देतात.

यातील चारोळ्या म्हणजे आपल्या रोजच्या अनुभवांची, भावनांची आणि विचारांची जुळवाजुळव. कोणताही अवघड शब्दप्रपंच नाही, कलात्मकतेच्या गोंधळात गोंधळलेली मांडणी नाही तरीही मनाला भिडणारी शैली आहे.

'क्षितिजापलीकडे', 'उसवलेला काळ', आणि 'काहूर' या त्यांच्या आधीच्या काव्यप्रपंचातही हीच भावनिक ठसक आणि जिव्हाळ्याची भाषा जाणवते. मात्र 'अक्षरेच माझे सांगाती' हा चारोळीसंग्रह त्या वाटचालीचा परिपक्व टप्पा वाटतो.

वाचक म्हणून आम्ही केवळ या चारोळ्या वाचत नाही, तर त्या अनुभवत जातो त्या शब्दांचे, अर्थांचे, नि:शब्दतेचे सांगाती होतो.

''हृदयाशी भिडणाऱ्या प्रत्येक अनुभवाला,
जेव्हा शब्दांची साथ लाभते
तेव्हा अक्षरेच होतात सच्चे सांगाती,
आणि माणूस होतो कवी ....!''

मानवी अस्तित्वाच्या मुळाशी जर आपण डोकावून पाहिलं, तर एक सत्य उजळून समोर येतं आपण सारे मातीपासूनच निर्माण झालो आहोत. पण काळाच्या ओघात जाती, धर्म, परंपरा, पंथ यांचं कुंपण निर्माण झालं. त्या कुंपणांना ओलांडणारा हा विचार फार मार्मिक आहे.

माती एकच आहे
पुतळे अनेक आहेत
जाती परंपरेने विखुरला
तरी माणूस मात्र एकच आहे ...

ही चारोळी अत्यंत अर्थगर्भ आहे. ''माती एकच आहे'' या ओळीतून माणसाच्या मूलभूत समानतेची जाणीव करून दिली आहे. पुतळे अनेक ही प्रतिमा मानवी विविधतेचा, मूर्त स्वरुपात निर्माण झालेल्या भिन्नतेचा उल्लेख करते. जातपात, परंपरा, संस्कृती ह्यांनी माणसामध्ये कृत्रिम भिंती उभ्या केल्या आहेत हे तिसऱ्या ओळीत सूचित होतं. मात्र अंतिम ओळ, ''तरी माणूस मात्र एकच आहे'' ही साऱ्या चारोळीचा सारांश, आणि मूल्य असलेला संदेश ठरतो. चार ओळींतून एका व्यापक, सर्वसमावेशक आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणाऱ्या तत्त्वज्ञानाचा आविष्कार झालेला आहे.

ही चारोळी केवळ शब्दांचा खेळ नाही, तर माणसामधल्या समानतेची आठवण करून देणारी एक जाणीव आहे की मातीसारखंच आपणही सारखे आहोत... आणि फक्त माणूस म्हणून माणसाशी वागायला हवं.

संबंध, आपुलकी आणि प्रेम हे जिथे गोड बोलण्याच्या मुखवट्याखाली लपवले जातात, तिथे खरी भावना ओळखणं कठीण होतं.

गोड बोलून गरजा
भागवतात लोक
प्रसंगी उपकार
विसरतात कसे लोक .....

हे चार ओळींचं सत्य म्हणजे व्यवहाराच्या झगमगाटात हरवलेल्या माणुसकीची झलक आहे. गोड बोलणं म्हणजे फुलासारखं सौम्य वाटतं, पण त्यामागे काटेरी स्वार्थ असतो. उपकार विसरण्याची प्रवृत्ती, हीच आजच्या समाजाच्या संवेदनशीलतेची शोकांतिका आहे.




भाग-१

शब्द म्हणजे अस्तित्व. भाषा म्हणजे अभिव्यक्तीचा गाभा. आणि बाबासाहेब म्हणजे त्या शब्दांना आत्मा देणारे शिल्पकार ....

तुम्हीच शिकविली भाषा बाबासाहेब
तुम्हीच दिली ही वाणी
गळाही नसता गळ्याला आमच्या
तुम्ही शिकविली गाणी ....

ही चारोळी म्हणजे आभाराची भावनांनी ओतप्रोत भरलेली पुष्पमाला आहे. बाबासाहेबांनी दिलेली वाणी म्हणजे ज्ञानाचा दीप, आणि ती गाणी म्हणजे आत्मविश्वासाचं स्वरूप. ''गळाही नसता गळ्याला'' ही उपमा भाषावंचित स्थितीचं हृदयस्पर्शी चित्रण करते.

जीवन ही एक साखळी आहे दुःख, सुख, दारिद्र्य, समाधान या सगळ्या माळेतील मण्यांप्रमाणे परस्पर गुंफलेल्या ....

दारिद्र्य दुःख सुख अशी
जीवनाची साखळी आहे
जग कितीही पुढे जावो पण
निसर्गाची ही एक पोकळी आहे ....

या चारोळीने जीवनाचं चक्र आणि निसर्गाचं संतुलन यामधला सूक्ष्म संबंध दाखवला आहे. ''पोकळी'' ही संज्ञा नैसर्गिक शून्यतेचं, अपूर्णतेचं, आणि अस्थिरतेचं रूपक आहे. माणसाचं धावणारं जग अजूनही निसर्गाच्या मूळ कोऱ्या जागांना भरण्यात असमर्थ ठरतंय.

स्त्री-पुरुष समानतेचा अर्थ म्हणजे स्त्रीनेही स्वतःच्या सत्वाशी प्रामाणिक राहणं. पुरूषसारखं बनणं नव्हे तर स्त्रीत्व जपणं हेच तिचं सामर्थ्य ....

स्त्रियांनी पुरुषांशी स्पर्धा करून
स्त्रियांसारखेच वागले पाहिजे
पुरुष बनण्याचा प्रयत्न न करता
त्यांनी इमानाला जागले पाहिजे....

या विचारधारात्मक चारोळीत स्त्रीच्या अस्तित्वाचा खरा अर्थ ठळकपणे मांडला आहे. ''इमानाला जागणं'' ही संज्ञा तिच्या आत्मिक मूल्यांची आठवण करून देते. फुलासारखा कोमलपणा आणि वज्रासारखा निर्धार हाच स्त्रीत्वाचा खरा अर्थ आहे.

माणूसपणाचं सोनं आज पैशाच्या बाजारात विरघळून गेलं आहे. नाती मोडत आहेत, आणि माणूस माणसाला परकं वाटतंय....

माणसा - माणसाचीच
वेगळीच आता रीत झाली
सोडली सारी माणुसकी
पैशाचीच आता प्रीत झाली ....

ही चारोळी समाजाच्या हृदयाला टोचणारी आहे. पैशासाठी नाती गहाण ठेवणाऱ्या मानसिकतेचं हे चित्रण आहे. ''रीत'' ही नवी पण विकृत रीत आहे. प्रेम, आपुलकी, आदर हे सारे मूल्य जणू चलनाच्या किमतीवर मोजले जात आहेत हीच या चारोळीची खोल अर्थछटा आहे.

ह्या संग्रहातील सर्व चारोळ्या ह्या समाजमनाचं जिवंत प्रतिबिंब दर्शवितात जिथे शब्दात विचार आहेत, उपमा आहेत, आणि अंत:र्मनाला स्पर्श करणारी भावना आहे.

डॉ. मनोहर घुगे यांच्या चारोळ्या अनुभवांची पखरण करताना, समाज, नाती, देशप्रेम, स्वप्नभंग, नशीब आणि प्रामाणिकपणा यांचे वेगवेगळे भावसुर एकत्रित करतात. त्या केवळ शब्दांचे संचय नाहीत, तर एका सजग आणि संवेदनशील मनाचे, साहित्यिकतेने सजलेले आंतरिक प्रतिबिंब आहेत.

मानसन्मान ही कोणत्याही माणसाच्या आत्म्याला ओलावणारी पहिली ओळख असते. मान देणं म्हणजे त्याच्या अस्तित्वाचा स्वीकार होय....

मानसन्मान ज्याचा त्याला
मिळायला पाहिजे
हा संस्कार प्रत्येकाच्या
मना - मनात रूजायला पाहिजे ....

ही चारोळी म्हणजे स्वाभिमानाच्या मुळाशी रोवलेली एक चिंतनशील विचाररेषा आहे. ''मानसन्मान'' म्हणजे फुलांवर पडणारी दवबिंदूसारखी सौम्यता मृदू पण आवश्यक. ही भावना जर प्रत्येक मनात संस्काराच्या मातीसारखी रुजली, तर समाज आपोआप सुगंधित होईल.

गुरु म्हणजे दीपस्तंभ; मार्ग अंधारात असतानाही प्रकाश दाखवणारा. गुरु ही व्यक्ती नसून एक दिव्यता असते....

गुरुची गुरु तू
युगायुगाची माऊली
राहू दे आयुष्यभर
मला तुझीच सावली ....

ही चारोळी गुरुस्मरणाचा भावनिक शंखनाद आहे. ''माऊली'' या शब्दातून गुरुचं आईसारखं मायेचं रूप प्रकटतं. सावली म्हणजे केवळ आधार नाही, तर त्या सावलीतून मिळणाऱ्या थंडाव्याचं प्रतीक आहे. ''गुरुची गुरु'' ही अतिशय कल्पक आणि आदरयुक्त उपमा, दिव्यत्वाच्या एका अखंड परंपरेची गूंज घेऊन येते.

## लोकरंग

# प्लास्टिकमुक्ती हाच शाश्वत पर्यावरणासाठी उपाय



दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी पर्यावरण दिनाची एक थीम किंवा विषय असतो. यंदाच्या वर्षाची थीम आहे प्लास्टिकमुक्ती अर्थात पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकला नकार. शाश्वत,आणि सुंदर असे आपले सभोवताल म्हणजेच पर्यावरण. मात्र मागील काही दशकापासून विविध प्रकारच्या जल,वायू आणि रासायनिक प्रदूषणामुळे आपल्या पर्यावरणाचा समतोल बिघडू लागलेला दिसतोय. पर्यावरणाचा ऱ्हास होण्यास प्लास्टिकचे प्रदूषण हे अत्यंत धोकादायक आणि तितकेच गंभीर आहे. म्हणूनच पर्यावरण संवर्धनासाठी प्लास्टिक मुक्ती करायची हे यंदाच्या पर्यावरण दिनाचे उद्दिष्ट आहे. याच अनुषंगाने पर्यावरण दक्षता मंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक विद्याधर वालावलकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

## प्लास्टिकमुळे पर्यावरणास कशा प्रकारे धोका आहे?

**साप्ताहिक संवाद**

प्लास्टिक या धातूचा शोध इतर धातूंना पर्याय म्हणून मानवानेच लावलेला आहे. मात्र सध्या याच प्लास्टिकचा अतिरेकी वापर इतका वाढलेला आहे कि संपूर्ण पर्यावरणाचं धोक्यात आलेले आहे. या प्लास्टिकचे विघटन वर्षानुवर्षे होत नाही त्यामुळे आपण इतस्ततः फेकून दिलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या,पिशव्या आणि तत्सम वस्तूमुळे छोटी गटार,नद्या,समुद्रामध्ये देखील या प्लास्टिकचा इतक्या महाकाय स्वरूपात कचरा निर्माण होतोय कि त्याचा जलचर आणि सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झालेला आहे. अनवधानाने हेच प्लास्टिक पोटात गेल्याने जनावर आणि जलचर मृत्युमुखी पडतातच,शिवाय प्लॅस्टिकच्या डब्यामध्ये खाद्यपदार्थ ठेवल्याने आणि प्लास्टिक बाटल्यांमध्ये पाणी प्यायल्याने मनुष्याला कर्करोगाचा धोका देखील तितकाच वाढलेला आहे. याच प्लास्टिक च्या कचऱ्यामुळे पावसाळ्यात अक्षरशः पूर येतात अर्थात यामुळेच अनेक अर्थाने पर्यावरणास या प्लास्टिकचा धोका आहे.

## प्लास्टिकची पुनर्निर्मिती शक्य आहे का?

पर्यावरणीय आणि आर्थिक शाश्ववता या उद्दिष्टाचा एक महत्वाचा पैलू म्हणून भारतात प्लॅस्टिकच्या पुनर्निर्मितीने वेग घेतला आहे. तसेच वर्तुळाकार अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक म्हणून त्याला मान्यताही दिली आहे. त्यात भविष्यातील संभाव्य वाढ आणि पर्यावरणीय नियम समाविष्ट आहेत. स्वच्छ ऊर्जा आणि पर्यावरणाची शाश्वतता वाढविण्यासाठी प्लॅस्टिकची पुनर्निर्मिती महत्वाची ठरते. प्लॅस्टिकच्या पुनर्निर्णमतीमुळे ऊर्जेची लक्षणीय बचत होत असल्याचे देखील अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. संशोधनपर अभ्यासातून एक टन प्लॅस्टिकच्या पुनर्निर्णमतीतून ५,७४४ किलो वाट प्रतितास ऊर्जा आणि १६. ३ बॅरल तेलाची बचत होऊ शकते.

## पर्यावरण संवर्धनासाठी प्लास्टिक मुक्ती कशा प्रकारे शक्य आहे?

आपल्याला जर शाश्वत आणि सुंदर पर्यावरण हवे असेल तर प्लास्टिक मुक्ती अर्थात प्लास्टिकला नकार हा अगदी व्यक्तिनुरूप करायला हवा. बाजारात गेल्यानंतर अगदी कमी मायक्रॉनच्या पर्यावरणास धोकादायक अशा पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठी प्रत्येकाने नियमित कापडी पिशवी बाजारात घेऊन जाण्याची सवय लावून घ्यायलाच हवी. अगदी गरज असेल तरच घरात प्लॅस्टिकच्या भांड्यांचा अगदी कमीत कमी वापर करावा. प्लास्टिक च्या बाटल्यांमध्ये पाणी पिऊन कर्करोगाला निमंत्रण देण्यापेक्षा चहा,कोफी आणि पाणी हि पेय काचेच्या ग्लास किंवा कपमध्येच पिण्याचा आग्रह धरावा.कचरा असलेले प्लास्टिक इतस्ततः फेकून पर्यावरणास धोका पोहचवण्यापेक्षा याच कचऱ्याची शाशत्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी हे प्लास्टिक पुनर्निर्मिती केंद्राला देणे असे अनेक उपाय योजून प्लास्टिकमुक्ती करता येन सहज शक्य आहे.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

---

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 64



### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**

43 38

- ईश
- उद
- घाट
- जन
- टर
- तळ
- तीज
- त्याग
- दव

दीक्षा

- द्रव
- नाका
- नीला
- पण
- पक्षी
- पैका
- बोट
- भाग
- भूक
- भेळ
- मना
- रट
- रण
- रब्बी
- रव
- राजी
- लाग
- लाज
- वाचा
- वायू
- विग
- शक
- शुष्क
- शेला

**तीन अक्षरी**

- आजन्म
- कनक
- कपट
- गजरा
- गहन
- चंदन
- जटायू
- जारज
- दहन
- दीपक
- धमाका
- पदक
- पावली
- पूजक
- भरती
- रहस्य
- वाहिका
- विठ्ठल
- संदल
- संग्रह
- हाजीर

**चार अक्षरी**

- अपमान
- आनाकानी
- आमंत्रण
- जन्मभूमी
- जवाहिर
- टकमक
- गुणकारी
- पलटण
- पुरवणी
- बोळवण
- भागुबाई
- महाराजा
- वायुपुत्र
- विणकर
- सत्याग्रह
- सुविचार
- हाहाकार

**पाच अक्षरी**

- करपुष्कर
- करक्षालन
- कवतिक
- परीटघाट
- शुभकामना

**सहा अक्षरी**

- पराचा कावळा
- सुभाषचंद्र बोस

**अन्य अक्षरी**

- वायूभारमापक
- हनुमंताची शेपूट

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

---

# महाशब्दकोडे 444



**—: आडवे संकेत :—**

1) महाराष्ट्राचे एक भूतपूर्व मुख्यमंत्री
4) पहाटेस देवाचे नाव घेणे
6) भाडे, किराया, मजुरी
8) हुकूम, आदेश
9) चवथा भाग, चतुर्थांश
10) वस्त्र विणण्याचे यंत्र
12) परिणामकारक, प्रभावी
16) सोबती,नोकर, दास
18) पैज, होड
19) इतरांपेक्षा चांगला
22) याच्या साहाय्याने बाण मारला जातो
23) पितळी भांड्यांना कल्हई लावण्याच्या कामी येणारा एक क्षार
25) मगर, सुसर
26) संगीतातील पाचवा सूर
27) आईच्या आई वडिलांचे घर
28) एक धान्य विशेष
29) मृदु, नाजूक, सुंदर
30) तृण, चारा
32) सरकारी नियम, न्यायाची बाजू
33) मदनाची स्त्री
35) बुद्धी, जाणण्याची शक्ति
36) डोके, मस्तक
37) मोराचे एकसारखे ओरडणे
40) कैफ, धुंदी
42) दोष, उणीव
43) वर्तुळाचा 360 वा भाग
44) क्रिकेटमधील धाव (इं.)
45) कल्याणप्रद, हितकर
47) चातुर्य, हुशारी, हातोटी
50) गायी, म्हशी पाळून दुधाचा धंदा करणारा, गुराखी
51) आपल्या मृत्यूनंतर आपले डोळे दुसऱ्या कुणाच्या तरी कामी यावे म्हणून आपल्या डोळ्याचे दान करणे
52) दाट, मेघ
53) मुसलमानांचा अभिवादनार्थ शब्द
54) लग्नात वरमाय व मानकरणीकरीता अंथरावयाच्या घड्या
55) हाताने लिहिलेले अक्षर, स्वाक्षरी
58) अतिरेक, जोर (उर्दू)
60) कानापर्यंत
61) ओळख
64) न्याय मिळविण्याकरिता कोर्टात चालविलेला खटला
65) दुर्बळ, अशक्त
67) शत्रु, वाईट चिंतणारा
68) आवाज, नाद
69) शरीराला पोषक असे
70) तळ्यात उत्पन्न होणारे एक फूल

**—: उभे संकेत :—**

1) केवळ स्वतःचाच स्वार्थ बघणारा
2) श्रीरामाचा निस्सिम भक्त
3) उत्साह, त्वेष
4) तीव्र बुद्धिमत्ता, योग्यता, हिंमत
5) आकलन शक्ति, ग्रहण शक्ति
6) अंश, खंड
7) एक राशी
9) साखरेत पाणी घालून उकळून केलेली चाचणी
11) मानव
13) काम, कृती
14) डोळ्यास थंडावा आणणारे एक औषध
15) संगीतातील स्वरांची रागवाचक सताल रचना
16) पुस्तकातील विषयांची प्रकरणाची सूची
17) फसवून पलायन करणे (हिं.)
19) एक भित्रा व कापसासारखा दिसणारा पाणी
20) शासक, राज्यकर्ते
21) अभियंता, यंत्रज्ञ(इं.)
22) कर्ज देणारा
24) काठी वगैरे मारल्याने अंगावर उठणारे त्या आकाराचे चिन्ह
27) अगत्यपूर्वक
31) पाणी आरसा इत्यादिंच्या पृष्ठभागावर दिसते ते पदार्थाचे प्रतिरुप
32) काळा–तांबडा भोपळा
34) पवित्र स्थळ, यात्रेची जागा, पुण्यक्षेत्र
37) विष्णूच्या चोवीस नावातील पहिले नाव
38) देणगी, आशीर्वाद
39) एकजीव झालेला, लय पावलेला
41) भाजीपाला
43) इंग्रजीतील बॉडीगार्ड
46) उंटाच्या पाठीवर असणारा उंच भाग
48) योग्य वेळी योग्य गोष्ट सुचणे
49) अंतःकरणाची जागृत स्थिती
51) नियुक्ती, नेमणे
52) कालमापक यंत्र
53) अधिकार, प्रभूत्व
55) हस्त कौशल्य, हाताची कारागिरी
56) येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ, वाहतूक
57) काम, मत्सर इत्यादींनी युक्त अशी दृष्टी
59) गव्हाचे दाणेदार पीठ
60) स्वरूप, आकृती
62) साहित्यातील एक शब्दालंकार
63) लग्न, मुंजी वगैरे झाल्यानंतर करावयाचा एक विधी
66) रग, सत्व (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

---

## राशी-भविष्य

**मेष :** जुना आजार त्रास देऊ शकतो. वादांना प्रोत्साहन देऊ नका. सरकारची भीती राहील. घाई टाळा. योजना फलदायी ठरतील.

**वृषभ:** धर्मात रस असेल. सत्संगाचा फायदा होईल. धार्मिक कार्यांवर खर्च होईल. व्यवसाय फायदेशीर राहील. विवेकाने काम करा.

**मिथून :** व्यवहारात घाई करू नका. व्यवसाय चांगला चालेल. नोकरीत कामाचा ताण असेल. सहकारी तुम्हाला साथ देणार नाहीत. घाई करू नका.

**कर्क :** नोकरीत प्रभाव वाढेल. काही मोठे काम पूर्ण झाल्यामुळे आनंद होईल. अनपेक्षित नफा होऊ शकतो. आनंदाचे साधन जमतील. नवीन कपडे आणि दागिन्यांवर खर्च होईल.

**सिंह :** पैसे मिळवणे सोपे होईल. तुम्हाला काही मोठे काम करण्याची इच्छा असेल. व्यवसाय चांगला चालेल. रोजगार वाढेल.

**कन्या :** आरोग्यावर मोठा खर्च होऊ शकतो. तुम्हाला कर्ज घ्यावे लागू शकते. निर्णय घेताना घाई करू नका. अनावश्यक वादाची परिस्थिती उद्भवू शकते.

**तुळ :** तुम्हाला चांगली बातमी मिळेल. प्रवास यशस्वी होईल. आत्मविश्वास वाढेल. घरी पाहुणे येतील. खर्च होईल. तुम्ही नवीन मित्र बनवाल.

**वृश्चिक :** घरातून आणि बाहेरून चौकशी होईल. तुमच्या कष्टाचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल. तुम्ही जोखीम घेण्याचे धाडस करू शकाल.

**धनु :** तुमचे तुमच्या जवळच्या व्यक्तीशी भांडण होऊ शकते. तुमच्या बोलण्यात मृदू शब्द वापरणे टाळा. तुम्हाला वाईट बातमी मिळू शकते.

**मकर :** विद्यार्थ्यांना त्यांच्या कामात यश मिळेल. एकाग्रता राहील. व्यवसाय वाढेल. तुम्हाला एखाद्या उत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल. घरात आणि बाहेर आनंद राहील.

**कुंभ :** कायमस्वरूपी मालमत्तेत वाढ होण्याची शक्यता आहे. मोठे फायदेशीर सौदे होऊ शकतात. बेरोजगारी दूर करण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. प्रगतीचा मार्ग मोकळा होईल.

**मीन :** तुम्हाला सरकारी मदत मिळेल. अडकलेल्या कामांना गती मिळेल. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न



**अकोला:** दहावी,बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच रोकडे मंगल कार्यालयात संपन्न झाला. आदिवासी कोळी महादेव विकास संघ अकोला. बेरार आदिवासी कोळी महादेव जमात अकोला. वऱ्हाड प्रांत वधू वर आदिवासी कोळी महादेव जमात अकोला हे दरवर्षी गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनीचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम साजरा करत असतात याही वर्षी गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी सत्कार समारंभाचे आयोजन केले होते या वेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. शांताराम बुटे . सुरेश बुटे,अरुण किरडे, ॲड. पंढरीनाथ डांगरे, सुधाकर घुगरे,शंकरराव इंगळे, रघुनाथ खडसे, अनिल फुकट,रामकृष्ण आपोतीकर, लता थोरात, शारदा कोलटके, कल्पना थोरात, कल्पना मोरे व समाज बांधव यांच्या उपस्थितीत महर्षी वाल्मिकी महादेव व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. पाहुण्यांच्या हस्ते दहावी बारावी झालेले गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा ट्रॉफी अभंगवाणीचे पुस्तक गुणगौरव विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी काही मान्यवरांनी विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन मनोगत करण्यात आले त्यानंतर विद्यार्थी विद्यार्थिनी व पाल्यांना नाश्त्याचे वितरण करण्यात आले या गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी सत्कार समारंभाचा विद्यार्थी विद्यार्थिनी व पाल्यांनी आनंद घेतला तसेच या गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी सत्कार समारंभाचा कार्यक्रम यशस्वीतेसाठी जीवन किरडे, जयदीप कोलटके. निलेश धनी रामुभाऊ. खडसे विजय. कोलटके, व समाज बांधव यांनी अधिक परिश्रम घेऊन हा गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी सत्कार समारंभाचा कार्यक्रम यशस्वी करून दाखविला या गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनी सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल फुकट यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश रावजी बुटे यांनी मानले

### स्वरूपखेड येथे शेतकरी प्रशिक्षण



स्वरूपखेड : येथे शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते या प्रशिक्षणामध्ये सहाय्यक कृषी अधिकारी उद्धव धुमाळे यांनी शेतकऱ्यांना हंगाम पूर्व मशागत बियाणे उगवण क्षमता तपासणी माती नमुना काढणे बीजप्रक्रिया एकात्मिक खत व्यवस्थापन एकात्मिक तन व्यवस्थापन सोयाबीन पिकाविषयी माहिती देण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्याचे आवाहन केले. फळबाग लागवड करण्याकरिता १०० टक्के अनुदान असल्याचे सांगितले.हा कार्यक्रम समाजसेवक जीवन परघरमोर यांच्या सहकार्याने पार पाडण्यात आला. शेतकरी विषयी आमदार देशमुख यांना खूप तळमळ असल्यामुळे प्रशिक्षण ठेवून कार्यक्रम केल्याचा जीवन परघरमोर यांनी प्रास्ताविकमध्ये संगितले , कार्यक्रमाचे आभार गजानन मेहनकार यांनी केले.

### जिल्हा नार्को कोऑर्डिनेशन सेंटर समितीची बैठक संपन्न

**अकोला :** तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पालकांनी सुध्दा सावध राहणे गरजेचे असून शाळा, महाविद्यालय परिसरात अमली पदार्थांच्या गैरवापराबाबत जनजागृती करावी जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्रे व पुनर्वसन केंद्राचे पर्यवेक्षण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन सेंटर समितीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, राज्य उत्पादन शुल्क विभाग अधीक्षक सीमा झाबरे, प्रवर डाक अधीक्षक सीव्ही रामा रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक शंकर शेळके, वाहतूक पोलीस निरीक्षक मनोज बहुरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री कुंभार म्हणाले की जिल्ह्यातील व्यसनमुक्ती केंद्राची वेळोवेळी तपासणी करून उपचार घेणाऱ्यांकडून अमली पदार्थ सेवनासंदर्भात संपूर्ण माहिती घेऊन अमली पदार्थ उपलब्ध होण्याचे सोर्स तपासावे तसेच व्यसनमुक्ती केंद्र मध्ये उपचार घेणाऱ्यांचे समुपदेशन करावे.रेल्वे स्थानकावर तपासण्या वाढवाव्यात.अकोला पोलीस विभागाच्या वतीने १ मे ते ३१ मे दरम्यान राबवीण्यात आलेल्या अमली पदार्थ विरोधी विशेष मोहिमेंतर्गत २२ गुन्हे दाखल करण्यात आले असून १९ आरोपींना अटक करण्यात आली,आरोपींकडून १५ लाख ६२ हजार ३४४ रुपये किमतीचा ७८ किलो ७२४ ग्राम गांजा जप्त करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.अमलीपदार्थ तस्करी विरोधी धोरणात्मक बाबींमध्ये समन्वय राखणे, वाढत्या अमली पदार्थांच्या वापरावर आळा घालणे, अमली पदार्थाबाबतची समस्या प्रभावीपणे हाताळण्यासाठी जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन सेंटर समिती कार्यरत आहे.

# घरकुलांचे अनुदान मिळाल्यानंतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांना आली जाग

## प्रवीण पोहरकार यांचा आरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**तेल्हारा: दि. ६ :** नगरपरिषद अंतर्गत शहरामध्ये घरकूलासाठी पंतप्रधान आवास योजना चालू आहे या योजनेअंतर्गत घरकुलधारकांना गेल्या अनेक महिन्यांपासून अनुदान मिळाले नव्हते. परंतु आता नुकतेच अनुदान मिळाल्यानंतर,म्हणजेच अनुदान मिळाल्याची चाहूल लागताच भाजपच्या पदाधिकाऱ्यांना जाग आली व त्यांनी घरकुलधारकांना अनुदान देण्यात यावे. अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन दिले असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे शहर महासचिव प्रवीण पोहरकार यांनी केला आहे.

तेल्हारा शहरामध्ये अनेकांनी घरकुल चे काम पूर्ण केले असून बहुतांश नागरिकांनी अनुदाना अभावी बांधकाम केले नाही काहींचे बांधकाम अर्धवट आहेत त्यांना उसनवारी करावी लागते अशांना घरकुल चे पैसे देण्यात यावे याबाबतची निवेदन भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपरिषदेला नुकतेच दिले हा भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा आम्ही घरकुलधारकांच्या पाठीशी उभे आहोत.

गेल्या अनेक महिन्यांपासून पंतप्रधान आवास योजना अंतर्गत घरकुलधारकांना अनुदान मिळाले नव्हते कारण शासनाकडून निधीच मिळाला नव्हता असे पालिका प्रशासनाचे मत होते परंतु नुकताच निधी प्राप्त झाल्याची चाहूल लागताच भाजपच्या पदाधिकाऱ्यांना घरकुलधारकांचा कळवळा आला परंतु गेल्या अनेक महिन्यांपासून घरकुल धारकांना अनुदान मिळाला नाही त्याबाबत गेल्या अनेक महिन्यांनपूर्वी भाजपने घरकुलच्या पैशांकरिता मागणी का केली नाही? त्यावेळेस भाजपचे पदाधिकारी झोपले होते काय ? असा प्रश्न वंचितच्या कडून उपस्थित केला गेला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून तेल्हारा शहरातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत अनेक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे शहरातील अनेक विकास कामातील गैरप्रकार समस्यांबाबत वर्तमानपत्रांमध्ये दररोज बातम्या प्रकाशित होत आहेत याबाबत भाजपच्या पदाधिकाऱ्यांना या समस्या दिसत नाहीत का? त्याकरिता भाजपचे पदाधिकारी आंदोलन करून मागणी का करत नाहीत? चुप्पी साधून का बसले? , गुंठेवारी नियमित करण्याचा प्रश्न व काही भागातील आरक्षणाचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे त्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे अनेक गोरगरीब जनता घरकुल योजने पासून वंचित आहेत स्टॅम्पधारक मालमत्ताधारकांना अद्यापपर्यंत घरकुल मिळाले नाही हे ज्वलंत प्रश्न केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असून सुद्धा भाजपच्या पदाधिकाऱ्यांना दिसत नाहीत काय ? नागरिकांनी आपल्या रास्त मागणी करिता आंदोलन केले असता पालिका प्रशासनाला जाग येते व पालिका प्रशासन ते प्रश्न मार्गी लावतात त्याचे श्रेय हे आंदोलन करणाऱ्या नागरिकांचे असताना आंदोलनकर्त्यांचे प्रश्न मार्गी लागताच भाजपचे पदाधिकारी त्याचे श्रेय घेण्याकरिता कशाप्रकारे पुढे येतात याचे अनेक उदाहरणे देता येतील यापुढे गोरगरीब जनतेच्या भावनेशी खेळणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे पितळ उघडे पाडण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कुठलीही कसर सोडणार नाही असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे शहर महासचिव प्रवीण पोहरकार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिला आहे.

## आदिवासी हक्कांसाठी 'अनुसूचित जमाती आयोग' महत्त्वाचे पाऊल – उमेश पवार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला : दि. ६ :** महाराष्ट्रात 'राज्य अनुसूचित जमाती आयोग' स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आल्याबद्दल अकोला जिल्ह्यातील एक लाख ३५ हजार आदिवासी बांधवांतर्फे महायुती सरकारचे अभिनंदन करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार यांनी शुक्रवारी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

उमेश पवार म्हणाले की, राज्याच्या निर्मितीनंतर प्रथमच आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या आयोगासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून, आदिवासी मंत्री अशोक उईके, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे त्यांनी विशेष आभार मानले.

या आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्य असतील. अनुसूचित जमातीच्या सशक्तीकरणासाठी, तसेच त्यांचे न्याय्य हक्क सुरक्षित करण्यासाठी हा आयोग कार्य करणार आहे. विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि स्थलांतरासंबंधी आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आयोग करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पवार यांनी सांगितले की, हा आयोग शासन, आदिवासी समाज आणि प्रशासन यांच्यातील एक मजबूत दुवा ठरेल. अकोला जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे आणि आमदार वसंत खंडेलवाल हे सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.११ जून रोजी आयोजित 'राजराजेश्वर नगर विकास संवाद सभा' या कार्यक्रमात आदिवासी बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही उमेश पवार यांनी यावेळी केले.

## कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचा 'ऑनर्ड फेलो अवॉर्ड'ने राष्ट्रीय सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला : दि. ६ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांना शिक्षण, संशोधन, विस्तार आणि विकासात्मक कार्यातील अतुलनीय योगदानाबद्दल ''ऑनर्ड फेलो अवॉर्ड २०२५'' ने गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार कॉन्फीडरेशन ऑफ हॉर्टीकल्चर असोसिएशन ऑफ इंडिया , नवी दिल्ली यांच्यावतीने राष्ट्रीय फलोत्पादन परिसंवादात प्रदान करण्यात आला.हा परिसंवाद नुकताच बिहार राज्यातील साबौर येथे आयोजित करण्यात आला होता. देशभरातील (उद्यानिकी) शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत डॉ. गडाख यांच्या नेतृत्वाखालील कार्याचा गौरव झाला.या वेळी महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांच्या संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीची महत्त्वपूर्ण ५३ वी सभा परभणीत असल्यामुळे डॉ. गडाख यांच्यावतीने प्रा. डॉ. प्रकाश कडू, संचालक, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, नागपूर यांनी हा सन्मान स्वीकारला.या प्रतिष्ठित पुरस्कारामुळे संपूर्ण विद्यापीठात आनंदाचे वातावरण असून, कुलगुरू कार्यालयात झालेल्या सत्कार सोहळ्यात डॉ. विलास खर्चे, डॉ. धनराज उंदीरवाडे, डॉ. सुरेंद्र काळबांडे, डॉ. अरविंद सोनकांबळे, डॉ. सतीश ठाकरे, प्रमोद पाटील, डॉ. नितीन कोष्टी, डॉ. किशोर बिडवे, डॉ. ज्ञानेश्वर माळी, अमित राठोड आदी उपस्थित होते.या यशाबद्दल कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे विद्यापीठ परिवाराच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

## २१ दिवसांचे मोफत रांगोळी प्रशिक्षण संपन्न

### राज्यस्तरीय गालिचा रांगोळी स्पर्धेसाठी समर्पण विषयावर संपन्न झाल्या स्पर्धा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी







**अकोला : दि. ६ :** कलागुरू बाय इरा रांगोळी आर्टस् आयोजित राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय स्पर्धा २०२५-२६ ही १ जून २०२५ रोजी विद्या विकास विद्यालय सहकारनगर येथे संपन्न झाली .यामध्ये २१ दिवसांचे मोफत रांगोळी प्रशिक्षण घेतल्यानंतर प्रत्येक जिल्ह्यातून एक कलाकार निवडण्यात आला. ह्या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेत विजेते ठरलेले विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यस्तरीय गालिचा रांगोळी स्पर्धेसाठी स्पर्धकांना समर्पण हा विषय देण्यात आला होता. अमरावतीचा गौरव वाघमारे ठरला महाराष्ट्राचा राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धे चा विजेता.द्वितीय क्रमांक अकोल्याच्या प्रीती घनबहादूर यांना मिळाले तसेच तृतीय पारितोषिक लातूरच्या प्रज्ञा शेळके यांना मिळाले.या स्पर्धेचे उद्घाटन बसवराज करशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला होता. बसवराज यांनी आपले अमूल्य अनुभव सांगून उपस्थित स्पर्धकाना प्रोत्साहित केले आणि ह्या रांगोळी प्रशिक्षण वर्गाचे फायदे आणि रांगोळी काढताना स्वतःची काळजी कशी घ्यावी ह्या बद्दल मार्गदर्शन केले.स्पर्धेसाठी १५ जिल्ह्यातून कलाकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ स्वरदा हसबनीस यांनी केले आणि आभार अध्यक्ष निलेश रावखंडे यांनी मानले आणि कलागुरू च्या पुढील मेहंदी प्रशिक्षण वर्गाची माहिती दिली.

## 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अकोल्यात एकाच दिवशी धडक

### ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त, ६ आरोपींवर गुन्हे दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला : दि. ६ :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चटन करण्यासाठी अंमलात आणलेल्या ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी ५ जून २०२५ रोजी बाळापूर, डाबकी रोड व दहीहंडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी केलेल्या तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये एकूण ९५ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत एकूण ६ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या कारवायांसाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे व पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक सक्रिय करण्यात आले होते.

बाळापूर अवैध दारू तस्करीवर कारवाई

ग्राम दथम फाटा येथे राजू उर्फ विजय लक्ष्मण इंगळे (रा. व्याळा) याच्या ताब्यातून २२० देशी दारूच्या बाटल्या (११,९०० रु.) व एक दुचाकी (७०,००० रु.) असा एकूण ८१,९००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त. संबंधितावर गुन्हा दाखल.

डाबकी रोड जुगार अड्ड्यावर छापा

खैर मोहम्मद प्लॉट येथे ३ आरोपींच्या ताब्यातून ८३००/- रुपयांची रोख रक्कम व १ मोबाईल (१५०० रु.) असा ९,८००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. आरोपी : शेख नजीर शेख जमीर, मंगेश दिगंबर अहिर, शेख साजिद शेख सादिक दहीहंडा चोहोट्टा बाजारमध्ये जुगार कारवाईभरत लक्ष्मणराव दामोदर व नदीम शहा रशीद शहा यांच्याकडून ३ हजार४७०रुपयांचा जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त.

या सर्व कारवायांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार महेंद्र मलिये, अविनाश वशी, इजाज अहमद, अशोक सोनवने, भारकर, अन्सार, खुशाल नेमाडे, आकाश मानकर, धीरज वानखडे, मो. आमीर यांनी सहभाग घेतला.अवैध धंद्यांविषयी कोणतीही माहिती असल्यास तात्काळ पोलीसांना कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल.

## प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहिमेंतर्गत हुतात्मा स्मारक येथे वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला : दि. ६ :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अकोला महानगरपालिकेच्या वतीने ''प्लास्टिक प्रदूषणाच्या निर्मूलनाचे महत्त्व'' या मोहिमेअंतर्गत हुतात्मा स्मारक येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मा. आमदार श्री. वसंतजी खंडेलवाल यांच्या हस्ते संपन्न झाला.मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशानुसार २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत ही विशेष मोहिम राबविण्यात आली. त्याच पार्श्वभूमीवर ५ जून रोजी संध्याकाळी आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात मा. आमदार खंडेलवाल यांनी पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.''या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी. वृक्षारोपण-२०२५ मोहिमेत सक्रीय सहभाग ही काळाची गरज आहे,'' असे आवाहन खंडेलवाल यांनी केले.या कार्यक्रमाला शामबाबू खंडेलवाल, आशीष ढोणे यांची उपस्थिती लाभली. तसेच मनपाचे पर्यावरण अधिकारी अनिल बिडवे, स्वच्छता विभाग प्रमुख संजय खोसे, जी.आय.एस. विभाग प्रमुख चंदन प्रसाद, शहर समन्वयक सैय्यद अफाक, गौतम कांबळे, सतीष दांदडे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या पुढाकारातून आणि नागरिकांच्या सहकार्याने शहरात हरित क्रांती घडविण्याचा निर्धार या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला : दि. ६ :** मातंग समाजासाठी मोठ्या प्रमाणात योगदान देणाऱ्या वेदांतिका बहुउद्देशीय संस्था यांनी शेकडो नवविवाहितांचें संसारवेल फुलविलेली आहे. दीन दुबळ्यांना व दुःखी लोकांना संस्थेच्या वतीने विविध वाटप करण्यात येतात व मोलाचे सहकार्य करण्यात येते त्यामुळे पूर्ण महाराष्ट्रामध्ये वेदांतिका बहुउद्देशीय संस्था नावाजलेली संस्था झाली असून संस्थेच्या वतीने १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार कार्यकम संपन्न झाला . ही संस्था अनेक वर्षापासूनची आहे. मातंग समाजाच्याच नव्हे तर अनेक जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांकरता कार्यरत आहे या संस्थेचे प्रथमतः विद्यार्थी घडविणे व त्याला शासकीय सेवैत सामावून घेण्यापर्यंत प्रयत्न करणे हे उद्दिष्ट आहे या .संस्थेच्या अध्यक्षांच्या वतीने पोलीस बँडसह अनेक प्रकारच्या रिक्त जागेवर मेहनती विद्यार्थ्यांना पोहोचविल्या जाते हाच संस्थेचा मुख्य उद्देश आहे. शालेय जीवनातील विद्यार्थ्यांना शिक्षणाबाबत प्रोत्साहित करून तो स्पर्धेच्या युगात कसा टिकेल यासाठी विद्यार्थी घडविले जातात. संस्थेचे घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून महादेवराव खंडारे ( पोलीस निरीक्षक अकोला) , सुनील खंडारे ( ) , प्रा. संतोष कुटे योगेश सोनवणे शंकर कंकाळ यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.याप्रसंगी विद्यार्थ्यांना पोलीस बँड्समन व गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देण्यात आले आणि सोबतच, करण अवचार या तरुणाला सुद्धा ( मध्ये पोस्ट) गाठल्याबद्दल सन्मानित करण्यात आले .याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक , रुखमाताई सदाशिव( संस्थापक वेदांतिका कला व शैक्षणिक संस्था) व महादेवराव सदाशिव यांनी कोणताही राजकीय पुढारी यांना थारा.न देता यावर्षी सामाजिक क्षेत्रातील ज्यांनी शालेय जीवनात अभ्यासाला महत्व देऊन व परिस्थितीवर मात करून आज मातंग समाजामधून समाज भूषण व कर्तबगार व्यक्तींना बोलावून त्यांचा मानसन्मान करून महादेव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पाडला यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव पारेकर अक्षय पाटेकर व प्रास्ताविक उमेश तायडे ) यांनी पार पाडले. याप्रसंगी कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे म्हणून अजय (डोंगरे वर्धा), चंद्रभान पोळकर (वाशिम), रमेश तायडे, अविनाश कांबळे ,गजानन साठे(समाजसेवक), पुरुषोत्तम वाघमारे, शुभम गायकवाड, आनंद मानकर, अमर इंगळे . आणि वेदांतिका कला क्रीडा अकॅडमीचे विद्यार्थी उमेश तायडे , अक्षय पाटेकर, चेतन जाधव, रणवीर गायकवाड, रोहित पोकळे, शुभम गोटे, वैभव डाबेराव, सचिन सरदार निखिल ढगे यांच्या उपस्थिती मध्ये हा कार्यक्रम पार पडला.

## बकरी ईद उत्सव बंदोबस्त: पोलीस यंत्रणा सज्ज



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट : दि. ६ :** दि.०७.०६.२०२५ रोजी बकरी ईद हा सण मुस्लीम बांधवाचे वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सदर बंदोबस्ताचे संबंधाने स्थानिक अकोट शहरामध्ये अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे मार्गदर्शनाखाली रुटमार्च घेण्यात आला. सदर रुटमार्च मध्ये अनमोल मित्तल, सहायक पोलीस अधीक्षक, अकोट उपविभाग, अकोट, पोनि. अमोल माळवे पोस्टे अकोट शहर, पोनि. किशोर जुनघरे पो.स्टे. अकोट ग्रामीण, सपोनि गजानन राठोड पो. स्टे. हिवरखेड, राज्य राखीव पोलीस दलाचे १ प्लाटुन, आर.सी.पी. चे १ प्लाटुन तसेच उपविभागातील पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार, दामिनी पथक यांचा सहभाग होता.सदरचा रुटमार्च पोलीस स्टेशन अकोट शहर येथे फॉलीन व नंतर पोलीस स्टेशन अकोट शहर येथून निघून श्री शिवाजी महाराज चौक, सोनु चौक, यात्रा चौक, सावरकर चौक, सोमवार वेस, खतीबपुरा, बाकरपुरा, शिवाजी नगर, मोठे बारगण, कुंभारवाडी, आंबोडी वेस, रूपलाल महाराज चौक, धारोळी वेस, सोनु चौक, शिवाजी महाराज चौक या मार्गाने याप्रमाणे अंदाजे ५ किलोमीटर फिरुन पोलीस स्टेशनला परत आला.



## पुढच्या वर्षी चुका सुधारण्याचा प्रयत्न-वैभव सूर्यवंशी

नवी दिल्ली, दि.६ प्रतिनिधी

पुढच्या वर्षी इंडियन प्रीमियर लीगमध्ये तो त्याचा संघ राजस्थान रॉयल्ससाठी दुप्पट चांगली कामगिरी करणार असल्याचे मत पहिल्या हंगामात अमिट छाप सोडणारा १४ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी याने व्यक्त केले. एप्रिलमध्ये जयपूरमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध ३८ चेंडूत सात चौकार आणि ११ षटकारांसह १०१ धावांच्या खेळीदरम्यान सूर्यवंशीने भारतीय फलंदाजाकडून सर्वात जलद शतक (३५ चेंडूत) करण्याचा विक्रम केला होता. या वादळी खेळीदरम्यान सूर्यवंशीने आयपीएलमध्ये दुसरे सर्वात जलद शतक करण्याचा विक्रमच केला नाही तर १४ वर्षे आणि ३२ दिवसांच्या वयात पुरुषांच्या टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात तरुण शतक करणारा फलंदाजही बनला. आयपीएलच्या अधिकृत वेबसाइटने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये सूर्यवंशी म्हणाला, ''आयपीएलमध्ये खेळणे हे प्रत्येकासाठी स्वप्नासारखे असते आणि माझ्या पहिल्या हंगामातून मला खूप सकारात्मक गोष्टी मिळाल्या आणि पुढच्या हंगामात मी संघासाठी काय करू शकतो, हे देखील मी शिकलो. रॉयल्सच्या निराशाजनक मोहिमेनंतरही, सूर्यवंशीला 'आयपीएल सुपर स्ट्रायकर ऑफ द सीझन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुढच्या वर्षी मी चुका सुधारण्याचा प्रयत्न करेन. माझे शिक्षण असे आहे की मला माझ्यापेक्षा दुप्पट चांगली कामगिरी करावी लागेल जेणेकरून माझा संघ पुढच्या वर्षी अंतिम फेरीत खेळू शकेल आणि पुढच्या वर्षी मी संघासाठी किती योगदान देऊ शकतो, यावर मी लक्ष केंद्रित करेन.

नव्या स्पर्धेत चांगले खेळण्याचा मानस सूर्यवंशीच्या कामगिरीमुळे त्याला मुंबईच्या आयुष म्हात्रेसह इंग्लंडच्या बहु-फॉर्मॅट दौऱ्यासाठी भारताच्या अंडर-१९ संघात निवडण्यात आले. म्हात्रेने आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून यशस्वी पदार्पण केले. ही एक नवीन स्पर्धा आहे. मी पहिल्यांदाच ब्रिटनला जात आहे म्हणून हा एक नवीन अनुभव असेल. तिथे खेळ कसा चालतो, हे मी अनुभवेन.वैभवने आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सकडून ७ सामने खेळले आहेत. या ७ सामन्यांच्या ७ डावात वैभवने २०६.५५ च्या स्ट्राइक रेटने २५२ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने १८ चौकार आणि २४ षटकार मारले आहेत. वैभवला पहिल्या ७ सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नव्हती. त्यानंतर, मात्र जेव्हा त्याला खेळण्याची संधी मिळाली, तेव्हा मात्र त्याने मागे वळून पाहिले नाही.

# नवीन कर्णधारासह टीम इंडिया ब्रिटिश भूमीकडे रवाना

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

आयपीएलचा थरार संपला असून आरसीबीने पहिल्यांदा आयपीएल टायटल जिंकले आहे. आता टीम इंडिया इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी सज्ज झाली आहे. त्यासाठी भारतीय संघ २० जूनपासून सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला रवाना झाला आहे. नवीन कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. पहिला कसोटी सामना २० जूनला खेळवण्यात येणार आहे. या कसोटी स्पर्धेसोबतच भारताची जागतिक कसोटी



अजिंक्यपद स्पर्धा देखील सुरू होणार आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहली या टीम इंडियाच्या दोन महत्त्वाच्या खेळाडूंनी आधीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. अशा परिस्थितीत, यावेळी संघ तरुण आणि अनुभवी खेळाडूं अशा मिश्रणासह ब्रिटिश भूमीवर खेळणार आहे. शुभमन गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर खेळाडूंना प्रोत्साहन देताना दिसून आले आहेत. यावेळी करुण नायर, साई सुदर्शन, शार्दुल ठाकूर यांचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे. टीम इंडियाच्या खेळाडूंकडून इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी काही फोटो शेअर केले आहेत. यामध्ये ऋषभ पंत, साई सुदर्शन, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज ही दिसून येत आहेत. कुलदीप यादव यांचे नुकतेच लग्न झाले असून तो काही दिवसांनी इंग्लंडला रवाना होणार आहे. कसोटी मालिकेसाठी खेळाडू खूप उत्सुक असल्याचे दिसत आहेत. त्यांनी सोशल मीडियावर फोटो देखील शेअर केले आहेत.रोहित शर्मा आणि विराट कोहली या टीम इंडियाच्या दिग्गज खेळाडूंनी कसोटी संघाची घोषणा होण्यापूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घोषित केलीय होती. अशा परिस्थितीत, यावेळी या दोन्ही खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे निश्चितच नवख्या संघावर आणि त्यातील खेळाडूंवर दबाव असणार आहे. इंग्लंड संघ निश्चितच या संधीचा फायदा घेण्यासाठी तयार असणार आहे.

## गॉफचा धमाका, सबालेन्काचा दबदबा

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या आर्यना सबालेन्का हिने फ्रेंच ओपन २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गुरुवारी झालेल्या महिला एकेरीच्या उपांत्य सामन्यात तिने चार वेळा विजेती राहिलेल्या इगा स्विएटेकचा ७-६(१), ४-६, ६-० असा पराभव केला. विशेष म्हणजे सबालेन्का पहिल्यांदाच या ग्रँड स्लॅमच्या जेतेपदाच्या सामन्यात पोहोचली आहे. त्याचबरोबर, हा तिचा एकूण सहावा ग्रँड स्लॅम फायनल आहे.अंतिम फ ेरीत सबालेन्काचा सामना जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाची अमेरिकन खेळाडू कोको गॉफशी होईल. महिला ग्रँड स्लॅम फायनलमध्ये



या दोन्ही खेळाडू पहिल्यांदाच एकमेकांविरुद्ध भिडतील. कोको गॉफने फ्रेंच वाइल्ड कार्ड असलेल्या लोइस बोइसनचा ६-१, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. गॉफने पहिल्यांदाच फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.२१ वर्षीय अमेरिकन खेळाडू यूएस ओपन (२०२३) नंतर तिचा दुसरा ग्रँड स्लॅम फायनल खेळणार आहे.

## इंग्लंडविरुद्धच्या कसोटीसाठी टीम इंडियाची सलामी जोडी ठरली!



नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी रोहित शर्माने कसोटीतून निवृत्तीची घोषणा केली. त्याच्या निवृत्तीनंतर संघाला शुभमन गिलच्या रुपात नवा कर्णधार मिळाला. पण त्याच्यानंतर संघाच्या सलामी जोडीत त्याची उणीव कोण भरून काढेल हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे टीम इंडियाच्या नवीन सलामी जोडी शोधण्याची वेळ आली आहे. भारत विरुद्ध इंग्लंड मालिकेत भारतासाठी कोण डावाची सुरुवात करेल. याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.भारतीय संघ २० जून रोजी इंग्लंडविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळणार आहे. त्यापूर्वी सध्या एक सराव सामना खेळला जात आहे. हा सामना इंडिया अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यात खेळला जात आहे, ज्यामध्ये भारताचे नेतृत्व अभिमन्यू ईश्वरनकडे सोपवण्यात आले आहे. केएल राहुल या संघाचा भाग नाही. पण तो इंग्लंडला पोहोचला असून इंग्लंड लायन्स विरुद्धच्या सामन्यात मैदानात उतरला.राहुल हा मुख्य कसोटी संघाचा भाग आहे. त्याने शुक्रवारी (दि. ६) इंडिया अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यातील सामना सुरू झाला तेव्हा यशस्वी जैस्वालसोबत सलामीची जबाबदारी स्वीकारली. या आधीच्या सामन्यात कर्णधार अभिमन्यू ईश्वरन आणि जैस्वाल यांनी डावाची सुरुवात केली होती. आयपीएल २०२५ चा हंगाम संपताच केएल राहुल इंग्लंडमध्ये पोहोचला आहे. शिवाय तो भारत अ संघाचा भाग नसूनही थेट इंग्लंद लायन्स विरुद्धच्या सामन्यात जैस्वालसोबत सलामीला मैदानात उतरला. यावरून असे दिसून येते की २० जून रोजी इंग्लंडविरुद्धच्या कसोटीत हीच जोडी टीम इंडियाच्या डावाची सुरुवात करताना दिसेल. जेव्हा टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली होती तेव्हा केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दोन सामन्यांमध्ये सलामी दिली होती. रोहित पहिल्या कसोटीला मुकला होता आणि शेवटच्या कसोटीत त्याला स्वतः ला प्लेइंग इलेव्हनमधून वगळण्यात आले.

## पतौडी ट्रॉफी नाव बदलून तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी केल्याने सुनील गावसकर संतप्त

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

काही दिवसांवर आलेल्या भारत विरूद्ध इंग्लंड ही कसोटी क्रिकेट मालिका क्रिकेटप्रेमींसाठी एक मोठी उत्सुकतेची ठरणार आहे. या सीरीजला इंग्लंड क्रिकेट बोर्डाने एक नवे नाव दिले आहे. ही ट्रॉफी यापुढे तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी (- ) म्हणून ओळखली जाणार आहे.

क्रिकेटमधील दोन महान खेळाडू सचिन तेंडुलकर आणि जेम्स अँडरसन यांच्या सन्मानार्थ हे नाव देण्यात आले असले तरी त्यावरून आता नाराजी व्यक्त होत आहे. कारण या ट्रॉफीचे पूर्वीचे नाव पतौडी ट्रॉफी असे होते. आणि पतौडी ट्रॉफीचे नाव बदलल्यावरून काही ज्येष्ठ खेळाडुंनी नाराजी व्यक्त केली आहे.२० जूनपासून लीड्समध्ये सुरू होणाऱ्या या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेमुळे क्रिकेटविश्वात मोठी चर्चा रंगली आहे. भारताचे ज्येष्ठ क्रिकेटपटू सुनील गावसकर यांनी पतौडी ट्रॉफीचं नाव बदलून 'तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी' केल्याच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. इंग्लंड व वेल्स क्रिकेट बोर्डाचा हा निर्णय त्यांनी अयोग्य आणि ऐतिहासिक परंपरेला धक्का देणारा असल्याचं म्हटलं आहे.



त्यांनी लिहिले आहे की, '''' पतौडी ट्रॉफी निवृत्त करत आहे ही बातमी खूपच अस्वस्थ करणारी आहे. याआधी कधी ऐकलं नव्हतं की एखाद्या दिग्गजाच्या सन्मानार्थ दिली जाणारी ट्रॉफी निवृत्त केली गेली आहे. एखादी ट्रॉफी, जी एखाद्या प्रतिष्ठित कुटुंबाच्या नावावर आहे, तिला निवृत्त करणे ही बाब चिंताजनक आहे.''

गावसकरांच्या मते, पतौडी कुटुंबाने भारत आणि इंग्लंड दोन्ही संघांसाठी मोठं योगदान दिलं आहे, आणि त्या ऐतिहासिक परंपरेचा अपमान झाला आहे.

ला ट्रॉफीचं नाव बदलण्याचा अधिकार आहे, मात्र गावसकर यांनी आशा व्यक्त केली की, भविष्यात भारतीय खेळाडूंनी आपलं नाव अशा ट्रॉफीला देण्यास नकार द्यावा, जेणेकरून अशाच पद्धतीने तीही कधी निवृत्त केली जाणार नाही. क्रिकेटमधील परंपरा, वारसा आणि ऐतिहासिक सन्मान टिकवणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, असंही त्यांनी नमूद केलं.या दोन्ही खेळाडुंच्या क्रिकेटमधील योगदानाला अनुसरून हे नाव देण्यात आले आहे. जगातील सर्वश्रेष्ठ फलंदाजांपैकी एक असलेल्या सचिन तेंडुलकरने कसोटी क्रिकेटमधील सर्वाधिक धावा (१५९२१ धावा) केल्या आहेत. त्याने १९८९ ते २०१३ या काळात २०० कसोटी सामने खेळले आहेत.

तर जेम्स अँडरसन हा इंग्लंडचा सर्वाधिक यशस्वी गोलंदाज आहे. त्याने कसोटीत सर्वाधिक बळी घेणारा जलदगती गोलंदाज (७०४ बळी) म्हणून नाव कमावले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर इंग्लंडचा बॉलिंग कन्सल्टंट म्हणून तो कार्यरत आहे.

तेंडुलकर आणि अँडरसन हे एकमेकांविरोधात १४ कसोटी सामन्यात आमनेसामने आले होते. त्यात अँडरसनने तेंडुलकरला सर्वाधिक ९ वेळा आऊट केले आहे.पतौडी ट्रॉफी २००७ पासून भारत आणि इंग्लंड यांच्यातील इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या कसोटी मालिकेसाठी दिली जात होती. पतौडी घराण्यातील इफ्तिखार अली खान पतौडी हे इंग्लंड आणि भारत दोन्ही संघांसाठी क्रिकेट खेळले होते. त्यांच्या मुलाने मन्सूर अली खान पतौडी यांनी ६० च्या दशकात भारताचे नेतृत्व केले होते.

ही नवीन ट्रॉफी - च्या धर्तीवर आहे, जी न्यूझीलंडचे मार्टिन क्रो आणि इंग्लंडचे ग्रॅहम थॉर्प यांच्या नावाने ओळखली जाते.भारतीय आणि इंग्लिश क्रिकेटमधील दोन दिग्गजांना सन्मान देण्याचा हा निर्णय असला, तरी पारंपरिक आणि ऐतिहासिक पतौडी ट्रॉफीला निरोप देणे काही चाहत्यांना खटकलेले आहे. दरम्यान, आता, सर्वांच्या नजरा तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफीच्या पहिल्या ऐतिहासिक सामन्याकडे लागल्या आहेत.

## सेंट्रल बँकेचा आयुर्विमा व्यवसायात प्रवेश

**मुंबई:** सार्वजनिक क्षेत्रातील सेंट्रल बँक ऑफ इंडियाने आयुर्विमा क्षेत्रातील फ्युचर जनराली इंडिया लाइफ इन्शुरन्समधील २५.१८ टक्के हिस्सा खरेदी केला असून, त्यायोगे संयुक्त भागीदारीसह आयुर्विमा व्यवसायात पाऊल टाकले आहे. दिवाळखोरी प्रक्रियेअंतर्गत सुमारे ५७ कोटी रुपयांना हा हिस्सा खरेदी करण्यात आला आहे, असे सेंट्रल बँकेने प्रमुख बाजार मंचांना गुरुवारी सूचित केले. चालू महिन्यातील ४ जूनला ६५.४३ कोटी समभाग अधिग्रहणासह, मुंबईत मुख्यालय असलेल्या बँकेने विमा क्षेत्रात पाऊल टाकले आहे. सध्या, सेंट्रल बँकेकडे फ्युचर जनराली इंडिया लाइफमधील २५.२८ टक्के हिस्सेदारी आहे. या विमा कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १,८१०.५३ कोटी रुपयांचा एकूण प्रीमियम उत्पन्न मिळवले होते.सेंट्रल बँकेने दिवाळखोरी प्रक्रियेअंतर्गत लावलेल्या बोलीच्या माध्यमातून फ्युचर जनराली इंडिया लाइफ इन्शुरन्स मधील २५.१८ टक्के हिस्सा खरेदी केला होता. त्याला भारतीय स्पर्धा आयोगाने अर्थात 'सीसीआय'ने मंजुरी दिली होती.'फ्युचर जनराली इंडिया लाइफ' ही बचत विमा, गुंतवणूक योजना (यूलिप), मुदत विमा योजना, आरोग्य विमा योजना, लहान मुलांशीसंबंधित योजना, सेवानिवृत्ती योजना, ग्रामीण विमा योजना आणि गट विमा योजनांची विक्री करते. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये, सेंट्रल बँकेने कर्जबाजारी फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेडच्या आयुर्विमा आणि सामान्य विमा उपक्रमांमधील हिस्सा संपादनासाठी यशस्वी बोली सादर केली होती.

फ्युचर जनराली इंडिया लाइफ इन्शुरन्स आणि फ्युचर जनराली इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेडमधील फ्युचर एंटरप्रायझेस लिमिटेडच्या श्रेणी १ मालमत्तेच्या विक्रीसाठी 'कर्जदात्यांच्या समिती'ने त्यांना यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले होते.फ्युचर जनराली इंडिया लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडमध्ये इटलीचा जनराली समूह ७३.९९ टक्के हिश्शासह सर्वात मोठा भागधारक आहे. तर फ्युचर एंटरप्रायझेसकडे उर्वरित २५ टक्के हिस्सा आहे. शिवाय या दिवाळखोर समूहाची फ्युचर जनराली लाइफ इन्शुरन्समध्ये ३३ टक्के हिस्सेदारी होती. मुंबईत मुख्यालय असलेल्या फ्युचर जनराली लाइफची २००६ मध्ये त्याची स्थापना झाली .

# एलॉन मस्क यांच्या स्टारलिंक इंटरनेटची लवकरच भारतात एण्ट्री

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

### दूरसंचार मंत्रालयाकडून परवाना मंजूर

अमेरिकन उद्योगपती एलॉन मस्क यांच्या उपग्रह इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या स्टारलिंकला केंद्र सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाने एक महत्त्वाचा परवाना दिला असून, या परवान्यामुळे स्टारलिंकचा भारतात व्यावसायिक इंटरनेट सेवा पुरवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याबाबत रॉयटर्स वृत्तसंस्थेला संबंधित सूत्रांनी शुक्रवारी माहिती दिली आहे. मस्क यांची स्टारलिंक या प्रकरचा परवाना मिळवणारी तिसरी कंपनी आहे. दूरसंचार मंत्रालयाने यापूर्वी युटेलसॅटच्या वनवेब आणि रिलायन्स जिओलाही




हा परवाना दिला आहे.दरम्यान, स्टारलिंक आणि दूरसंचार मंत्रालयाला या प्रकरणाबाबतच्या माहितीसाठी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मस्क यांची स्टारलिंक कंपनी २०२२ पासून भारतात व्यावसायिक इंटरनेट सेवेच्या परवान्यांसाठी वाट पाहत आहे, परंतु राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणांमुळे याला विलंब होत आहे.अमेरिकन उद्योगपती एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीची स्टारलिंक ही एक उपग्रह इंटरनेट सेवा आहे. मस्क यांच्या कंपनीचे १०० हून अधिक देशांमध्ये हाय-स्पीड डेटा सेवा पुरवण्याचे उद्दिष्ट आहे. स्टारलिंक इंटरनेट सेवा केबल-आधारित ब्रॉडबँड सेवांपेक्षा वेगळी असून, स्टारलिंक उपग्रह इंटरनेटसेवा आकाशाचे थेट दृश्य असलेल्या कोणत्याही ठिकाणी काम करते. पृथ्वीवरील दुर्गम ठिकाणीही इंटरनेट पुरवणे हा मस्क यांच्या कंपनीचा उद्देश आहे.

या सारख्या कंपन्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून इंटरनेट सेवा पुरवण्यास सुरुवात केली आहे; पण स्टारलिंक त्यांच्यापेक्षा पुढे आहे, कारण स्टारलिंक वायरलेस हाय-स्पीड इंटरनेट देऊ शकते. मोजक्या मोठ्या उपग्रहांवर अवलंबून राहण्याऐवजी, स्टारलिंक एकमेकांमध्ये सिग्नल प्रसारित करण्यासाठी लेसर असलेल्या अनेक लहान उपग्रहांचा वापर करते.स्टारलिंकचे इंटरनेट स्पीड फायबर किंवा केबल-आधारित सोल्यूशन्सइतके जास्त नसले तरी, जिथे इंटरनेट नाही किंवा वेग खूप कमी आहे अशा ठिकाणी ते खूप उपयुक्त आहे. काही काळापूर्वीपर्यंत स्टारलिंक सुमारे १५० एमबीपीएसची कमाल स्पीड देत होती, परंतु उपग्रहांची संख्या वाढल्यानंतर, अलीकडेच एक्सवर शेअर केलेल्या एका व्हिडिओमध्ये स्टारलिंकची इंटरनेट सेवा २६४ केबीपीएसपर्यंत कमाल स्पीड देत असल्याचे दिसून आले आहे.

## सुझुकी मोटरकडून 'स्विफ्ट'चे उत्पादन स्थगित

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

जपानची आघाडीची वाहन उत्पादक कंपनी असलेल्या सुझुकी मोटरने तिच्या लोकप्रिय 'स्विफ्ट' मोटारीचे उत्पादन तात्पुरते थांबविले आहे. चीनने दुर्मिळ खनिज संयुगाच्या (रेअर अर्थ मिनरल्स) निर्यातीवर बंधने आणल्यामुळे उत्पादनावर परिणाम झाला आहे, असे या प्रकरणाशी परिचित असलेल्या दोन व्यक्तींनी सांगितले.चीनच्या निर्यात निर्बंधांमुळे प्रभावित होणारी ही जपानमधील पहिली वाहन उत्पादक कंपनी आहे. दुर्मिळ खनिज संयुगाच्या कमतरतेचे कारण देत स्विफ्ट स्पोर्ट वगळता इतर प्रकारातील स्विफ्टचे उत्पादन २६ मे पासून थांबविले गेले आहे. कंपनीने उत्पादन पुन्हा सुरू करण्याच्या योजना अनेक वेळा पुढे ढकलली आहे. सुझुकी आता १३ जून रोजी उत्पादन अंशतः




पुन्हा सुरू करण्याची अपेक्षा आहे आणि १६ जूननंतर ते पूर्ण पुन्हा सुरू होईल, असे तिने एका निवेदनात स्पष्ट केले आहे.एप्रिल महिन्यात चीनने विविध प्रकारची दुर्मिळ खनिज संयुगे आणि चुंबकांची निर्यात तात्पुरती बंद करण्याच्या निर्णय घेतला. यामुळे वाहन निर्माते, एरोस्पेस उत्पादक, सेमीकंडक्टर कंपन्या आणि लष्करी कंत्राटदारांसाठी केंद्रस्थानी असलेल्या पुरवठा साखळ्यांना धक्का बसला आहे.

## सेवा क्षेत्रात मे महिन्यांत वाढ स्थिर

नवी दिल्ली, दि. ६ प्रतिनिधी

मागणीतील सुधारलेली परिस्थिती, नवीन ग्राहकांची वाढती संख्या आणि परिणामी रोजगारातही जलद वाढ नोंदविणाऱ्या सेवा क्षेत्रातील वाढ सरलेल्या मे महिन्यांत स्थिर राहिली, असे बुधवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणाने स्पष्ट केले. भारतातील सेवा व्यवसायातील खरेदी व्यवस्थापकांचा कल दर्शविणारा 'एचएसबीसी इंडिया सर्व्हिसेस पीएमआय' निर्देशांक मे महिन्यात किंचित वाढीसह ५८.८ गुणांवर नोंदला गेला. एप्रिलमध्ये हा गुणांक ५८.७ गुणांवर होता. उल्लेखनीय म्हणजे सेवा क्षेत्राचा निर्देशांक त्याच्या दीर्घकालीन सरासरी ५४.२ पेक्षा अधिक राहिला. कार्यादेशातील सकारात्मक वाढीला मे महिन्यात सेवा क्षेत्राने अनुभवले. सेवा क्षेत्राचा निर्देशांक ५० गुणांवर नोंदला गेल्यास विस्तार तर ५० गुणांखाली नोंदला गेल्यास आकुंचन झाल्याचे मानले जाते.एप्रिलपासून नवीन निर्यात व्यवसायात वाढ झाली आहे. शिवाय मजबूत आंतरराष्ट्रीय मागणीने सेवा क्रियाकलापांना चालना दिली. सर्वेक्षणानुसार, जाहिराती, मागणीत सातत्य आणि विद्यमान ग्राहकांकडून वारंवार येणाऱ्या कार्यादेशामुळे सेवा क्षेत्राची सक्रियता वाढली, असे एचएसबीसीचे मुख्य अर्थतज्ज्ञ प्रांजुल भंडारी म्हणाले. मे महिन्यात कंपन्यांनी



त्यांच्या सेवांच्या आंतरराष्ट्रीय मागणीत विक्रमी सुधारणा नोंदवली. विशेषतः आशिया, युरोप आणि उत्तर अमेरिकेतून मिळणाऱ्या निर्यात कार्यादेशात जलद वाढ नोंदवली गेली.वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, भारतातील सेवा प्रदात्यांनी कर्मचारी भरतीत मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. नोकऱ्यांच्या निर्मितीचा एकूण दर सर्वेक्षणाच्या इतिहासातील सर्वात मजबूत राहिला. कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ, अतिरिक्त कामाच्या तासांचे वेतन (ओव्हरटाइम पेमेंट), यामुळे कंपन्यांच्या खर्चात भर पडली आहे. काही कंपन्यांनी स्वयंपाकाचे तेल, साहित्य आणि मांसाहारावरील वाढलेल्या खर्चाचा उल्लेख देखील केला.

## थोडक्यात

### मानधन सन्मान योजनेसाठी अर्ज करा

**नागपूर :** राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेअंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील योगदान असलेल्या मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार यांना प्रतिमहिना रुपये ५ हजार मानधन देण्यात येते. पात्र लाभार्थी यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर तसेच आपले सरकार पोर्टलवर १ ते ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लाभार्थी पात्रता ज्यांचे वय ५० पेक्षा जास्त आहे. दिव्यांगांना वयाची अट १० वर्षाने शिथिल करण्यात येत आहेत. (दिव्यांगांना ४० वर्षे) ज्यांचे कला व साहित्य क्षेत्रातील योगदान कमीत कमी १५ वर्षे आहे. ज्यांनी साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाची भर घातली आहे. वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा/परितक्त्या/दिव्यांग कलाकर यांना प्राधान्य राहील. कलाकाराचे सर्व मार्गाने कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. ज्या कलाकारांची उपजीविका फक्त कलेवरच अवलंबून आहे, असे कलाकार तसेच जे कलाकार फक्त कलेवरच अवलंबून होते. सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गानेउत्पन्न नाही असे कलाकार. केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भुत नसलेले पात्र कलाकार. कलाकार, साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

### आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ

**नागपूर :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२५-२६ या वर्षाचे आरटीई २५ टक्के प्रवेशांतर्गत प्रतीक्षाधीन यादीतील चतुर्थ फेरीच्या प्रवेश २९ मेपर्यंत होते. यास मुदतवाढ मिळाली असून, चतुर्थ फेरीच्या प्रवेशाची ९ जून ही शेवटची तारीख आहे.

### जिल्हास्तरीय सर्वेक्षण समिती गठित

**नागपूर :** हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसनाविषयीच्या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय सर्वेक्षण समिती गठीत करण्यात आलेली आहे. जिल्हास्तरीय सर्वेक्षण समितीमध्ये पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त प्रतिनिधींची निवड करावयाची असल्यामुळे इच्छुकांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हाताने मैला उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत अशासकीय संघटनेचे दोन प्रतिनिधी, समुदायातील दोन प्रतिनिधी,ज्यामध्ये एक महिला असेल. इच्छुकांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, विंग-बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंदपेठ, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत प्रस्तावासहित प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच

## आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांचे आदेश; कर्मचाऱ्यांना मिळाले मास्क, गमबूट, सेफ्टी जॅकेट!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.६: नागपूर मनपाने स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत, 'सुरक्षा कवच' उपलब्ध केले आहे. आयुक्त डॉ. चौधरींच्या निर्देशाने, पावसाळ्यापूर्वी १० झोनमधील कर्मचाऱ्यांना मास्क, गमबूट, जॅकेटचे वाटप केले, ज्यामुळे त्यांच्या कामात सुरक्षितता येणार आहे.**



### पावसाळ्यातील कामासाठी विशेष सुरक्षा

पावसाळ्यात साचलेले पाणी, चिखल आणि वाढलेला संसर्गाचा धोका लक्षात घेता, स्वच्छता कर्मचाऱ्यांना गमबूट व रबरी हँडग्लोव्हज देण्यात आले आहेत. रात्रीच्या वेळी काम करताना चांगली दृश्यमानता राहावी, यासाठी सेफ्टी जॅकेट्स, तर कचऱ्यातील धुळीपासून आणि जंतूंपासून संरक्षणासाठी नोज मास्क देण्यात आले आहेत.

### नियोजनबद्ध प्रशासकीय अंमलबजावणी

आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानंतर, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, उपायुक्त राजेश भगत आणि मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी या मोहिमेचे यशस्वी नियोजन केले. प्रत्येक झोनची आणि विभागाची गरज ओळखून, आवश्यकतेनुसार सुरक्षा साहित्याचे नियोजनबद्ध वाटप करण्यात आले, ज्यामुळेही मोहीम प्रभावी ठरली.

नागपूर शहराला स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी दिवस-रात्र कार्यरत असणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने, नागपूर महानगरपालिकेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पावसाळ्याच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने, मनपाने आपल्या सर्व स्वच्छता दूतांना 'सुरक्षा कवच' म्हणून विविध सुरक्षा साहित्याचे नियोजनबद्ध वाटप सुरू केले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांनी दिलेल्या विशेष निर्देशानुसार, ही मोहीम अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त राजेश भगत व मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या देखरेखीखाली यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे. या उपक्र'मासाठी मनपाने विशेष निधी उपलब्ध करून दिला असून, त्यातून कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक असलेले नोज मास्क, हँडग्लोव्हज (रबरी व साधे), सेफ्टी जॅकेट्स आणि गमबूट यांसारख्या सुरक्षा साधनांची खरेदी करण्यात आली आहे. मनपाच्या सर्व दहा झोन कार्यालयांमध्ये, तसेच मनपा मुख्यालय, भांडेवाडी डंपिंग यार्ड, नाला सफाई पथके आणि कत्तलखाना येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपर्यंत हे साहित्य पोहोचवण्यात आले आहे. पावसाळ्यात काम करताना विविध संसर्गजन्य आजारांचा आणि जखमांचा धोका असतो; हे साहित्य कर्मचाऱ्यांना या धोक्यांपासून वाचवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. शहरातील आरोग्य सांभाळणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे त्यांच्यामध्ये समाधानाचे आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्'ण झाले आहे. ही मोहीम कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढवणारी तसेच शहरातील स्वच्छता सेवा पावसाळ्यातही सुरळीत ठेवण्यास मदत करणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# विद्युत सुरक्षेशी तडजोड करणार नाही!

## नागपूर परिमंडळात 'प्रतिज्ञा', छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.६:** महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त, 'मी माझ्या कौटुंबिक जबाबदारीचे व्यवस्थित निर्वहन करण्यासाठी विद्युत सुरक्षेशी कधीही तडजोड करणार नाही,' अशी सुरक्षा प्रतिज्ञा कंपनीच्या नागपूर परिमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. सुरक्षितता संस्कृती बळकट करण्याचा संकल्प दिन म्हणून हा सोहळा उत्साहात पार पडला.




काटोल मार्गावरील 'विद्युत भवन' येथील मुख्य कार्यक्रमात परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी उपस्थितांना विद्युत सुरक्षेची शपथ देऊन कार्यक्रमाचा रीतसर शुभारंभ केला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त त्यांच्या अर्धकृती पुतळ्यास माल्यार्पण करून आदरपूर्वक अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा संदेशाची चित्रफीत दाखवल्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य संचारले. याप्रसंगी विद्युत निरीक्षक उमाकांत धोटे व महानिर्मितीचे अधीक्षक अभियंता किशोर सूर्यवंशी यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता मंजूषा आडे यांच्यासह महावितरण, महा निर्मिती व महापारेषण कंपन्यांचे विविध विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठ गोवंशीय जनावरांची सुटका

**नागपूर, दि. ६ :** सदर पोलिसांनी निर्दयपणे बांधलेल्या आठ गोवंशीय जनावरांची सुटका करत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ५ जून २०२५ रोजी सायंकाळी चारच्या सुमारास करण्यात आली. सदर पोलिस स्टेशनचे पथक परिसरात गस्त घालत असताना गिट्टीगोदाम परिसरात काही गोवंशीय जनावरे बांधून ठेवलेली असल्याची माहिती मिळाली याआधारे पोलिसांनी तात्काळ नमूद ठिकाणी धाव घेतली आणि पंचांसमक्ष छापा टाकला. अज्ञात आरोपीने एकूण आठ लहान-मोठी गोवंशीय जनावरे अत्यंत क्रूर आणि निर्दयीपणे चारा-पाणी न देता कत्तलीसाठी बांधून ठेवली होती. पोलिसांनी घटनास्थळावरून अंदाजे १,१०,०००/- रुपये किमतीची ही आठ गोवंशीय जनावरे जप्त केली.

# विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करणे गरजेचे

## मंगल प्रभात लोढा; नागपूर विद्यापीठात रोजगार मेळावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.६:** विद्यार्थी जीवनापासूनच विद्यार्थ्यांना विविध कामांचे कुशल प्रशिक्षण मिळाले तर यातून मोठे उद्योजक तयार होऊन भारत विकसित होईल, असा विश्वास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला. ते नागपूर विद्यापीठात आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात बोलत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात १९ नामांकित कंपन्या सहभागी झाल्या, तर ३२३ नोकरीइच्छुक उमेदवारांनी नोंदणी केली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाचा रोजगार व प्रशिक्षण विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराज बाग चौक येथील दीक्षांत सभागृहात हा मेळावा पार पडला. ॲक्सिस बँक, इंडोरामा, टाटा तनिष्क, करण कोठारी ज्वेलर्स, एलआयसी ऑफ इंडिया यांसह विविध कंपन्यांनी भरती प्रक्रिया राबवली. यावेळी बोलताना मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, 'कोणतेही काम छोटे नसते, प्रत्येक कामाला सारखेच मूल्य असते. आपले काम सर्वोत्तम पद्धतीने करत यशाची शिखरे गाठावीत.' त्यांनी पुढे सांगितले की, 'देशात रोजगाराची कमी नाही, पण कौशल्यअभावामुळे विद्यार्थ्यांना पसंतीचा रोजगार मिळत नाही. श्रमाचा सन्मान होण्याच्या गरजेतूनच नळ कारागिराला 'वॉटर इंजिनिअर' नाव देण्याचा विचार आहे.' प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी, इच्छा असल्यास मार्ग सापडतो आणि विद्यापीठ रोजगाराचे मार्ग तयार करण्यास मदत करत असल्याचे सांगितले. उद्योजकांनी विद्यार्थ्यांमधील कौशल्य विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.



# एमडी पावडरची विक्री करणारी महिला अटकेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.६:** जरीपटका पोलिसांनी एका महिलेला एमडी पावडरसह अटक केली आहे. ही कारवाई जरीपटका पोलिस ठाणे हद्दीतील लुंबिनी नगर येथे ५ जून रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास करण्यात आली.

जरीपटका पोलिसांचे पथक गस्त घालत असताना लुंबिनी नगर, जरीपटका, नागपूर येथील अनिल गजभिये यांच्या घरी एमडी पावडर विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी आरोपी प्रीती अनिल गजभिये ही तिच्या घरी आढळून आली. पंचांसमक्ष तिच्या घराची झडती घेतली असता स्वयंपाकघरात एका डब्यात एका झिपलॉक पिशवीत एकूण ४४.९३ ग्रॅम एमडी पावडर आढळून आली. या जप्त केलेल्या एमडी पावडरची अंदाजित किंमत ८९ हजार ८६० रुपये इतकी आहे. आरोपीचे कृत्य एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २१(ब) नुसार असल्याने तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली. ही कारवाई निकेतन कदम, पोलिस उप आयुक्त (परिमंडळ क्र. ५) आणि सत्यवान बंडिवार, सहाय्यक पोलिस आयुक्त(जरीपटका विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात उपनिरीक्षक अरुण क्षीरसागर, सहाय्यक पोलिस निरीक्षक शशिकांत तायडे, पोलिस हवालदार पंकज ठाकूर, नाईक पोलिस अंमलदार तरंग शर्मा, पोलिस अंमलदार प्रमोद, मंगेश, राहुल चव्हाण आणि महिला पोलिस अंमलदार नमिषा यांचा समावेश होता.

# मनपा कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ६:** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त नागपूर महानगरपालिकाच्या वतीने मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., अजय चारठाणकर, उपायुक्त विजया बनकर, परिवहन अधिकारी विनोद जाधव, सहायक आयुक्त श्याम कापसे, सुवर्णा दखने, मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राला माल्यार्पण केले. तसेच, महापौर कक्षातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्रास अभिवादन करीत पुष्प अर्पण केले. याप्रसंगी साप्रविचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, जनसंपर्क अधिकारी मनिष सोनी, सर्वश्री अमोल तपासे, प्रमोद हिवसे, प्रशांत भेंडे, परिमल इनामदार, विनय बगले, शैलेश जांभूळकर, प्रमोद बारई, संध्या डाखोरे, अनिता पाटील यांच्यासह मनपाचे कर्मचारी उपस्थित होते.

# मानेवाडा सीमेंट रोडवर हीट अँड रन, दोन ठार

## पिकअप वाहनचालकाने दिली धडक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ६:** मानेवाडा सिमेंट रोडवर हीट अँड रन घटनेत दोनजण ठार झाले. शुक्रवारी रात्री पाऊणवाजताच्या सुमारास पिकअप वाहनचालकाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वारांना जीव गमावावा लागला. माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे १२.४५ वाजताच्या सुमारास नितीन राजेंद्र कटरे (कळमना) आणि त्याचा शेजारी कोमल भगवती यादव कामावरून आपल्या दुचाकीने घरी परत येत होते. मानेवाडा चौक ते तुकडोजी पुतळ्याकडे जाताना ज्ञानेश्वरनगर गेटजवळ पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनाच्या चालकाने त्यांच्या दुचाकीला भरधाव वेगाने धडक दिली. धडकेनंतर पिकअप चालक घटनास्थळावरून पळून गेला. या अपघातात नितीन आणि कोमल दोघेही वाहनासह खाली पडले आणि त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने मेडिकल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी करून दोघांनाही मृत घोषित केले. याप्रकरणी मृतांपैकी नितीनचे वडील राजेंद्र बद्रीलाल कटरे यांनी अजनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अज्ञात वाहन चालकाविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम २८१, १०६(१) आणि मोटार वाहन कायदा कलम १३४, १७७, १८४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त नागपूरकरांचा प्लास्टिक मुक्तीसाठी संकल्प

## मनपाच्या जनजागृती रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद; नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे केले वाटप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि.६:** जागतिक पर्यावरण दिनाचे (५ जून) औचित्य साधून, नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरात विशेष जनजागृती रॅली काढून प्लास्टिकमुक्तीचा दृढ संकल्प करण्यात आला. 'सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळा' अशा घोषणा देत आणि नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करत ही रॅली संत्रा मार्केट येथून काढण्यात आली.

रॅलीचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त वसुमाना पंत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सहायक आयुक्त धनंजय जाधव, प्रमोद वानखेडे, सोनम देशमुख, स्नेहलता कुंभार, उपद्रव शोधपथक प्रमुख वीरसेन तांबे, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, स्वच्छता अधिकारी लोकेश बावनवार, ग्रीन व्हिजिल फाउंडेशनचे कौस्तुभ चॅटर्जी आदी सहभागी झाले होते. रॅलीत ग्रीन व्हिजिलचे स्वयंसेवक व मनपा उपद्रव शोध पथकाचे जवानही सामील होते. विविध वेशभूषाधारी स्वयंसेवकांनी पर्यावरण संरक्षणाचे संदेश देणारे फलक हाती घेतले होते. कॉटन मार्केट, विजय टॉकीज, लोहापूल मार्गे व्हरायटी चौकात महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ समारोप झाला. पंत यांनी दुकानांना भेट देऊन कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन केले.




## आमडीत मनरेगा आयुक्तांच्या उपस्थितीत वृक्षारोपण

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील आमडी ग्रामपंचायतीच्या अमृत सरोवरस्थळी मनरेगा आयुक्त डॉ. भरत बास्टेवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. 'वृक्ष हेच जीवन असून, हरित महाराष्ट्रासाठी व पर्यावरण रक्षणाकरिता सर्वांनी एकत्र यावे', असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महिला बचत गटांच्या सक्रिय सहभागाचे कौतुक करत, त्यांच्या सक्षमीकरणासाठी मनरेगा कामांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयुक्तांनी केले. त्यांनी पारशिवनी तालुक्यातील बनपूरी आणि मौदा तालुक्यातील निसडखेडा या ग्रामपंचायतींनाही भेट देऊन, मनरेगाअंतर्गत झालेल्या दुतर्फा वृक्षलागवड, फळबाग, सिंचन विहीर, बांबू लागवड व सिमेंट रस्ते कामांची प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. कामांतील पारदर्शकता व गुणवत्ता वाढवणे हा पाहणीचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दौऱ्यात उपायुक्त (मनरेगा) अरविंद उपरीकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) स्वाती देसाई, गटविकास अधिकारी वंदना भेले व सुभाष जाधव, राज्य समन्वयक अभय तिजारे, आयसी समन्वयक संकेत रामराजे, रवींद्र भुते, इमरान शेख, चंदू गोमासे, दर्शन आंबेडकर व इतर अधिकारी उपस्थित होते.








अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. ७ जून २०२५







# विकास कामांच्या दिशाभूल करणाऱ्या ‘पाट्या’

## ■ नुसती चमकोगिरी ■ कामाची जबाबदारी ओळखणार कशी?

। रवी देशमुख ।

**अकोला, दि. ६ : महापालिका क्षेत्रात अकोला पूर्व व अकोला पश्चिम मतदार संघात विविध निधीतून विकास कामे सुरू असून, काही कामे पूर्ण झाली आहेत. कामाच्या स्थळी त्या कामाबद्दल संपूर्ण माहिती असलेली पाटी लावणे नियमानुसार बंधनकारक आहे; परंतु शहरात नुसत्या भूमिपूजन व उद्घाटनाच्या पाट्या लागलेल्या दिसून येत आहेत. या पाट्यांवर केवळ लोकप्रतिनिधींची नावे असून, कामाविषयी एक ओळही पाटीवर दिसत नाही, केवळ काम कुठून कुठपर्यंत ही ओळ दिसून येते. ही अतिशय गंभीर बाब असून, अशा पाट्या लावून अकोलेकरांची दिशाभूल केली जात आहे.**





महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर अकोला महापालिका क्षेत्रात मुख्य करून रस्त्यांची कामे सुरू आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निधीतून ही कामे केली जात आहेत. गत एक ते दीड वर्षापासून या कामांचा झपाटा वाढला असून, जवळपास प्रत्येक प्रभागात कामे केली जात आहेत.

महापालिका बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग या अंतर्गत सुरू असलेल्या अथवा झालेल्या कामात नियम धाब्यावर बसविले जात आहेत. काम सुरू होण्यापूर्वी कामाच्या स्थळी सदर कामासंदर्भात पाटी लावणे नियमानुसार बंधनकारक आहे. यामध्ये कामाचा निधी, कामाची लांबी व रुंदी, कामाचा कालावधी अशी पाटी न लागता भूमिपूजनाच्या पाट्या लावल्या जात आहेत. ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास येऊनही या पाट्या हटविण्यात येत नाहीत. काम पूर्ण झाल्यानंतरही भूमिपूजनाच्या या पाट्या तशाच लागलेल्या दिसून येत आहेत. नियमानुसार काम पूर्ण झाल्यानंतर काम कुणी केले, त्याचे नाव (कंत्राटदार), कामाची लांबी व रुंदी, काम कुठल्या स्वरूपाचे आहे, याचा उल्लेख, कामाचा दोष दायित्व कालावधी अशी पाटी असायला हवी; परंतु अशी पाटी कुठल्याच कामाच्या स्थळी दिसून येत नाही. केवळ चमकोगिरी करणाऱ्या हिरव्या पाट्या लागलेल्या दिसून येत आहेत.

### कामाची वाट; माहितीची पाटीच नाही

शहरातील अनेक कामांचा दोष दायित्व कालावधी शिल्लक असतानाही कामाची वाट लागल्याचे चित्र आहे; परंतु कामाच्या स्थळी अशा पाट्या नसल्याने कंत्राटदार दोष दायित्व कालावधीतून मुक्त झाल्याची परिस्थिती आहे. कुठल्या आधारावर कंत्राटदाराला जबाबदार धरणार, त्याचा पुरावाच अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने शिल्लक नाही. अकोला शहरात कोट्यवधी रुपये खर्च करून उड्डाण पूल व अंडरपास बांधण्यात आला असून, कुठेही कामाची माहिती असलेली पाटी लागलेली दिसत नाही.

### काम झाले की विषय संपला

अशा पाट्या लावून चमकोगिरी करणाऱ्यांना कुणीही आवर घालू शकत नाही, अशी परिस्थिती झाली आहे. अधिकारी भीतीपोटी ब्र शब्दही काढत नाहीत. नियम धाब्यावर बसवून लावण्यात आलेल्या पाट्यांमुळे अकोलेकरांची दिशाभूल केली जात असून, कामाचे एकूण वर्णन लपविले जात आहे. यामुळे कंत्राटदारांचे चांगलेच फावत आहे. कसेही काम करा अन् काम झाले की विषय संपला अशी परिस्थिती आहे.

### अधिकाऱ्यांचा प्रतिसाद नाही

कामाच्या स्थळी लावण्यात येत असलेल्या पाट्या नियमात आहेत का? या संदर्भात माहिती घेण्यासाठी आमचे प्रतिनिधी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील यांच्याशी संपर्क साधला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही. महापालिका बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर यांनी सांगितले की, नेमकी माहिती माझ्याकडे नाही, त्यामुळे सांगता येणार नाही.

# दुसऱ्या टप्प्यातील योजनेचा प्रकल्प अहवाल होणार तयार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ६ :** केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. यापूर्वीची योजना अजूनही पूर्ण झाली नसून, योजनेच्या विलंबामुळे लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या अडचणी आल्या आहेत. परिणामी, अडीच हजार लाभार्थी पात्र असूनही कागदपत्रांच्या त्रुटीमुळे योजनेतून बाहेर फेकले गेले.

महापालिकेची हद्दवाढ झाल्यानंतर गुंठेवारी पद्धतीच्या भागात वाढ झाली. जवळपास ३५ टक्के भाग गुंठेवारीचा आहे. २०१४ पासून महापालिकेने गुंठेवारीचे नियमानुकूल करणे बंद केले होते. मात्र २०२० साली राज्य शासनाने गुंठेवारी नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ज्या नागरिकांनी ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीचे प्लॉट अथवा घर घेतले असेल त्यांना गुंठेवारी नियमानुकूल करण्याचा मार्ग मोकळा झाला. या दरम्यान २०१७ ला पंतप्रधान आवास योजना सुरू झाली. मात्र गुंठेवारीचे नियमानुकूल करण्याचे काम बंद असल्याने मंजूर लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागला होता. पुढे गुंठेवारीचे नियमानुकूलचे प्रस्ताव स्वीकारणे सुरू करण्यात आले. त्यानंतर काही महिने पुन्हा प्रस्ताव स्वीकारणे बंद करण्यात आले. तर यापूर्वी ३१ मार्च २०२५ पर्यंत गुंठेवारीचे प्रस्ताव स्वीकारण्यात आले. १ एप्रिलपासून आतापर्यंत प्रस्ताव स्वीकारणे बंद आहेत.

आता दुसऱ्या टप्प्यासाठी घरकुलाचे प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. हे प्रस्ताव दाखल करताना प्लॉट नियमानुकूल असणे, नमुना ‘ड’, आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. जो पर्यंत नियमानुकूल मंजूर होत नाही, तो पर्यंत नमुना ‘ड’ मिळत नाही, तर दुसरीकडे गुंठेवारीचे नियमानुकूलचे प्रस्ताव स्वीकारणेच बंद असल्याने दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

खुल्या प्लॉटसाठी रेडिरेकनर दराच्या ०.५ टक्के विकास शुल्क, या विकास शुल्काच्या तीनपट प्रशमन (दंड) आकारल्या जाईल. जर बांधकाम असेल तर बिल्डअप एरियाचे रेडिरेकनर दराच्या २ टक्के विकास शुल्क आणि विकास शुल्काच्या तीन टक्के प्रशमन (दंड) आकारला जाणार आहे.

## फुगे घ्या फुगे...



**शहरात ४ जून रोजी श्री. संत गजानन महाराजांची पालखी दाखल होताच महाराजांच्या पालखी मार्गावर परप्रांतीयांनी फुगे तसेच खेळणीचे फिरते दुकाने थाटली होती. या रंगीबिरंगी फुग्यांना व खेळणीला बच्चे कंपनीने चांगलीच पसंती दर्शविली होती. (छाया. संजय ताथुरकर)**

# रोहित्रांचे उघडे बॉक्स देताहेत अपघातांना आमंत्रण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ६ :** अकोला शहरातील विविध भागांमध्ये महावितरणच्या मुख्य फ सच्या डीपीवरील बॉक्स उघडे असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. अशा उघड्या विद्युत बॉक्समुळे नागरिकांच्या जीविताला कायमचा धोका निर्माण झाला असून, महावितरणच्या हलगर्जी कारभारावर शहरवासीयांनी संताप व्यक्त केला आहे.

शहरातील रामदासपेठ, रामनगर, जुने शहर,श्रीवास्तव मार्ग जय हिंद चौक, अशोक वाटिका मार्ग, नवीन व जुने बस स्टँड मार्गासह ठीक ठिकाणी उघडे पडलेले डीपी बॉक्स कुठल्याही क्षणी जीवघेणा अपघात घडवू शकतात. विशेषतः पावसाळ्याच्या तोंडावर हे उघडे बॉक्स अधिक धोकादायक ठरणार आहेत. यामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक, तसेच पादचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. विद्युत प्रवाह असलेल्या या बॉक्समध्ये चुकून हात गेल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो.

महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही याकडे दुर्लक्षच केले जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. ‘‘जगण्यासाठी दर महिन्याला वाढत्या वीज बिलांचा भुर्दंड सहन करावा लागतो आणि सुरक्षिततेकडे मात्र महावितरणचे लक्षच नसते,’’ अशी रोषपूर्ण प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. शासनाने विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश महावितरणला दिलेले असतानाही असे उघडे बॉक्स शहरात दिसतात, हे दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे काही दुर्दैवी घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल आता शहरवासीय विचारू लागले आहेत. संपूर्ण शहरात महावितरणच्या ढिसाळ व्यवस्थेने नागरिक त्रस्त झाले असून, तातडीने हे उघडे विद्युत बॉक्स बंद करून योग्य संरक्षणात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा महावितरणच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काही सामाजिक संघटनांनी दिला आहे.

## कपाशीच्या बियाण्यांची मिळाली केवळ आठ हजारच पाकिटे

**अकोला :** जिल्ह्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक पसंतीच्या संकरित कपाशीच्या एका विशिष्ट वाणाच्या बियाण्यांची ८ हजार ३८० पाकिटे उपलब्ध झाली; मात्र जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा होत नसल्याने पेरण्या सुरू होण्याआधीच जिल्ह्यात कपाशीच्या या बियाण्यांचा तुटवडा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. यावर्षी पेरणीयोग्य पाऊस झाल्याने जिल्ह्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मशागती करून पेरण्याची तयारी सुरू केली आहे. पेरणीसाठी लागणाऱ्या बियाणे आणि खतांची खरेदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सुरू केली आहे; मात्र एका विशिष्ट बियाण्यांची सर्वाधिक मागणी आहे. त्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने बियाणे कंपनीसह कृषी आयुक्तालयाकडे संकरित कपाशीच्या एका विशिष्ट ताणाच्या बियाण्यांची तीन लाख पाकिटे उपलब्ध करण्याची मागणी केली होती. त्यानुसार मागणीच्या तुलनेत ३० मेपर्यंत जिल्ह्यात संबंधित कपाशी वाणाच्या बियाण्याची प्राप्त झालेली १ लाख ४ हजार ४६० पाकिटांची विक्री झाली आहेत.

# शहरात पाण्यासाठी लोकांची वणवण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** महान धरणात पुरेसा जलसाठा असतानाही अकोला शहरातील अनेक भागांमध्ये तब्बल १० दिवसांपासून नळाला पाणी नाही. उन्हाच्या कडाक्यात आणि आता पावसाळ्याच्या उंबरठ्यावरसुद्धा पाणीटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले असून, महापालिकेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

ख्रिश्चन कॉलनी, जुने शहरातील रामपीर नगर,बाळापूर रोड व अकोट फैलमधील काही भाग आदी भागात नळांना पाण्याचा थेंब नाही, पाण्यासाठी लोकांची वणवण सुरू असून, काही ठिकाणी खासगी टँकरचालकांना ८०० ते १००० रुपये मोजावे लागत असल्याने गरीब कुटुंबांची पिळवणूक सुरू आहे. विशेष म्हणजे, एप्रिल महिन्यातच महापालिकेचे पाणीपुरवठा विभागप्रमुख अमोल डोईफोडे यांनी उन्हाळाभर पाणी कमी पडणार नाही, असा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात शहरवासी पाण्याअभावी हैराण आहेत. त्यामुळे पाणी आहे, व्यवस्था आहे, तरी नागरिकांना पाणी का नाही? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. काही समाजसेवकांनी या प्रकरणी मनपा प्रशासनाला निवेदने दिली, तक्रारी केल्या तरी महापालिका आश्वासनापुरती मर्यादित आहे. ही निष्क्रियता म्हणजे जनतेचा थेट अपमान आहे. या पाणी प्रश्नावर सध्या राजकीय कुरघोड्याही सुरू झाल्या असून, भावी नगरसेवकांकडून तक्रारी होत असताना माजी प्रतिनिधी पुन्हा सक्रिय होत असल्याने प्रशासनावर राजकीय दबाव असल्याची जोरदार चर्चा आहे. महापालिकेकडून अद्याप कोणतेही वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे स्थानिक राजकारण, गटबाजी आणि प्रशासनाची उदासीनता यांच्या फडशात सामान्य जनता भरडली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. राजकारण करायचं असेल तर करा, पण पाण्याच्या थेंबावरून जनतेला तहानलेले ठेवू नका!असा संतप्त इशारा नागरिकांकडून दिला जात असून, लवकर पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला जात आहे.

# तीन वर्षांपासून अकोलेकरांच्या अपेक्षा धुळीस

## प्रशासकीय राजवटीतही ‘त्यांचीच‘चालती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** राज्यातील महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका दिवाळीपूर्वी होणे शक्य दिसत नाही. सव्वा तीन वर्षाच्या प्रशासकीय राजवटीला अकोलेकर कंटाळले आहेत. मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होण्यात अडचणी येत आहेत. नागरिकांना अजूनही माजी नगरसेवकांना आपल्या समस्या सांगाव्या लागतात. प्रशासन प्रतिसाद देत नसल्याने ही वेळ आल्याचे बोलले जात आहे. महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२२ मध्ये होणे अपेक्षित होते; परंतु आज तीन वर्षाहून अधिक काळ लोटला असून, अजूनही निवडणूक कधी होईल, हे निश्चित नाही. महापालिकेवर प्रशासकाची सत्ता असून, या कालावधीत नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील, अशी अपेक्षा होती; परंतु यामध्ये प्रशासनाला अपयश आले असून, महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने घेत नसल्याचे चित्र आहे. नागरिकांना माजी नगरसेवकांकडे समस्या मांडाव्या लागत आहेत. प्रभागातील स्वच्छता, झाडपूस, नळाचे पाणी, सर्विस लाइन सफाई, पथदिवे अशा मूलभूत गरजांना प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी प्रतिसाद देत नाहीत, त्यामुळे नाइलाजाने माजी नगरसेवकांना सांगावे लागते, असे नागरिक बोलून दाखवत आहेत. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका रखडल्याने अकोला शहराचा कारभार प्रशासक सांभाळत आहे; मात्र काही तरी बदल होईल, ही अपेक्षा पार धुळीस मिळाली आहे.

अकोला महापालिकेत सत्ता नसल्याने राजकीय पक्ष मेटाकुटीस आले आहेत. राज्यात सत्ता स्थापन झाल्यावर नवीन वर्षात महापालिका निवडणुका होतील, अशी अपेक्षा ठेवून बसलेल्या राजकीय पक्षांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. राज्यात सत्ता स्थापन झाल्यानंतर महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजणार, अशी दाट शक्यता सर्वच राजकीय पक्षांना होती. त्या अनुषंगाने महापालिका निवडणुकीत आपली ताकद आजमावण्यासाठी पक्षांनी धडाक्यात सदस्य नोंदणी मोहीम राबवली. पक्षश्रेष्ठीकडून निवडणूक कामाला लागण्याचे आदेश आल्यानंतर कार्यकर्त्यांनी मरगळ झटकून जोमाने कामाला सुरुवात केली; परंतु निवडणूक लांबतच चालली आहे.

> महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होत नसल्याने जोमाने कामाला लागलेल्या कार्यकर्त्यांच्या पदरी निराशा आली आहे. महापालिकेतील प्रशासकीय राजवटीला नागरिकही कंटाळले असून, प्रशासनाची मनमानी तीन वर्षांपासून सहन करावी लागत आहे. समस्या निकाली काढण्यासाठी काहीही केले जात नाही. उलट समस्या वाढत चालल्या आहेत.
>
> **- विशाल राऊत, नागरिक.**

> महापालिकेचे काही कर्मचारी माजी नगरसेवकांच्या एका हाकेला धावून जातात; मात्र आम्ही सांगितल्यास प्रतिसाद देत नाहीत. काम झाल्यावर माजी नगरसेवकांना सांगा काम झाले म्हणून, असा सल्ला कर्मचारी नागरिकांना देतात. ही कुठली कामाची पद्धत आहे, महापालिकेत प्रशासक असताना माजी नगरसेवकांची ढवळाढवळ कशासाठी; प्रशासन समस्या सोडवण्यासाठी सक्षम नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.
>
> **- दिनेश पाटील, नागरिक.**

> नाल्या तुडुंब भरल्या आहेत. नियमित साफसफाई नसल्याने सर्विस लाइनमधील घाण सांडपाणी घरात येत आहे. स्वच्छता निरीक्षकांना समस्या सांगूनही सुटत नाही. वारंवार किती तक्रारी करणार, स्वच्छता निरीक्षक मोबाइल उचलत नाही. नाइलाजाने माजी नगरसेवकांना सांगावे लागते. महापालिकेत सत्ता नसताना प्रशासनाच्या हाती शहराचा कारभार आला आहे; पण तीन वर्षात परिस्थिती ‘जैसे थे’ आहे.
>
> **- आकाश सोळंके , नागरिक.**

# भाजप-उद्धवसेनेचा वाद मुद्यावरून थेट गुद्यावर

। श्रीकांत पाचकवडे ।





**अकोला, दि. ६ :** जिल्हा परिषदेच्या दलित वस्तीचा निधी वाटपावरून भाजप आणि उद्धवसेनेत सुरू असलेला वाद आता थेट मुद्यावरून गुद्यावर आला आहे. त्यामुळे जिल्ह्याचे राजकारण चाललंय कुठे? अशी म्हणण्याची वेळ सर्वसामान्य अकोलेकरांवर आली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून सत्ताधारी भाजप आणि विरोधी पक्ष असलेल्या उद्धवसेना आणि वंचित बहुजन आघाडीत जिल्हा परिषदेच्या दलित वस्तीच्या निधीवरून रणकंदन पेटले आहे. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या दलित वस्ती योजनेचा ४२ कोटींचा निधी इतर विभागांना वळती करण्यात आला. त्यानंतर काल झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर हे दलित वस्तीच्या निधी वितरणाच्या मुद्यावर बोलत असताना उद्धवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांनी दलित वस्तीचा निधी इतरत्र वळती करून अन्याय केल्याचा आरोप करीत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. दरम्यान, उद्धवसेनेचा एक कार्यकर्ता सभागृहात व्हिडिओ काढत असल्याचे लक्षात आल्यावर पालकमंत्र्यांनी त्या कार्यकर्त्याला सभागृहाबाहेर जाण्याचे निर्देश दिले. त्यानंतर आमदार देशमुख आणि पालकमंत्र्यांमध्ये सुरू असलेल्या शाब्दिक वादात आक्रमक होत आमदार रणधिर सावरकरांनी आमदार देशमुख यांना प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केला. या वादानंतर दोन्ही नेते सभागृहात शिवराळ भाषा वापरली नसल्याचे सांगत असले तरी सभागृहाबाहेर त्याचे तीव्र पडसाद उमटत भाजप आणि उद्धवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला. पोलिसांनी वेळीच दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केल्याने मोठा अनर्थ टळला; मात्र जिल्हा नियोजन समितीसारख्या संवैधानिक बैठकीच्या बाहेर राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी असा राडा करणे कितपत योग्य आहे? जिल्ह्याचे राजकारण मुद्यावरून थेट गुद्यावर चाललंय का? असे अनेक प्रश्न उपस्थित करणारे आहेत. विकास कामांवरून मतभेद असले तरी लोकप्रतिनिधींनी किंवा राजकीय कार्यकर्त्यांनी खालच्या स्तरावर जात अशा पद्धतीने वाद करणे संयुक्तीक नाही. असेच वाद जर सुरू राहिले तर राज्यात अकोल्याच्या राजकारणाचा चांगला संदेश जाईल का? अशीही चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरू आहे.

### राजकारणात मतभेद असावेत, मनभेद नको

आमदार रणधिर सावरकर आणि आमदार नितीन देशमुख हे दोन्ही नेते सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडणारे अभ्यासू लोकनेते आहेत; मात्र राजकारणात मतभेद असावेत, मनभेद नसावा, याचे भान दोन्ही नेत्यांनी ठेवणे आवश्यक आहे.

## थोडक्यात

### शिवराज्याभिषेक सोहळा दिन संपन्न

**खामगाव :** लाखनवाडा बु ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणामध्य सरपंच सुरेखा विलास पांढरे यांच्या हस्ते भगवा ध्वज उभारण्यात आला याप्रसंगी शिवाजीराव पांढरे त्रंबक चौधरी शांताराम तायडे विलास पांढरे शेख अफरोज विजय रायगावकर माजी सरपंच शेख सलीम उद्दीन सुमित वाकोडे शेख हमीद मुख्याध्यापक जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळा एस एल चाटे जिल्हा परिषद हायस्कूल शेख आयुब शेख अब्रार शिक्षक नॅशनल उर्दू शाळा ग्रामपंचायतचे कर्मचारी राम कृष्ण इंगळे संजय वानखडे त्रंबक वसतकार रहमत खान गणेश बगाडे जफर खान इत्यादी उपस्थित होते.

### तालुका शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर

**बुलडाणा :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, खामगाव कार्यक्षेत्रातील जळगाव जामोद व मलकापूर तालुक्यासाठी जून २०२५ महिण्याचा शिबिर दौरा जाहिर करण्यात आला आहे. नागरिकांनी तालुका स्तरीय शिबीरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे. शिबिर दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे : जुन महिण्यात जळगाव जामोद येथे १३ व २५ रोजी तर मलकापुर येथे १७, २४ व ३० जून रोजी होणार आहे. शिबिराच्या ठिकाणी मोटार वाहन निरीक्षक व सहायक रोखपाल हजर राहणार आहेत.

### बस स्टॅण्डवर मृतदेह आढळला

**अंढेरा :** स्थानिक अंढेरा येथील बस स्टॅण्ड जवळील दिपक राऊत यांच्या सलुनच्या दुकानाजवळ दि.५जुन ला सकाळी ११वाजता अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार रुपेश शक्करगे आणि बिट जमदार गजानन वाघ यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.मृतदेह आढळलेला व्यक्ती हा काटोडा येथील प्रमोद प्रकाश हिवाळे वय ३८ असल्याचे तपासात निष्पन्न झाले. घटनेची माहीती अंढेरा पोलिसांनी नातेवाईकांना दिली असुन मृतदेह बिट जमदार गजानन वाघ यांनी देऊळगाव मही येथील ग्रामीण रुग्णालयात शिवविच्छेदनासाठी नेला. काटोडा येथील मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचा भाऊ अनिल प्रकाश हिवाळे यांच्या फिर्यादीवरून अंढेरा पोलिसांनी मर्ग दाखल केला असून शिवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.पुढील तपास बिट जमदार गजानन वाघ करीत आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १२५० - २४७५ |
| गहू | १६००-२५०० |
| तुर | ४१०० - ६६७५ |
| हरभरा | ४३०० - ५४५० |
| सोयाबीन | ३५०० - ४४०० |
| भुईमुग | ३००० - ५४७० |
| उडीद | ५००० - ६५०० |
| मक्का | १३७० - १९०५ |
| मूंग | ४००० - ६४०० |
| मलाई चना | ५३००-५३०० |
| बाजरी | १४०० - १६७५ |

# ज्ञानपीठ स्कूलचा 'आदर्श' घोटाळा; पैसा केला गोळा..!

## शिक्षण अधिकाऱ्याच्या चौकशी अहवालतही गट नं. ५५/२ मैदान म्हणून उल्लेख, अर्धवटराव म्हणे प्रश्नार्थक लावलेली बातमी खरी नाही

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.६**




आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश घाटपूरी रोड खामगाव या शाळेचे संचालक शासनाची कमालीचे फसवणुक करीत असून तक्रारीनंतर शिक्षण अधिकारी माध्यमिक जिल्हा बुलडाणा यांच्या अहवालात सुध्दा गट नं ५५/२ हा शाळेच्या इमारतीपासुन २ किमी अंतरावर नमुद असून शाळेच्या मैदानासाठी वापरत असल्याचे उल्लेख आहे. मात्र प्रत्यक्षात या गटनंबरमधील कविश्वरसिंह कन्हैयलालासिंह राजपूत यांच्या मालकीच्या जागेत ज्या जागेचा मैदान म्हणून उल्लेख आहे त्या जागेवर शेती करण्यात येत असून कुठल्याही प्रकारचे मैदान अस्तित्वात नाही. त्यामुळे शाळेचे अध्यक्ष हे या जागेचा दुहेरी लाभ घेत असल्याचे निष्पन्न होत आहे. परंतु शिक्षण अधिकारी कारवाई करण्यास का टाळाटाळ करतात याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे.

शिक्षण अधिकारी माध्यमिक बुलडाणा यांनी दि. ९ मे २०२४ रोजी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी तालुका शिक्षण अधिकारी गजानन गायकवाड यांच्यासह शिक्षण विस्तार अधिकारी जि.एस राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी वनिता चव्हाण, व संस्थेच्या वतीने अध्यक्ष कविश्वरसिंह राजपुत हे स्वता उपस्थित होते. यासर्वां समक्ष तपासणी करून तयार करण्यात आलेल्या अहवालात स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे की, आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेजला दि. २८ जुन २०२२ अन्वये गट नं. ५५/२ घाटपुरी रोड मौजे खामगाव या शाळेला सहावी ते बारावी सर्व शाखा इंग्रजी माध्यम स्वयंअर्थसाहय्यित तत्वावर परवानगी मिळाली आहे. परंतु परवाणगीत नमुद गट नं ५५/२ हा गट नं सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीपासून २ किमी अंतरावर आहे. या ठिकाणाचा वापर शाळा हि खेळाचे मैदान म्हणून करत आहे. परंतु हे वर्ग उच्च प्रायमरी व उच्च माध्यमिक गट नं ५५/२ या ठिकाणी सुरू होणे अपेक्षित होते. परंतु हे वर्ग सध्या इमारतीत सुरू आहेत. अशा प्रकारचा शेरा दिला आहे. यावरून संस्था अध्यक्ष, मुख्याध्यापक व इतर संचालक शासनाची दिशाभूल करत असल्याचे स्पष्ट होत आहे. अध्यक्ष शासनाला दर्शविलेल्या शाळेच्या मैदानात शेती करीत असून शेतीमधील उत्पनासह शासनाकडुन मिळणार पीकविमा, नुकसान भरपाई आदी लाभ घेत आहेत. त्यामुळे शिक्षण अधिकारी बुलडाणा यांनी संस्था अध्यक्षांसह, मुख्याध्यापक ,सचिव यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा हि तक्रारदार नरेश भारसाकळे यांची मागणी योग्य असून त्यांना न्याय मिळणे अपेक्षित आहे. मात्र शिक्षणअधिकारी हे वेळकाळूपणा करीत असल्याचे या प्रकरणात दिसून येत आहे.

मला तालुका शिक्षण अधिकारी यांच्याकडुन कुठलाही चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही. मला तक्रारदाराने लोकशाहीदिनात केलेली तक्रार प्राप्त झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात योग्य ती चौकशी करून कारवाई करू.

**अनिल आकाळ,**
**जिल्हा शिक्षण अधिकारी माध्य. बुलडाणा**

आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल विरोधात तक्रार प्राप्त झाल्यानंतर आम्ही चौकशी समिती नेमुण चौकशी अहवाल जिल्हा शिक्षण अधिकारी माध्यमिक यांच्याकडे पाठविलेला आहे. कारवाई करण्याचा अधिकार हा त्यांचा आहे.

**गजानन गायकवाड**
**तालुका गट शिक्षण अधिकारी**
**पं.स.खामगाव**


गट नं ५५/२ मधील शाळा गेली चोरिला ?

* घाटपूरी रोडवरील आदर्श विद्यालयातील संचालकांचा प्रताप
* शाळेचा पत्ता दुसराच आणि शाळा भरविल्या जाते तिसऱ्याच ठिकाणी
* ५५/२ गटामधे शेती ; संचालक घेत आहेत दुहेरी लाभ, *शिक्षण विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव , दि.४

### अर्धवटराव म्हणे प्रश्नार्थक चिन्ह लावलेली बातमी खोटी, पालकांचीही केली दिशाभूल

दै.अजिंक्य भारतमध्ये ५५/२ मधील आदर्श ज्ञानपीठ गेले चोरीला या मथळयाखालील लावलेल्या बातमीने सदर शाळेच्या संचालकाचे धाबे दणाणले. पालकांनी प्रश्नांची सरबत्ती झाल्यानंतर सैरभैर झालेल्या संचालक व शाळेच्या मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांनी अकलेचे तारे तोडीत सोशल मिडियावर प्रश्नार्थक चिन्ह असलेली बातमी खोटी असल्याचे सांगत बुध्दीच्या 'दिवाळखोरीचे दर्शन घडविले. त्यामुळे पालकांनी या महाभागांची चांगलीच खिल्ली उडवित पुरावेनिशी असलेली बातमी खोटी कशी असा प्रश्न उपस्थित केला आहे.

मूळ शाळेपासून ४ किमी अंतरावर गट नं ५५/२ घाटपुरी शिवारात भाडेपट्टा केला असे भासवून आदर्श इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेजने उच्च प्राथमिक व उच्च माध्यमिकची ज्या ठिकाणी दि. 28 जून 2022 पासून परवानगी मिळवली, त्या ठिकाणी अठरा महिन्याच्या आत शाळेचे बांधकाम अपेक्षीत होते. परंतु आज रोजी 2 वर्षे 6 महिने होऊन गेले, तरी त्या भूखंडावर शाळेचे कुठलेच चिन्ह नाही. त्या भूखंडाचा वापर शेतीसाठी केल्या जात आहे.होत नाही. *(GPS लोकेशन छायाचित्र)*







# वायरमनसाठी गावकरी चढणार टॉवरवर

## चक्क बारा महिन्यापासून विद्युत वितरण कंपनीची बत्ती गुल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मोताळा दि.६**

तालुक्यातील सारोळा मारोती,फरदापुर, सारोळा पीर गावात कायमस्वरूपी वायरमन देण्यात यावा.२४ तासात मागणीची पूर्तता करावी. अन्यथा गावातील टावरवर चढून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा ग्राम स्वराज्य समिती, राष्ट्रीय बजरंग दल, आझाद हिंद शेतकरी संघटना आणि ग्रामस्थांच्या वतीने सादर केलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

पाच जूनला देण्यात आलेल्या निवेदनामध्ये मागील ११ ते १२ महिन्यापासून गावामध्ये स्थायी स्वरूपात एकही वायरमन नाही. त्यामुळे मागील बारा महिन्यापासून ग्रामवासी आणि महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची बत्ती गुल झाली आहे. विना वायरमन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कारभार कसा चालतो. असा प्रश्न गावकऱ्यांनी उपस्थित केला. या अनुषंगाने गावकऱ्यांनी वारंवार संबंधितांकडे विनंती मागणी केलेली आहे. परंतु प्रत्येक वेळी आज उद्या करीत बारा महिन्याचा कालावधी उलटून गेला आहे. परंतु अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आले नाही. त्यामुळे शेतकरी व विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. यासह टावर वर चढून आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.



निवेदनावर ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील, प्रदीप सुधाकर कुऱ्हाडे उपसरपंच सारोळा मारोती, मोहनराव पाटील, विठ्ठल ढकचवळे, भूपेश शेळके पाटील, मनोज व्यवहारे पाटील सुशांत शेळके पाटील,कमलाकर व्यवहारे पुरुषोत्तम व्यवहारे,संजय येंडोले,शेख अफसर, गोपाल शिप्पलकर , विजय ढकचवळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ग्रामस्थांच्या वतीने मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले. त्यामध्ये जिल्हाधिकारी, अधीक्षक अभियंता. कार्यकारी अभियंता,जिल्हा पोलीस अधीक्षक, बुलढाणा, उपकार्यकारी अभियंता, एमईसीबी, तहसीलदार,बीडिओ मोताळा,ठाणेदार बोराखेडी, धामणगाव बढे. आदिनाथ निवेदनाच्या प्रती सह आंदोलनाची माहिती दिली आहे.

# संजय गांधी व श्रावण बाळ योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन देण्याची मागणी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**जळगाव दि.६**

जळगाव जामोद तालुक्यातील वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद केले आहे की संजय गांधी , श्रावण बाळ योजनेतील लाभार्थी यांना मानधन मिळाले नाही यामुळे या योजनेतील लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे शासनाने



गरीब गरजू कुटुंबातील निराधारांना आधार मिळावा म्हणून ही योजना सुरू केलेली आहे परंतु गेल्या पाच महिन्यापासून विधवा, अपंग, वयोवृद्ध, निराधारांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मानधन देण्यात त्यामुळे त्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे त्याकरिता शासनाने तात्काळ त्यांच्या बँक खात्यामध्ये त्यांचे मानधन जमा करावे तसेच शेतकरी बांधवांचे रखडलेले अतिवृष्टी आर्थिक साणुग्रह निधी सुद्धा आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नाही त्यामुळे वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ त्यांच्या बँक खात्यामध्ये रखडलेला निधी त्वरित जमा करण्यात यावा.

अशा आशयाचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आले या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष प्राध्यापक अनिल रणीत, युवा आघाडीचे पदाधिकारी संतोष पवार, अमोल तायडे, बाबुराव इंगळे, महिला आघाडीच्या पार्वताबाई इंगळे, रोशन तायडे, राहुल धुंदाळेसह अनेक युवा कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# गोवंश तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करावी: विहिंप-बजरंग दलाचे निवेदन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.६**

ईद सणाच्या पार्श्वभूमिवर गोवंश तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी विहिंप-बजरंग दल संग्रामपूर शाखेच्या वतीने ठाणेदार तामगाव पोस्टे यांना एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, ७ जून २५ रोजी राज्यात बकरी ईद साजरी होणार आहे. यासाठी मोठया प्रमाणावर गोवंशाची कतल/कुर्बानी करण्यात येते. या अनुषंगाने गोवंश समिती अध्यक्ष महाराष्ट्र आयोग पुणे यांनी ईद सणाच्या कालावधीत राज्यातील गुरांचे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश २५ मे २०२५ रोजी दिले आहेत. तसेच संपूर्ण राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संग्रामपूर व सोनाळा येथे या आठवड्यात अवैध गोतस्करी करून आठवड्यातील गुरांच्या बाजार येथे विक्री किंवा बाहेरून वाहनांमधून गौवतस्करी, गौवंश चोरीचे प्रकार होणार नाहीत यादृष्टीने उपाययोजना करण्यात यावी तसेच या कालावधीत संग्रामपूर शहर व तालुक्यामध्ये गुरांचे बाजार बंद ठेवण्यात यावे अन्यथा भव्य स्वरूपात आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात दिला आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी तहसिलदार, ठाणेदार सोनाळा, जिल्हा पोलीस अधीक्षक सह संबंधितांना देण्यात आल्या.

# आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसचे संघटनात्मक पातळीवर मोठे बदल

## तेजेंद्रसींह चौव्हाण, स्वप्नील ठाकरे यांच्यावर ब्लॉक अध्यक्षाची जबाबदारी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.६**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाने संघटनात्मक पातळीवर मोठे बदल करायला सुरवात केली असून गत काही महिन्यांपासून काँग्रेस पक्षामध्ये कमालीचे उत्साहाचे वातावरण संचारले आहे. त्याातच आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष माजी आमदार हर्षवर्धन दादा सपकाळ यांच्या आदेशावरून बुलडाणा जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांसाठी विधानसभा समन्वयकांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. तर शहर व ग्रामीण ब्लॉक अध्यक्षही जाहीर करण्यात आले आहेत.

काँग्रेस उपाध्यक्ष गणेशराव पाटील यांनी काढलेल्या नियुक्ती पत्रानुसार खामगाव मतदारसंघ ज्ञानेश्वर पुरूषोत्तम पाटील, मेहकर विधानसभा देवानंद त्र्यांबकराव पवार, चिखली विधानसभा प्रा. डॉ. राजु प्रल्हाद गवई तर सिंदखेडराजा मतदारसंघाची अशोकराव श्रीराम पडघान यांच्यावर विधानसभा समन्वयक या अत्यांत महत्वाच्याच्या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. विधानसभा समन्वयक पद काँग्रेसमध्ये अत्यांत महत्वाचे समजले जाते आणि अनेक वर्षानंतर या पदाच्या नियुक्त्याा जाहीर करण्यात आल्या आहेत. याचा फायदा येत्याा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काँग्रेस पक्षाला होणार आहे. तर खामगाव ग्रामीण ब्लॉक अध्यक्ष म्हणून तेजेंद्रसींह चौव्हाण, खामगाव शहर स्वप्नील संजयराव ठाकरे, शेगाव शहर कैलास देशमुख, शेगाव ग्रामीण ज्ञानेश्वर शेजोळे तर ॲड भाउराव भालेराव यांना जळगाव जामोद ग्रामीणचे ब्लॉक अध्यक्षपद तसेच सतिश टाकळकर यांना संग्रामपूर ग्रामीण अध्यक्ष पद सोबतच आज प्रदीप देशमुख मेहकर ग्रामीण, प्रविण कदम मोताळा ग्रामीण, अनिल भारंबे मलकापुर ग्रामीण, आश्रू फुके लोणार ग्रामीण, रामदास डोईफोडे देऊळगाव राजा ग्रामीण अतिष कासारे देऊळगावराजा शहर यांच्या नियुक्तया झाल्या आहे. दरम्यान, काँग्रेस पक्षाची विचाधारा तळागळात पोहचविण्यासह जनेतचा विश्वास संपादन करण्यासाठी युध्दपातळीवर काम करणार असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

**आगामी काळात संघटनात्मक बांधणीला प्राधान्य : राहुल भाऊ बोंद्रे**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठ्या प्रमाणात यशाला गवसणी घालता आली. आता विधानसभेतील निकालाचे आत्मरीक्षण करुन काँग्रेस पक्षाने नवी उभारी घेतली आहे. आगामी काळात संघटनात्मक बांधणीला प्राधान्य देणार असल्याचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार राहुलभाऊ बोंद्रे यांनी सांगितले. नवनियुक्त विधानसभा समन्वयक तसेच शहर व ग्रामीण ब्लॉक अध्यक्ष यांचे मी अभिनंदन करतो. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष मोठ्या प्रमाणात विजय मिळवेल, असा विश्वासही राहुलभाऊ बोंद्रे यांनी व्यक्त केला.

# आ. खरातांकडून शेत रस्ते, पांदण रस्त्याचा आढावा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.६**

शेत रस्ते हे शेतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. ते शेतीमाल बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी आणि शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री शेतापर्यंत नेण्यासाठी महत्वाचे ठरतात. तसेच, शेतकरी आपल्या शेतामध्ये सहजपणे ये-जा करू शकतात, ज्यामुळे शेतीचे कामकाज सोपे व्हावे म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मेहकर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज दिनांक ६ जून २०२५ रोजी मेहकर येथील हॉटेल के व्हि प्राईड येथे शेत रस्ते,पांदन रस्त्याचा विकास आराखडा बैठक घेतली

या संदर्भात मेहकर लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या आढावा



घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या आधुनिक शेती साठी शेतरस्ते फार आवश्यक आहे. हार्वेस्टरसह पेरणी, नांगरणी साठी ट्रॅक्टर सारखी वाहने शेतात जाने गरजेचे आहे. त्या साठी पूरक कृती आराखडा तयार करण्याच्या संदर्भात तसीलदार व गटविकास अधिकारी यांना आदेश देण्यात आले. आलेल्या तक्रारींचा आठ दिवसाच्या आत निपटारा करावा अशाही सूचना आमदार खरात यांनी या वेळी महसूल व भूमिअभिलेख अधिकारी यांना दिल्या यावेळी तहसीलदार नीलेश मडके, डी बी खरात, डॉ उमेश देशमुख, शामभाऊ उमाळकर, आशिष रहाटे, जिल्हा संघटक गोपाल बच्छिरे, भास्करराव काळे, किशोर गरोळे, दत्ता पाटील घनवट, देवानंद पवार, संजय वडतकर, साहेबराव पाटोळे, प्रा. गजानन खरात, ॲड. आकाश घोडे युवा सेना तालुका प्रमुख, जीवन घायाळ, तारामती जायभाये यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
शनिवार, दि. ७ जून २०२५



## थोडक्यात

### अकरावी ऑनलाइन प्रवेश; १५,५०९ विद्यार्थ्यांचा शुल्क भरणा

**वाशिम :** इयत्ता अकरावीच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेची नोंदणी ५ जून रोजी दुपारी २ वाजता संपली. या मुदतीपर्यंत वाशिम जिल्ह्यातील १५ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली; मात्र केवळ १४ हजार ९०८ विद्यार्थ्यांची नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेतील पहिली फेरी सुरू झाल्यानंतर संपूर्ण राज्यातून विद्यार्थी नोंदणी करीत आहेत. त्यामुळे प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर ताण येत असल्याने हे संकेतस्थळ ठप्प होत आहे.

### मधमाशांनी हल्ला केल्याने युवक गंभीर जखमी

**कारंजा :** शेतात काम करीत असलेल्या



एका २७ वर्षीय युवकावर मधमाशांनी हल्ला केल्याने तो गंभीर जखमी झाला. ही घटना मानोरा तालुक्यातील खंडाळा शिवारात ४ जून रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली. रुपेश तुळशीराम राठोड (रा. खंडाळा) असे जखमी युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रुपेश राठोड बुधवारी सकाळी शेतात काम करत असताना अचानक मधमाशांच्या झुंडीने त्याच्यावर हल्ला चढवला. त्यात रुपेश राठोड गंभीर जखमी झाला. कुटुंबीयांनी तातडीने त्याला कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सद्यस्थितीत त्याची प्रकृती स्थिर असल्याचे कारंजा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### 'त्या' हत्याकांडातील आरोपीला न्यायालयीन कोठडी

**कारंजा:** काजळेश्वर येथील गतिमंद मुलीच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी अरबाज अली वल्द असलम अली (वय २२, रा. कामरगाव, ता. कारंजा) याची ५ जून रोजी न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. ३० मे रोजी एका २० वर्षीय गतिमंद तरुणीचा नग्नावस्थेतील मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणी ग्रामीण पोलिसांनी अरबाज अली याला अकोला येथून अटक केली. त्याला मंगरूळपीर अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली होती. ५ जून रोजी ती कोठडी संपल्यानंतर आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचे आदेश देण्यात आले.

### देशी दारूच्या अवैध वाहतुकीवर मानोरा पोलिसांची कारवाई

**मानोरा:** तालुक्यातील इंझोरी येथील अडाण नदीच्या पुलावर दुचाकीने अवैध वाहतूक केली जाणारी देशी दारू पोलिसांनी ४ जून रोजी रात्री पकडली. या कारवाईत दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून देशी दारूच्या १४ हजार रुपये किमतीच्या २९६ बाटल्या आणि दुचाकीसह एकूण ५४ हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. आढळून आलेला देशी दारूचा साठा कारंजा येथील सराफा लाइनमधील देशी दारूच्या दुकानातील असून, मनीष गणेशलाल जयस्वाल (रा. लक्ष्मीनगर, अमरावती ह.मु.निवारा कॉलनी, कारंजा) यांचा असल्याची कबुली आरोपीने पंचांसमक्ष दिली.

### देवदर्शनाहून परतताना अपघात; दोघे जखमी

**कारंजा :** नाशिक शिर्डी येथून देवदर्शनाहून परतत असताना खासगी प्रवासी वाहनाने ट्रकला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि. ४ जून) समृद्धी महामार्गावरील घडली. जखमींमध्ये चंदू साहेबराव खराडे (वय ४७, रा. शिवाजी नगर) आणि बाळासाहेब गुलाबराव सावरकर (वय ५२, रा. बायपास, कारंजा) यांचा समावेश आहे. दोघांनाही तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# शाळा अन् कंत्राटदारांच्या नोंदीत गोंधळच गोंधळ

## पोषण आहार खर्चात तफावत: वित्त विभागाच्या अहवालाकडे लक्ष

। धनंजय कपाले ।

**वाशिम, दि. ६ :** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय पोषण आहाराच्या खर्चात गोंधळ झाल्याची बाब समोर आली आहे. या अनुषंगाने लेखापरीक्षण दरम्यान शाळा आणि कंत्राटदारांकडील नोंदींमध्ये तफावत आढळून आली आहे. पोषण आहारासाठी वितरित धान्याच्या तपशीलातसुद्धा विसंगती आढळल्याने, पोषण आहार योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे. आता वित्त विभाग कसा अहवाल देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.



या चौकशीत शाळांनी उचल केलेल्या धान्याच्या नोंदी आणि कंत्राटदारांकडील नोंदी यामध्ये तफावत आढळून आली आहे. विशेषतः इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारासाठी वितरित धान्याच्या तपशीलात विसंगती आढळल्याने, पोषण आहार योजनेच्या विश्वसनीय अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता वित्त विभागाच्या अहवालात नेमका काय निष्कर्ष निघतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे याकडे योजनेंतर्गत पात्र जिल्हाभरातील शाळांच्या मुख्याध्यापकांचे लक्ष लागलेले आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय पोषण आहाराच्या खर्चात गोंधळ झाल्याचे लक्षात येताच प्राथमिक शिक्षण संचालकांच्या आदेशावरून २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीतील शाळांची लेखापरीक्षण मोहीम राबविण्याचे आदेश दिले. या चौकशी दरम्यान शाळा आणि कंत्राटदारांकडील नोंदींची तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये तफावत आढळून आली आहे.

या लेखापरीक्षणात शालेय पोषण आहाराशी संबंधित विविध आर्थिक व व्यवस्थापकीय बाबींची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मुख्यतः २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीतील बँक पासबुक व कॅशबुक तपशील, धान्य साठ्याच्या नोंदी आणि शिल्लक मालाचा आढावा घेण्यात आला. तांदूळ खर्च विवरण नोंदवही, शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या चलनाच्या छायांकित प्रती सर्व प्रकारच्या खर्चाचे व्हाऊचर्स आणि उपयोगिता प्रमाणपत्रे, विद्यार्थी व पोषण आहार शिजविणाऱ्या महिलांच्या आरोग्य तपासणीचे विवरण आदींची तपासणी करण्यात आली.

प्राथमिक शिक्षण संचालकांच्या आदेशावरून जिल्हा परिषद आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत शाळांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा वापर नियमानुसार झाला आहे की नाही, याची तपासणी करण्यात आली. यामध्ये शालेय पोषण आहार शिजविण्याच्या ठिकाणी स्वच्छतेचे नियम पाळले जात आहेत का, स्वयंपाक करणाऱ्या महिलांची आरोग्य तपासणी वेळेवर होते का, यासारख्या मुद्द्यांचीही छाननी करण्यात आली.

या चौकशीत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, शाळांनी उचल केलेल्या धान्याच्या नोंदी आणि कंत्राटदारांकडील नोंदी यामध्ये तफावत आढळून आली आहे. विशेषतः इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारासाठी वितरित धान्याच्या तपशीलात विसंगती आढळल्याने, पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता वित्त विभागाच्या अहवालात नेमका काय निष्कर्ष निघतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जिल्हाभरातील शाळांच्या मुख्याध्यापकांचे लक्ष लागलेले आहे.

**प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून शाळांना विविध प्रकारचे अनुदान वितरीत करण्यात येते आहे. शाळांना वितरीत करण्यात आलेल्या अनुदानाचा विनियोग नियमानुसार झाला किंवा नाही. या बाबींची चाचपणी सुरू आहे. त्या अनुषंगाने सन २०२०-२१ ते सन २०२३-२४ या कालावधीत करण्यात आलेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करण्याकरिता शिंदे, चव्हाण गांधी ॲण्ड कंपनी, पुणे या सनदी लेखापाल संस्थेमार्फत राज्यभरात चौकशी सुरू आहे.**

# प्रलंबित आणि सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करा : पालकमंत्री

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ६ :** जिल्ह्यातील विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, प्रलंबित कामांना गती मिळावी आणि जनतेला तातडीने सुविधा मिळाव्यात, यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधत ठोस पावले उचलावीत, असे स्पष्ट निर्देश राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात ६ जून रोजी आढावा बैठक पार पडली. बैठकीला आमदार श्याम खोडे, विधान परिषद सदस्य किरणराव सरनाईक, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी.एस. ठोंबरे आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्र्यांनी कृषी, जलसंधारण, महावितरण, पाणीपुरवठा, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदी विभागांच्या योजनांची तपशीलवार माहिती घेतली. अनेक विकासकामे प्रलंबित असल्याचे लक्षात आल्यानंतर पालकमंत्र्यांनी ती तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री पुरवावी. पाणीपुरवठा योजनांमध्ये विलंब टाळण्यासाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांच्या दर्जाबाबत विशेष लक्ष द्यावे, असेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. भरणे पुढे म्हणाले की, विकासकामे केवळ कागदावर राहता कामा नये, तर ती जमिनीवर प्रत्यक्षात उतरली पाहिजेत. जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन काम करणं हीच खरी जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. बैठकीला विविध विभागांचे यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

# कारची दुचाकीला धडक; पती ठार, पत्नी गंभीर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ६ :** वाशिम-मालेगाव रस्त्यावर जांभरून परांडे फाट्याजवळ भरधाव कारच्या धडकेने घडलेल्या अपघातात दुचाकीवरील पतीचा मृत्यू, तर पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना ५ जून रोजी दुपारच्या सुमारास घडली. किसन आर्जुना काकडे (वय ४३, रा. टो), असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांची पत्नी सुनीता काकडे (वय ४०) गंभीर जखमी आहेत. अपघातानंतर कार चालक वाहन घटनास्थळी सोडून फरार झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किसन व सुनीता काकडे हे एमएच ३७, क्यू १०२४ क्रमांकाच्या दुचाकीने वाशिमकडे जात होते. दरम्यान, एमएच १७ सीएम ५५५९ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र किसन काकडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सुनीता काकडे यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी कैलास माळेकर (रा. येवती) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला असून, वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# शिक्षण विभागामधील 'त्या' मुन्नाभाईंना बसणार चाप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. ६ :** दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर मेडिकल तपासणी करून खोट्या प्रमाणपत्रधारक उमेदवारांवर कारवाई करण्याबाबत आदेश पारीत झाला असून, दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्या पत्रानुसार राज्यात खूप मोठ्या प्रमाणात दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र घेऊन बरेच शासकीय, निमशासकीय सेवेत दाखल झालेले आहेत. बोगस प्रमाणपत्रांमुळे खऱ्या दिव्यांगांवर अन्याय होत आहे. यासाठी १९ जुलै २०१४ ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत "बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान राबविण्यात आले होते. सदर अभियानातून शासकीय व निमशासकीय सेवेत विविध विभागांमध्ये बोगस प्रमाणपत्राद्वारे नियुक्ती मिळालेल्या काही उमेदवारांची नावे निदर्शनास आली आहेत, तसेच बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्ती मिळविल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या १४ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देश व तरतुदीनुसार आपल्या कार्यालयामध्ये / विभागामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे नियुक्त झालेल्या तसेच पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची खातरजमा करून घेऊन त्याचा अहवाल पाठविण्याचे आदेश धडकल्याने आता वाशिम जिल्ह्यातील मुन्नाभाईंवर चाप बसणार असल्याने खळबळ ऊडाली आहे.

# अवकाळी पावसामुळे भाजीपाला उत्पादनात घट

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**भाजीपाल्याचे भाव कडकडले**

**मंगरूळपीर, दि. ६ :** गेल्या पंधरा दिवसांपासून होणाऱ्या अवकाळी बेमोसमी पाऊस व ठिकठिकाणी झालेली गारपीट व सतत ढगाळ वातावरण, कडक उन्हामुळे भाजीपाला उत्पादनात घट निर्माण झाल्याने भाजीपाल्याचे भाव कडाडल्याने सर्वसामान्यांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे.

अधुनमधून होत असलेल्या बेमोसमी पावसाने धुमाकूळ घातला आहे. या बेमोसमी पावसाने शेतातील उभ्या पिकासह भाजीपाला पिकावर परिणाम झाला आहे. अवकाळी येणारा पाऊस व कडक उन्हाच्या तडाख्यामुळे ग्रामीण भागातील भाजीपाला पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव होऊन भाजीपाल्याचे उत्पादन घटले. बाजारात भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. पालक ,कोथिंबिर, गवार, मेथी, शेपू ,आदी हिरव्या भाजीपाल्याची भाजीबाजारात आवक कमी झाली आहे. ग्रामीण भागात गावाच्या आठवडी बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या भाजीपाल्याचे येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. मिरची, दोडके, गवार, भेंडी, सिमला मिरची, आदी भाज्या तर ७० ते ८० रुपये प्रतिकिलोपर्यंत भाव गाठला आहे, त्यामुळे सर्वसामान्य मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या सर्व ग्राहकांच्या खिशाला झळ सोसावी लागत आहे. दिवसेंदिवस कमी होत चाललेल्या पावसाच्या प्रमाणामुळे सध्या शिवारातील विहिरीची पाण्याची पातळी कमी होऊन विहिरींनी तळ गाठला असल्याने भाजीपाल्याची लागवड कमी प्रमाणात झाल्याने भाजीपाला उत्पादन कमी-कमी होत चालल्याने भाजीपाल्याच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने अजूनही भाजीपाल्याचे भावात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे छोट्या लहान भाजीपाला व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

# जि. प. च्या कर्मचाऱ्यांनी जीव ओतून काम करावे - ना. भरणे

## कार्यालयात येणाऱ्या माणसाला समाधान वाटेल असे वर्तन ठेवावे



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ६ :** "चांगले काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कधीकधी त्रास सहन करावा लागतो; पण लक्षात घ्या, ज्या झाडाला फळे आहेत त्याच झाडाला लोक दगडं मारतात. म्हणून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी जीव ओतून काम करावे आणि कार्यालयात येणाऱ्या माणसाला समाधान वाटेल असे आपले वर्तन ठेवावे. आपल्या वागण्या, बोलण्यातून एखाद्याचं मन दुखेल, त्याची झोपमोड होईल, असे काम करू नये" असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

पालकमंत्री यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या प्रांगणात शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारून शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात अधिकारी- कर्मचाऱ्यांसह महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांना संबोधित केले. यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे आणि सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरखडे यांची उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले की, वैयक्तिक जिल्हा परिषदेत नोकरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ग्रामीण भागातील गोर-गरीब लोकांची सेवा करण्याची संधी मिळते. त्यामुळे जिल्हा परिषदेत नोकरी करणाऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आनंद द्यावा आणि आनंद घ्यावा. ताण- तणाव आणि दुःखाला विसरून कर्मचाऱ्यांनी आनंदाने आपले कर्तव्य बजावले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

### जिल्हा परिषदेच्या बोलक्या भिंतींचे उद्घाटन

वाशिम जिल्ह्यातील शाळा आणि अंगणवाड्यांच्या भिंती बोलक्या केल्यानंतर आता जिल्हा परिषद इमारतीच्या रंगरंगोटीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या बोलक्या भिंतीचे फित कापून उद्घाटन करण्यात आले, तसेच आरोग्य विभागाच्या जनजागृतीविषयक माहिती फलकाचे अनावरणही यावेळी करण्यात आले.

**"पुणे जिल्हा परिषद सदस्य ते अध्यक्ष असा प्रवास करून मी जरी मंत्री झालो असलो तरी जिल्हा परिषद अध्यक्ष असताना ग्रामीण भागातील लोकांची सेवा करण्याची जी संधी मिळाली त्याने मी खूप समाधानी आहे." आपण आमदार झालो. मंत्री झालो, याचे श्रेयसुद्धा त्यांनी जिल्हा परिषदेलाच दिले. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्याकडे निर्देश करत पालकमंत्री म्हणाले, "खेड्यातल्या माणसाला सर्वाधिक मदत जर कोणी करत असेल तर ते म्हणजे जिल्हा परिषद अध्यक्ष." याचा आपण स्वतः अनुभव घेतल्याचे त्यांनी सांगितले.**

# शिवराज्याभिषेक दिन: पालकमंत्र्यांचे छत्रपती शिवरायांना अभिवादन



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ६ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आज, ६ जून रोजी वाशिम शहरातील अकोला नाका व छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथील अश्वारूढ पुतळ्याला राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास तसेच औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विधान परिषद सदस्य आमदार किरणराव सरनाईक, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, पोलीस अधीक्षक अनुज तारे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार नीलेश पळसकर, नगर परिषदचे मुख्याधिकारी नीलेश गायकवाड, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे तसेच अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दरम्यान पालकमंत्री भरणे व उपस्थित मान्यवरांनी अकोला नाका येथील अश्वारूढ पुतळ्याच्या परिसरात वृक्षारोपण केले.

## थोडक्यात

### पिंजर ग्रामपंचायत येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा




**पिंजर** : पिंजर ग्रामपंचायतीच्या वतीने शुक्रवार, ६ जून रोजी सकाळी शिवस्वराज्य दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रामपंचायतीसमोर स्वराज्य गुढी उभारून अभिवादन करण्यात आले. यावेळी शारदा पांडुरंग ठक यांच्या हस्ते गुढी उभारून शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपसरपंच वसीम मन्सुरी, पांडुरंग ठक, वहीद काजी, वसीमभाई, शेफ भाई, गणेश भारस्कर, अशोक लोणाग्रे, मुस्ताक कुरेशी, गौरव चांगले, मंगलाताई गोरवे, ग्रामपंचायत अधिकारी, विजय घनगाव, शरद इंगोले, जाबीर भाई, अयुब भाई, सर्व सदस्य व गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा केला सत्कार



**मूर्तिजापूर** : येथील कराटे अँड स्पोर्ट्स असोसिएशन या मान्यताप्राप्त संस्थेतर्फे दरवर्षी शैक्षणिक प्रबोधन व क्रीडा विषयक नवनवीन उपक्रम राबविले जातात, तसेच या वर्षीसुद्धा स्कायसन सोलर एन्टरप्रायजेस यांच्या विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला होता. मूर्तिजापूर तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील १०० पैकी ८५ विद्यार्थी निवडले गेले. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी व दंडाधिकारी संदीपकुमार अपार हे होते तर अध्यक्ष व मार्गदर्शक पोलीस उपनिरीक्षक अनिल पवार, - श्री गाडगे महाराज मिशन मुंबई ४ चे संचालक सागर देशमुख व प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार संजय उमक व विजय साबळे उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन अशोक सुतारे व स्मृती सुतारे, उपाध्यक्ष भूषण जवंजाळ व आदर्श युवा शिक्षक विशाल वानखडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र गेठे व कार्यक्रम यशस्वीतेकरिता मंथन सुतारे, जितेंद्र चौबे, गजानन चव्हाण, पवन सोनोने आदींनी परिश्रम घेतले.

### देशी दारूचे ३०० क्वॉर्टर पकडले




**अकोट:** अकोट पोलीस स्टेशन ग्रामीण हद्दीतील ग्राम अंबाडी फाटा येथे नाकाबंदी केली असता मोटार सायकलवर अवैध दारूची वाहतूक करणारा आरोपी राजेश किसन सदांशिव रा. राजुरा याच्या ताब्यातून ३०० देशी दारूचे क्वॉर्टर किं. १०,५००रु. व अवैध दारू वाहतुकीसाठी वापरलेली होण्डा शाईन कंपनीची मोटारसायकल क्रमांक एम. एच. ३० बिजी ९०५६ किं.४०,०००रु. असा एकूण किं. ५०,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत पोलीस स्टेशन अकोट ग्रामीण जि. अकोला येथे दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट यांच्या पथकातील शेख नासीर, सुमीत कुलट यांनी केली आहे. पोलीस अधीक्षक यांचे ऑपरेशन ''प्रहार'' अंतर्गत ५ जून रोजी करण्यात आली.

### पिंपळखुटा ग्रामपंचायत येथे शिवस्वराज्याभिषेक दिन साजरा



**पिंपळखुटा:** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथील ग्रामपंचायतीच्यावतीने आज शुक्रवार, ६ जून रोजी सकाळी ग्रामपंचायतीसमोर स्वराज्य गुढी उभारून अभिवादन करून शिवस्वराज्याभिषेक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी पिंपळखुटा ग्रामपंचायतचे सरपंच पती सुभाष वाहोकार व सदस्य गणेश नागोलकार, गावातील नागरिक रऊफ शाह इमाम शाह, रोहित दांदडे, प्रफुल सदार यांच्या हस्ते गुढी उभारून शिवस्वराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.

# शिवाजीनगर शेतशिवारात पाळीव प्राण्यांवर जंगली जनावरांचा हल्ला

## पाच जनावरांचा मृत्यू, गावात दहशतीचे वातावरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. ६ : गावालगतच्या शिवाजीनगर शेतशिवारातील शेतात बांधलेल्या पाळीव प्राण्यांच्या गोठ्यावर काल रात्री जंगली जनावरांनी अचानक केलेल्या हल्ल्यात पाच जनावरांचा मृत्यू झाला असून, गावालगतच असलेल्या शिवाजीनगर शेतशिवारात विजय रघुनाथ निमकर्डे व रवी रघुनाथ निमकर्डे यांच्या गुरांच्या गोठ्यात गाई, वासरे व बकऱ्या बांधलेल्या असताना रात्री गोठ्यातील तीन बकऱ्या व दोन वासरांवर जंगली जनावरांनी हल्ला करून ठार केले आहे.**



यात तीन बकऱ्या अक्षरशः फाडून खाल्लेल्या अवस्थेत दिसून येत आहेत तर दोन वासरांना जखमी अवस्थेत मारुन टाकले आहे. आज सकाळी निमकर्डे यांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांना धक्काच बसला. त्यांनी ताबडतोब घडलेल्या घटनेची माहिती वनविभागाला दिली. यावर वनविभागाचे वनरक्षक अतिफ हुसेन यांनी घटनास्थळी भेट देवून तपासणी करून माहिती घेतल्यानंतर बकऱ्या आणि वासरांवर झालेला हल्ला हा जंगली जनावरांचा नसून तो कुत्र्यांनी केलेला असल्याची बाब प्रदर्शित केली. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अबोली कथे यांनी हल्ल्यात मेलेल्या जनावरांचे पोस्टमार्टेम केले. गोठ्यातील जनावरांवर काल झालेला अचानक हल्ला व त्यात जनावरांचा मृत्यू होणे यामुळे गावात जगली जनावरांबाबत दहशत निर्माण झाली असून, झालेला हल्ला हा कुत्र्यांनी केलेला नसून, तो जंगली जनावरांचाच असल्याचे मत निमकर्डे व गावातील नागरिकांनी व्यक्त केले आहे.

**जंगली जनावरांनी केलेल्या हल्ल्यात आमच्या झालेल्या नुकसानाची वनविभागाने तत्परतेने कार्यवाही करुन भरपाई द्यावी, अशी मागणी निमकर्डे यांनी ऑनलाइन तक्रारीतून वनविभागाकडे केली आहे.**

## पातूरच्या माळराजुरा फाट्यावर बर्निंग ट्रकचा थरार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. ६ :** अकोला - वाशिम महामार्गावर पातूरपासून वाशिमकडे सुमारे १० किलोमीटर अंतरावर असलेल्या माळराजुरा फाट्यानजीक मध्यरात्रीच्या सुमारास बर्निंग ट्रकचा थरार पहावयास मिळाला.

गुरुवार, ५ जूनच्या मध्यरात्री सुमारे १:३० वाजताच्या सुमारास पातूरपासून १० किलोमीटरवर असलेल्या माळराजुरा फाट्यानजीक कोंबड्यांचा चारा घेऊन जात असलेल्या एका धावत्या ट्रकला अचानक आग लागल्याचे ट्रक चालकाच्या लक्षात येताच ट्रकचालकाने सावधानता बाळगून महामार्गालगत असलेल्या सर्व्हिस रोडवर ट्रक थांबवला; मात्र तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. यावेळी त्या मार्गाने प्रवास करीत असलेले पत्रकार सय्यद साजीद हुसेन यांना हा प्रकार दिसल्याने त्यांनी पातूर नगर परिषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क केला असता अवघ्या काही वेळातच अग्निशामक दलाचे चालक सय्यद अश्फाक व प्रल्हाद वानखडे यांनी घटनास्थळी दाखल होऊन आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली; मात्र या आगीत ट्रक संपूर्णपणे जळून खाक झाला असून, ट्रकला आग लागल्याचे चालकाच्या वेळीच लक्षात आल्याने सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे मध्यरात्रीच्या सुमारास महामार्गावरील वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या लांब रांगा लागल्या असता, पातूर पोलिसांनी घटनास्थळी वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, आगीचे नेमके कारण कळू शकले नसून पातूर पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## शेतकरी मेळावा व सत्कार सोहळ्याचे सोमवारी आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ६ :** सामाजिक कार्यात तसेच बँकिंग क्षेत्रात सदैव अग्रेसर असलेल्या बुलडाणा अर्बन परिवाराचे राधेश्याम चांडक यांच्या प्रेरणेने अकोला विभागाच्यावतीने ९ जून सोमवारला सायंकाळी ५.३० वाजता ज्ञानदेवा मंगलम अकोला रोड, अकोट येथे शेतकरी मेळावा व नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे .



कार्यक्रमाला प्रामुख्याने बुलडाणा अर्बन संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, आमदार प्रकाश भारसाकळे, कृषी उत्पन्न बाजार समिती अकोटचे सभापती प्रशांत पाचडे, ह. भ. प. गुरुवर्य तुकाराम महाराज (सखारामपूरकर), ह. भ. प. शुकदास महाराज गाडेकर, अखिल भारतीय गुरुदेव मंडळ तथा संचालक वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवाश्रम पाटसुळ, तसेच बुलडाणा अर्बन अकोटचे स्थानिक संचालक गोकुळदास चांडक आदींची उपस्थिती राहणार आहे. यावेळी उपस्थित शेतकरी, संस्थेचे ग्राहक, सभासद यांना संस्थेविषयीच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे, तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांचा सत्कार होणार आहे. अकोला जिल्ह्यातील शेतकरी बांधव, संस्थेचे ग्राहक सभासद व नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अकोला विभागाचे विभागीय व्यवस्थापक विठ्ठल दळवी यांनी केले आहे.

## रखडलेले अनुदान त्वरित वितरीत करण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ६ :** मागील पाच महिन्यांपासून रखडलेले विविध योजनांचे अनुदान त्वरित वितरित करणे बाबतीत बाळापूर तालुका वंचित बहुजन युवा आघाडीकडून बाळापूर तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजनेच्या माध्यमातून हजारो लाभार्थ्यांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते; मात्र गेल्या मागील पाच महिन्यांपासून मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा झालेले नाही, त्यामुळे लाभार्थ्यांचे जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषत: वृद्ध, विधवा, अपंग तसेच निराधार महिलांसाठी मिळणारे मानधन जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी महत्त्वाचे आहे. शासनाने काही महिन्यांपूर्वी संबंधित योजनेचे मानधन थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या



खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतलेला आहे; मात्र या प्रणालीची अंमलबजावणी होत नसल्याने लाभार्थ्यांचे मानधन मिळाले नाही. तांत्रिक अडचणींमुळे डीबीटी प्रणाली अद्याप अपूर्ण कार्यान्वित झालेली आहे. त्यामुळे योजनेच्या लाभार्थ्यांना संकटांना सामोरे जाण्याची वेळ निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत हजारो लाभार्थ्यांना घर चालविणे कठीण झाले आहे, त्यामुळे शासनाने डीबीटी कार्यप्रणाली कार्यान्वित होईपर्यंत जुनी ऑफलाइन पद्धत लागू करून लाभार्थ्यांचे थकीत मानधन त्वरित वितरित करण्यात यावे, असे वंचित बहुजन युवा आघाडीकडून तहसीलदार यांना सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन सादर करतेवेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष सुगत डोंगरे, महिला आघाडीच्या अध्यक्ष अनुराधा डांगे, अमोल वानखेडे, राजदार खान, निशिकांत सरदार, मनोज राठोड, सादीक भाई ठेकेदार सह आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हत्येचा प्रयत्न करणाऱ्या तीन आरोपींना अटक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ६ :** पोलीस स्टेशन बाळापूर हद्दीत येत असलेल्या व्याळा ग्राम येथील बत्तीस वर्षीय इसमाची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना बुधवार, ४ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली असून, त्याबाबत तीन आरोपींवर विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन अटक करण्यात आली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार व्याळा येथील बत्तीस वर्षीय आनंद विश्वास दामोदर यास अजय पांडुरंग सोळंके व त्याचे साथीदार यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून प्राणघातक हत्यारांचा वापर करून जखमी करून जिवे मारण्याच्या उद्देशाने हमला केला असल्याचे फिर्यादी सिंधू विश्वास दामोदर यांच्या घरात घुसून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीत म्हटले आहे तर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी तसेच बाळापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी यांना सदर गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानुसार गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी व्याळा येथील घटनास्थळी भेट देऊन गुन्ह्याची माहिती अवगत करून घेतली व गुन्ह्यातील तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण व तपास पथकातील अंमलदार यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपी अजय पांडुरंग सोळंके वय २८. सतीश देवलाल डाबेराव वय २८, नंदु ऊर्फ मंगलसिंग सुनील सोळंके वय २४ सर्व राहणार व्याळा यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, उपरोक्त कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, सहायक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, पोलीस अंमलदार अब्दुल मजीद, महेंद्र मलिये, शेख वसीम, रवि खंडारे, एजाज अहमद, अविनाश पाचपोर, प्रशांत कमलाकर, अशोक सोनवणे यांनी केली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## गावकऱ्यांना मिळाले बचावाचे महत्त्वाचे धडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** आपत्ती काळात नागरिकांनी घाबरून न जाता योग्य निर्णय घेणे आणि तत्परतेने बचाव कार्य करणे अत्यंत आवश्यक असते. अशाच काळात ग्रामस्थ सज्ज राहावेत, यासाठी वंदे भारत शोध व बचाव पथक कुरणखेळ यांच्यावतीने अकोला जिल्ह्यातील दोनवाडा येथे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात गावकऱ्यांना आपत्तीच्या वेळी प्रथमोपचार, जलप्रलय, आगीसारख्या घटनांमध्ये बचाव कार्य कसे करावे, याचे प्रात्यक्षिक आणि माहिती



देण्यात आली. वंदे भारत बचाव पथकातील उमेश आटोटे, नितेश मोहोळ, प्रदीप मोहोळ, धर्मशील मोहोळ, सुनील कल्ले, रामभाऊ दोरकर, वाहनचालक प्रेमकुमार, दामोदर (होमगार्ड अकोला), शिवाजी टाले आणि संदीप साबळे यांनी प्रशिक्षण घेतले. शिबिरास गावातील सरपंच, उपसरपंच, तलाठी रवींद्र दराडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. गावकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, पूर, घरगुती अपघात किंवा अग्निकांड अशा वेळी योग्य कृती कशी करावी, मदत कशी मागवावी आणि एकमेकांना कशी मदत करावी, याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. अशा प्रकारचे प्रशिक्षण शिबिर ग्रामीण भागात होणे ही काळाची गरज आहे. ग्रामस्थांनीही या शिबिराला चांगला प्रतिसाद दिला.

# आज श्री संत वासुदेव महाराज पालखीचे पंढरीला प्रस्थान

## अकोटवासियांनी ठिकठिकाणी केली स्वागताची जय्यत तयारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आकोट, दि. ६ :** वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आज श्री क्षेत्र पंढरपूर वारीकरिता प्रस्थान होणार आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रम सुनियोजित आहेत. श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट द्वारा प्रतिवर्षी श्रींचा पालखी सोहळा श्री क्षेत्र पंढरपूर वारीचे आयोजन करून जिल्ह्यातील असंख्य वारकऱ्यांसह हा पालखी सोहळा श्री क्षेत्र पंढरपूरला पोहोचत असतो. यावर्षी ७ जून रोजी पालखी सोहळ्याचे श्री क्षेत्र श्रद्धा सागर येथील श्री गुरु मंदिरातून प्रस्थान होणार आहे. यानिमित्ताने पहाटे श्रींचा रजत मुखवटा व पादुकांचा अभिषेक, आरती, तसेच संस्थाध्यक्ष श्री हभप वासुदेवराव महाराज महल्ले यांचे सकाळी ९ वाजता प्रस्थानाचे कीर्तन, वारकऱ्यांना पोशाख वितरण, विमा कवच सुरक्षा, तद्नंतर एकादशी फराळ महाप्रसाद घेऊन दुपारी १



वाजता श्रींच्या मंदिरातून टाळकरी, वारकरी, पताकाधारी, अब्दागिरीधारी यांच्यासह श्रींचे प्रस्थान होणार आहे.

पालखी मार्गाने नंदीकेश्वर पेट्रोलियम, कालवाडी फाटा, शिवाजी कॉलेज, उज्ज्वल नगर, सरस्वती नगर, शनिवारा, कालंका चौक, श्री संत नरसिंह महाराज मंदिर प्रांगण, श्री संत वासुदेव महाराज निवासस्थान, सोनू चौक, जवाहर रोड, गुरुनानक किराणा, निशांत सहकारी पतसंस्था, पुष्पांजली मंगल कार्यालय, आदी ठिकाणी श्रींच्या पालखी सोहळ्याचे भव्य स्वागत होऊन सायंकाळचा मुक्काम गजानन जायले यांच्याकडे राहील. यंदा १६ व्या वर्षी निघत असलेल्या पालखी सोहळ्याकरिता भाविकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत व सहभाग घेऊन पालखी सोहळ्याची शोभा वाढविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे वस्त्रदान समारंभ

वारकरी भाविकांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा श्री संस्थेकडून वस्त्रदान समारंभ आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे नोंदणी करणाऱ्या आणि येथूनच पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या पुरुष वारकऱ्यांना श्वेतवस्त्र तसेच महिला वारकऱ्यांना साडी-चोळी सस्नेह देण्यात येणार आहे. वस्त्रदानाकरिता संस्थाध्यक्ष वासुदेवराव महल्ले व सचिव रवींद्र वानखडे यांचे भरीव आर्थिक योगदान अनेक वर्षांपासून मिळत आहे.

**आमदार भारसाकळे यांच्या हस्ते वारकरी रुग्णवाहिकेचा भक्तार्पण सोहळा बेलुरा ग्रामपंचायतचे सरपंच राम त्र्यंबकराव मंगळे यांच्याकडून श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोटकरिता रुग्णवाहिका श्रींचरणी अर्पण करण्यात येत आहे. श्रीक्षेत्र पंढरपूर वारीच्या प्रस्थान सोहळ्यामध्येच सकाळी ११ वाजता अकोट विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्ते या वारकरी रुग्णवाहिकेचा भक्तार्पण सोहळा संपन्न होत आहे.**

## ग्रामपंचायत सोनाळा येथे (पोकरा) अंतर्गत सूक्ष्मनियोजन कार्यक्रम




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बोरगाव मंजु, दि. ६ :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा -२) अंतर्गत सोनाळा येथे गावामध्ये लोकसहभागीय सूक्ष्म नियोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मशालफेरी, प्रभातफेरी व गटचर्चा गावातील नागरिक व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रकल्पाची माहिती देण्यात आली.

शेतकऱ्यांना हवामानानुकूल प्रकल्प आराखडा तयार करणे, पाण्याचा ताळेबंद, भूमिहिनांसाठी शेळीपालन, दुग्धव्यवसाय, गटशेती, शेतीपूरक व्यवसाय यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रांगोळीच्या माध्यमातून गाव नकाशा रेखाटून शेतकऱ्यांना योजनेची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला कृषी पर्यवेक्षक महाजन, सूक्ष्म नियोजन समन्वयक वैभव गायकी, कृषी सहायक अधिकारी वैशाली इंगळे, सरपंच महानाम भानुदास फुलके, ग्रामपंचायत अधिकारी पूनम घायवट, ग्राम कृषी विकास समितीचे सदस्य व महिला बचत गटाच्या आयसीआरपी शिला चव्हाण, सारिका शिराळे, मीना गव्हाळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

शनिवार, दि. ७ जून २०२५

## थोडक्यात

### महिलेला अश्लील इशारे करून धमकी

**अमरावती :** वाहनाच्या आत डोकावून महिलेला अश्लील इशारे करीत असल्याने याबाबत महिलेच्या पतीने हटकले असता तिला पतीलाही शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत ही घटना तीन जून रोजी घडली. महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात गज्या ऊर्फ चशक जाधव रा. अमरावती याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### दोन लाखांसाठी छळ

**अमरावती :** माहेरहून दोन लाख रूपयांसाठी शारीरिक व मानसिक छळ करून तिला माहेर पाठवून दिले. याप्रकरणी पीडित महिलेने राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारनुसार न सासरच्या मंडळीविरूध्द कलम 85 बिएनएस व कलम 498 अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### अल्पवयीन १६ वर्षीय मुलीला पळवून नेले

**अमरावती :** सिटी कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरून बेपत्ता झाली आहे. नातेवाईकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला परंतु मिळून न आल्याने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आपल्या मुलीला अज्ञाताने पळवून नेल्याचा संशय मुलीच्या आईने तक्रारीत व्यक्त केला. त्या आधारे सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात कलम १३७ (२) बिएनएस, कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### लग्न समारंभातून ४७ हजारांचे कॅमेऱ्याचे जिंबल लंपास

**अमरावती :** सातुर्णा मार्गावरील महेंद्र लॉन येथून सुरू असलेल्या लग्न समारंभातून कॅमेऱ्याचे अंदाजे ४७ हजार रूपयांचे जिंबल अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना तीन जून रोजी घडली. याप्रकरणी फोटोग्राफर सुधीर रविंद्र कापसे रा. मोर्शी यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात कलम ३०५ (अ) बिएनएस, कलम ३८० अन्वये अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### लग्नाला गेला अन् दुचाकी गमावून बसला

**अमरावती :** गाडगेनगरातील तुकडोजी महाराज मंगल कार्यालयासमोर उभी करून ठेवलेली हिरोहोंडा स्पेलंडर कंपनीची एमएच २७ बीए ८८७५ क्रमांकाची दुचाकी किंमत अंदाजे २० हजार अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना ४ जून रोजी घडली. याप्रकरणी अमोल गणेश जोंधळे वय ३३ रा. कवठा बहाळे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम ३०५ (अ) बिएनएस, कलम ३८० अन्वये अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### दुचाकी अपघातात एक ठार

**अमरावती :** भरधाव दुचाकीची अन्य एका दुचाकीला धडक बसल्याने यात दुचाकीवर मागे बसलेल्या इसम गंभीर जखमी झाला व त्यातच त्याचा मृत्यू झाला. पोहरा ते सावंगा फाटानजिक हा अपघात ४ जून रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडला. सदाशिव भगत असे मृताचे नाव आहे. अपघात घडल्यानंतर दुचाकीस्वार पळून गेला. याप्रकरणी हर्षल प्रशांत भुताडे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात दुचाकी चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### गद्रे चौकात चारचाकी धडकल्या, तीन जण जखमी

**अमरावती :** दोन चारचाकी धडकून अपघात घडला. या अपघातात तीन जण जखमी झाले. राजापेठ परिसरातील गद्रे चौकात हा अपघात घडला. यात पती-पत्नीसह मुलगा असे तीन जण जखमी झाले. ते कुल्फी खान्यासाठी जात असताना हा अपघात घडला. याप्रकरणी संजय उमक वय ५८, रा. गणेडीवालनगर, कॅम्प यांच्या तक्रारीवरून एमएच २७ डिई ४०१९ च्या कार चालकाविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# तिसऱ्या वर्गापासूनच व्यावसायिक शिक्षण!

## राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा जाहीर

## पहिली ते दहावीसाठी मराठी व इंग्रजी अनिवार्य

अजिंक्य भारत |सुधीर केने

**अमरावती, दि. ६ :** राज्यात नव्या अभ्यासक्रमाची सुरुवात यावर्षीपासून होत आहे .तूर्तास पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम बदलणार असला तरी नव्या धोरणानुसार इयत्ता तिसरी पासूनच व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात येणार आहे. तर नववीपासून विशेष व्यावसायिक शिक्षणाची सोय नव्या अभ्यासक्रमात केली जाणार आहे .राज्य अभ्यासक्रम आराखडा मसुदा नुकताच जाहीर झाला यामध्ये राज्य अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये नमूद केली आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल करण्यात येत आहे. या धोरणानुसार यावर्षीपासून पहिलीचा अभ्यासक्रम बदलणार आहे. त्यानंतर २०२८- २९ पर्यंत बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्णत: बदलणार आहे. यासाठीचा राज्याचा अभ्यासक्रम आराखडा नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये राज्य अभ्यासक्रम आराखड्याची वैशिष्ट्ये नमूद करण्यात आली आहे.



पहिली ते दहावी साठी मराठी व इंग्रजी हा विषय अनिवार्य ठेवण्यात आला आहे. सहावीपासून हिंदी, संस्कृत सह अन्य भारतीय व परदेशी भाषा शिकवण्याचा पर्याय शाळांना उपलब्ध करून दिला आहे. अकरावी व बारावी साठी दोन भाषांचे शिक्षण ठेवण्यात आले आहे. तिसरीपासून व्यावसायिक शिक्षण यामध्ये आठवीपर्यंत पूर्व व्यावसायिक कौशल्य आणि नववी पासून विशेष व्यावसायिक शिक्षण देण्यात येणार आहे. व्यावसायिक शिक्षण अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डाटा सायन्स, कृषी इत्यादी नाविन्यपूर्ण विषय उपलब्ध होणार आहे .व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी किमान कौशल्य तसेच व्यावसायिक ज्ञान संपादन करून शकेल अशा प्रकारचा हा अभ्यासक्रम राहणार आहे.

विशेष म्हणजे नव्या अभ्यासक्रमामध्ये काही विषयांचे मूल्यमापन मंडळ स्तरावर आणि काही विषयांचे मूल्यमापन शाळा स्तरावर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. बोर्डाची जी परीक्षा होणार या परीक्षा द्वारे मूल्य आणि स्वभाव वृत्तीचे मूल्यमापन ही नवी पद्धत अवलंबली जाण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गरजा व अभ्यासक्रमाची सुसंगतअसा अभ्यासक्रम राज्यात राबविण्याबाबत युद्ध स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

### सत्र पद्धतीचा अवलंब

शालेय परीक्षा घेत असताना विद्यार्थ्यांवर पूर्णवेळ अभ्यासाचा ताण पडू नये यासाठी सत्र पद्धतीचा अवलंब करणे विचाराधीन आहे. यामुळे विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षा वेळी येणारा ताण कमी होईल व परीक्षेच्या एका सत्राचा अभ्यासक्रम करावा लागेल यासाठी ही पद्धत अवलंबिता येईल का असा विचार शासन स्तरावर सुरू आहे.

# मेळघाट हादरले, भूकंपाचे सौम्य धक्के

## शिवाझरी परिसरात भूकंपाचा केंद्रबिंदू | रेक्टर स्केलवर 3.8 तीव्रतेची नोंद

अजिंक्य भारत |भारत वरठे

**धारणी, दि. ६ :** मेळघाटातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये बुधवारी रात्री अचानक भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. रात्री ९.५८ वाजताच्या सुमारास आलेल्या या धक्क्याने सीमावर्ती गावांमध्ये क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. धारणी तालुक्यातील शिवाझरी हे गाव केंद्रबिंदू ठरले या होती, अशी माहिती राष्ट्रीय भूगर्भ संशोधन संस्थेने दिली आहे.

या भूकंपाचा जोर फारसा नसला तरी, शिवाझरी गावातील १०० पेक्षा अधिक घरांमध्ये हलके झटके जाणवले. परिसरातील सुसर्दा, डाबला, राणीगाव, नारदू या गावांमध्येही धक्के जाणवले. अचानक घरे डोलू लागल्याने अनेक ठिकाणी नागरिक भीतीने घराबाहेर धावले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भाटकर यांनी दिली.



धारणी : भूकंपाचा धक्का बसताच नागरिक घरा बाहेर मैदानात आले.

### ९ महिन्यांत दुसऱ्यांदा भूकंप

या भागात भूकंपाची ही घटना नऊ महिन्यांत दुसऱ्यांदा घडली आहे. मागील वर्षी ३० सप्टेंबर २०२३ रोजी, दुपारी १.४५ वाजता, मेळघाटातच भूकंपाचे धक्के बसले होते. त्यावेळी अचलपूरपासून अवघ्या 400 मीटर अंतरावर केंद्रबिंदू नोंदविण्यात आला होता. चिखलदरा, मोया, सलोना, सेमाडोह, हरिसाल या भागांनाही त्याचा फटका बसला होता.

### अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातही जाणवले धक्के

भूकंपाच्या या सौम्य झटक्यांचे लोक अमरावती जिल्ह्यासह अकोला व बुलढाणा जिल्ह्यांतील उत्तर भागातसुद्धा जाणवले. धारणी, चिखलदरा व अंजनगाव भागांतील नागरिकांनी घरे डोलल्याचा अनुभव घेतल्या आहे. सुदैवाने या भूकंपात कोणतीही जीवितहानी किवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही. मात्र, सातपुडा पर्वतरांग हा भूकंपीयदृष्ट्या संवेदनशील पट्टा असल्याने प्रशासनाने संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# शिरजगांव कसबा रस्त्यावरील अवैध वृक्षतोडीविरुद्ध अखेर पोलिसात तक्रार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. ६ :** तालुक्यातील अवैधरित्या वृक्षतोडीबाबत सातत्याने वृत्त प्रकाशित करून शासनाचे लक्ष वेधून घेत येत आहे. अशातच काही दिवसापूर्वी तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी ते शिरजगाव कसबा रस्त्यावरील अवैध वृक्षतोडी संदर्भात नमस्कार अमरावतीमध्ये सचित्र वृत्त प्रकाशित करताच शासन वर्तुळात खळबळ उडाली. दरम्यान या घटनेप्रकरणी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चांदूरबाजार यांनी ब्राम्हणवाडा थडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सहाय्यक वनसंरक्षक, अमरावती यांच्या पत्रानुसार, प्रकाश विठ्ठल आजनकर (रा. ब्राह्मणवाडा थडी, व्यापारी चांदूरबाजार) यांनी परवानगीपेक्षा जास्त, एकूण २७ झाडे बेकायदेशीरपणे तोडल्याचा आरोप आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा यांच्या आदेशानुसार (क्र. १२०, दिनांक १२/९/२०२४) केवळ २१ झाडांच्या फांद्या छाटण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, आजनकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील शासकीय मालमत्ता असलेली ही झाडे बुडापासून तोडली. ही झाडे राष्ट्रीय संपत्ती असून, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्तव्य आहे. उपविभागीय अभियंत्यांनी पोलिसांना केलेल्या तक्रारीत, या शासकीय मालमत्तेचे नुकसान आणि चोरीचा प्रयत्न झाल्याचे नमूद करून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला असून, लवकरच कारवाई होण्याची





# घरफोडीतील दोन आरोपींना जळगावमधून अटक

## राजापेठ पोलिसांची धडक कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ६ :** शहरातील नवाथे नगरातील बंद घर फोडून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम व लॅपटॉप चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना राजापेठ पोलिसांनी जळगाव जिल्ह्यातून अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे 1 लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विठ्ठल भालचंद्र पाटील (४१, रा. चुचाळे, ता. चोपडा, जि. जळगाव) आणि राज लिंगम पिचैमुथु (२१, रा. आदर्श नगर, चोपडा, जि. जळगाव) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. हे दोघे 15 मे रोजी नवाथे नगरातील विजू बावणे यांच्या बंद घरात घुसून १.४४ लाख रुपये रोख व दोन लॅपटॉप चोरी करून फरार झाले होते. विनायक मूर्ती पलनीस्वामी हे घर भाड्याने घेऊन फळ विक्रीचा व्यवसाय करतात. गावी गेले असताना ३१ मे रोजी परतल्यावर घर फोडल्याचे निदर्शनास आले. यानंतर राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी सिसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. त्यानुसार डिबी पथकाने जळगाव जिल्ह्यात जाऊन दोन दिवस सखोल तपास करून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून 35 हजारांचे लॅपटॉप, ८० हजारांची पल्सर दुचाकी, २० हजारांचे दोन मोबाईल असा एकूण १.७० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे व सहायक आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनात झाली.

### दोन दुचाकी चोर गजाआड

**अमरावती :** गाडगेनगर पोलिसांनी 4 जून रोजी रात्री दोन अट्टल दुचाकी चोरट्यांना अटक केली. कुलदीप गोपालराव मोहेकर (२२) व प्रज्वल रामभाऊ मोहेकर (२२, दोघेही रा. जसापूर, चांदूरबाजार) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून गाडगेनगर व चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरलेल्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्यात.

# गाडगेनगर पोलिसांकडून ३२ गोवंशांना जीवनदान

## अबूबकर नगरमध्ये धडक कारवाई

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.६ -** गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील अबूबकर नगर परिसरात गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत डीबी पथकाने ३२ गोवंशांची सुटका करत त्यांना जीवनदान दिले. ही कारवाई गुरुवारी (दि.५) रोजी करण्यात आली. सर्व गोवंशांना सुरक्षित गोरक्षण संस्थेत हलविण्यात आले आहे.



पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी अमरावती पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील सर्व ठाण्यातील अधिकार्यांना गोरक्षण व गोवंश हत्या प्रतिबंधासाठी विशेष लक्ष देण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर गाडगेनगर पोलीस ठाण्याचे पथक नियमित गस्त घालत होते. दरम्यान, अबूबकर नगर परिसरात काही गोवंशांना बेकायदेशीररीत्या कत्तलखान्यात नेण्यासाठी ठेवण्यात आले आहे, अशी गोपनीय माहिती मिळाल्यानंतर डीबी पथकाने तत्काळ छापा टाकला. या कारवाईदरम्यान ३२ गोवंश आढळून आले, जे कत्तल करण्यासाठी बेकायदेशीरपणे ठेवण्यात आले होते. पोलिसांनी सर्व गोवंश ताब्यात घेऊन सुरक्षित गो-शाळेत हलवले. ही कारवाई गाडगेनगर पोलीस ठाणे व डीबी पथकाच्या संयुक्त प्रयत्नांतून करण्यात आली.

# ईद निमित्त पोलिसांचा मोर्शी शहरातून रूटमार्च

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोर्शी, दि. ६ :** बकरी ईद व येणाऱ्या सर्व सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस स्टेशन मोर्शीच्या वतीने नुकताच शहरातून रूट मार्च काढण्यात आला. दरम्यान स्थानिक पोलीस स्टेशन मोर्शी येथे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दि.४ जून रोजी शांतता समितीची सभा पार पडली.

सर्वप्रथम पोलीस उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या उपस्थितीत होऊ घातलेल्या बकरी ईद व येणारे सर्व सण गुण्यागोविंदाने साजरे करण्यात यावे.दोन पेक्षा अधिक व्यक्तीने एकत्रित येऊ नये.कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार गावात घडू नये या उद्देशाने कायदा व सुव्यवस्था संबंधाने दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात येऊन रूट मार्च काढण्यात आला.या रूट मार्चची सुरुवात स्थानिक जयस्तंभ चौक येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणपती मंदिरापासून मुख्य बाजारपेठसह अति संवेदनशील भागातून मार्गक्रमण करून गांधी चौक, गुजरी बाजार चौक ते रामजीबाबा चौक येथे रूट मार्चचा समारोप करण्यात आला.या पोलीस रूट मार्चमध्ये मोर्शी पोलीस स्टेशनचे 3 अधिकारी, २० पोलीस अंमलदार,





आरसीपी पथक सहभागी होते.दरम्यान पोलीस स्टेशन येथे आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ठाणेदार नितीन देशमुख यांनी सर्व जाती धर्मातील लोकांनी बकरी ईद उत्सवासह येणारे सर्व सण शांततेत पार पाडावे कोणत्याही प्रकारचा जातीय तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहन केले.यावेळी मोर्शी शहरातील पत्रकार बांधव, मौलवी, माजी नगरसेवक प्रतिष्ठित नागरिक, मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवगड येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ६ :** येथील शिवगड येथे आज शिवराज्याभिषेक समिती व शिवगड संवर्धन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला.

आज शुक्रवार, दि. ६ जून रोजी शहरात बऱ्याच ठिकाणी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. त्या प्रमाणे शिवराज्याभिषेक समिती व शिवगड संवर्धन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शिवगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा हारार्पण करून राज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला. या प्रसंगी मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी तथा कार्यकर्ते हजर होते. यावेळी शिवाजी महारांच्या शौर्यगाथांची माहिती विषद करण्यात आली. यांप्रसंगी शिवश्री सुरेंद्र आडे, मनोहरराव कडू, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. पिदडी, अश्विन चौधरी, डॉ प्रफुल गुडदे, चंद्रकांत मोहिते, प्रकाशराव राऊत, चंद्रशेखर कोहळे, राजेंद्र अढाऊ, संजय ठाकरे, मनीष पाटील, संजय गावंडे, डॉ गौरव विधळे, मुरलीधरराव देशमुख, डॉ.वैशाली गुढदे, वैशाली कोहळे, श्रीमती रोडे, मैथिली पाटील, जया डवरेसह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.





## थोडक्यात

### प्राथमिक आरोग्य केंद्रात संशयित कर्क रुग्ण शिबीर

**अंजनगाव बारी** – दि.२७ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी येथे अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातर्फे कर्करोग तपासणी करिता Cancer Van आली. त्यावेळेस प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी व अंतर्गत येणाऱ्या आरोग्य केंद्रातून संशयीत कर्करोगाचे रुग्ण तपासणी करता आले. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रिकुंजय केचे, डॉ. विजय सोनपरोते तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी व आशा उपस्थित होत्या.या शिबीरात ३५ रूग्णांची कॅन्सर तपासणी करण्यात आले.१८ रूग्णांना स्त्रीरोगतज्ञ नेले.१७ रूग्णांचे स्क्रीनिंग सर्जरीन केले. तर ७ रूग्णांना रेफर करण्यात आले.

### रायपूर कासारखेड येथे दाम्पत्याला मारहाण

**धामणगाव रेल्वे :** दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेताच्या वाहीच्या कारणाणावरून युवकाने दाम्पत्यासोबत वाद घालत त्यांना मारहाण केली. शिविगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना रायपूर कासारखेड येथे घडली. याबाबत रामदास नत्थुजी शेंडे (६५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी सचिन तुकाराम खंडारे (३५) याच्याविरुद्ध ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### पैशाच्या वादातून पत्नीचा पतीवर हल्ला

**तिवसा :** मजुरीचा एक पैसाही पती घरी देत नसल्याने पत्नीने त्याला हटकले. त्याला शिविगाळ करीत मारण्याची धमकी देत त्याच्यावर विळ्याने हल्ला चढवित जखमी केले. ही घटना चांदूर ढोरे येथे घडली. जानराव किसनराव नांदणे (५५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ

**चांदूर बाजार :** घरगुती कारणावरून विवाहितेसोबत वाद घालत तिचा सासरच्यांनी शारीरिक व मानसिक छळ केला, तर पती दारू पिवून त्रास देतो. याबाबत तिने ब्राह्मणवाडा थडी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पतीसह सासरच्या एकूण पाच जणांविरुद्ध सर्व रा. बेलमंडळी यांच्याविरुद्ध ८५, ३५२, ३५१ (२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### घरगुती कारणावरून छळ; दोघांवर गुन्हा दाखल

**मोर्शी :** घरगुती कारणावरून पतीसह सासू शारीरिक व मानसिक छळ करीत असल्याची तक्रार विवाहितेने मोर्शी पोलिसात दिली. पोलिसांनी पती सर्वेश नंदू चरपे (२४) व महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### परतवाडा येथे सुरक्षा रक्षकाची दुचाकी चोरी

**परतवाडा :** शहरातील एलआयी चौकातील एका बँकेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या दीपक रमेशराव बुल (२९, रा. निजामपूर, ता. अचलपूर) याची अज्ञाताने बँकेच्या परिसरातून दुचाकी (एमएच २७–सीएफ ९९९५) चोरून नेल्याची घटना घडली. युवकाने दिलेल्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०३(२) कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**चांदूर बाजार :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना चांदूर बाजार ते मोर्शी मार्गावरील शिरभाते मंगल कार्यालयाच्या मुख्य रस्त्यावर घडली. राजेश जगनराव लांडगे (38, रा. कोळविहीर, ता. चांदूर बाजार) यांनी दिलेल्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे दापोरीचे नागरिक त्रस्त!

## कोट्यवधी रुपयांचा खर्च तरी पण दापोरी-सालबर्डी-मोर्शी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मोर्शी, दि. ६ :** मोर्शी तालुक्यातील दापोरी सालबर्डी रस्ता तीर्थक्षेत्र संत्रा प्रकीया उद्योगास जोडणाऱ्या महत्वाच्या रस्त्याची सुधारणा करण्याकरिता हायब्रीड एन्यूटी प्रकल्पा अंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करून या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले मात्र वेल्सपन इम्फ्रा प्रा.लि. कंपनी व संबंधित बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे या मार्गाचे काम 8 वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा दापोरी गावातील अपूर्ण कामे अनेक वेळा पत्र व्यवहार करून सुद्धा पूर्ण करण्यास वेल्सपन इम्फ्रा प्रा.लि.कंपनी तयार नसल्यामुळे दापोरी गावामध्ये विविध प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहे. वेल्सपन इम्फ्रा प्रा.लि. कंपनीवर







कार्यवाही करून 8 दिवसामध्ये अपूर्ण कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी दिला आहे.

मोर्शी तालुक्यातील दापोरी डोंगरयावली सालबर्डी पाळा मोर्शी रस्ता प्रजीमा 66 कि.मी. 0/00 ते 15/600 औधोगिक दृष्ट्या महत्वाच्या संत्राप्रकीया उद्योग व तिर्थक्षेत्रास जोडणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्याकरीता हायब्रीड एन्यूटी प्रकल्पाअंतर्गत 1 डीसेंबर 2016 रोजी शासन निर्णय काढून प्रशासकीय मान्यता दिली.मात्र 8 वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा सदर रस्त्याचे काम अद्यापही पूर्णत्वास गेले नसल्यामुळे दापोरी येथील नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. सदर रस्त्याचे काम वेल्सपन इम्फ्रा प्रा.लि. कंपनीणे घेतले असून दापोरी सालबर्डी रस्त्याच्या बाजूचे दापोरी येथील गावातील सांडपाणी वाहून नेण्याकरिता काँक्रिट नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून उर्वरित नालीचे बांधकाम अर्धवट सोडून दिल्यामुळे या मार्गावरील पावसाळ्यातील पाणी नागरिकांच्या घरात घुसून मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच रस्त्याच्या लगत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुद्धा कंपनीने केलेले नसल्यामुळे गावात जाणारे महत्वाचे रस्ते धोक्याचे झालेले आहे.

जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय समोरील रस्त्याला लागून पेव्हर ब्लॉक बसविले नसल्यामुळे लहान विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडथडा निर्माण झाला असून सदर रोडच्या बाजूला नाली अप्रोच रोडचे काम पूर्ण करण्यात आले नसल्यामुळे गावातील नागरिकांना गावामध्ये जाण्यास अडचण निर्माण होत असून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या गंभीर प्रकाराबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार वेल्सपन कंपनीला अनेक वेळा निवेदन देऊन कळविले होते.संबंधित कंत्राटदार यांनी तक्रारीला केराची टोपली दाखविल्यामुळे कंत्राटदाराच्या विरोधात रोष निर्माण होतांना दिसत आहे.



**अमरावती :** महेश नवमी निमित्त राजकमल चौक येथे निघालेल्या शोभायात्रा मधे भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा व भाजपा शहर अध्यक्ष नितीन धांडे यांनी उपस्थित राहून घेतले दर्शन

# कार्यकारी अभियंता सुधीर अमृतकर यांचा सपत्नीक सत्कार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ६ :** आपल्या कर्तव्यनिष्ठ सेवा, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि अथक परिश्रमाच्या बळावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथून कार्यकारी अभियंता पदावरून सेवानिवृत्त झालेले सुधीर अमृतकर यांचा त्यांच्या निवासस्थानी सपत्नीक शाल, पुष्पगुच्छ आणि मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील पंचतारांकित औद्योगिक वसाहतीला जागतिक औद्योगिक नकाशावर स्थान मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावणारे अमृतकर हे केवळ एक प्रशासकीय अधिकारी नव्हते, तर ते त्या औद्योगिक परिसराचे एक मार्गदर्शक दीपस्तंभ ठरले. या सन्मान सोहळ्याला सहयोग फाउंडेशनचे सचिव व सामाजिक कार्यकर्ते अमोल चवणे, ज्येष्ठ पत्रकार संजय बनारसे, मंगेश तायडे, रवींद्र ठाकरे आणि इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. सुधीर अमृतकर यांनी आपल्या उत्तर भाषणात अत्यंत नम्रपणे आणि भावनिक स्वरात सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# शेतकऱ्यांना मिळाली आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**पूर्णानगर, दि. ६–** आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती सर्वसामान्य शेतकऱ्यांना मिळावी या जाणीवेतून शासनाच्या कृषी संकल्प अभियान २९ मे १२ जुन दरम्यान राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील सावळापूर व टोंगलाबाद येथे या अभियानाच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्र घातखेड द्वारे शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देत त्यांचा कृषी संकल्पाला बळ दिले.



श्रम साफल्य फाउंडेशन द्वारा संचालीत कृषी विज्ञान केंद्र घातखेड आपल्या स्थापनेपासून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत शेती पद्धती, आणि विविध कृषी योजनांची माहिती देऊन त्यांचे उत्पादन क्षमता वाढवणे आणि आर्थिक स्थिती सुधारण्यास यशस्वी मदत करत आहे. कृषी संकल्प यात्रेमध्ये अचलपूर तालुक्यातील नऊ गावांमध्ये शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञानाची माहिती देत ड्रोन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करून शेतीतील उत्पादन वाढवण्याबद्दल मार्गदर्शन केले. सोबतच सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत सेंद्रिय शेतीच्या पद्धती, फायदे, आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या साधन सामग्री बद्दल माहिती दिली. प्रामुख्याने शाश्वत शेती पद्धती मध्ये पाणी व्यवस्थापन, मृदा संरक्षण, आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींबद्दल शेतकऱ्यांना जागरूक केले. नवीन तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकरी कसा प्राप्त करू शकतो याबाबत कृषी योजनांची माहितीद्वारे केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांची माहिती शेतकरी वर्गाला देत आर्थिक मदत कशी मिळू शकेल याची सविस्तर माहिती दिली. वरील माहिती ही कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रा. अमर तायडे व डॉ रत्नाकर राऊळकर, सहयोगी प्राध्यापक मापसू विद्यापीठ नागपूर यांनी केले. शेती-शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय आहे.

कृषी विज्ञान केंद्र घातखेड कृषी क्षेत्रामध्ये सातत्याने संशोधन करीत आधुनिक शेती पद्धत व कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवित आहे. त्याकरीता कृषी विज्ञान केंद्र येथे नियमीत कार्यशाळा, प्रात्याक्षिक आणि प्रशिक्षण सुरू असतात. कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्रातील तज्ञ शास्त्रज्ञ व अधिकारी वर्गाने सावळापूर येथे शेती-शेतकऱ्यांना प्राधान्य देत त्यांना आधुनिक शेती पद्धत व तंत्रज्ञानाची माहिती यशस्वीरित्या देण्यात आली. या अभियानाला अचलपूर तालुक्यातील शेतकरी येथे असंख्य शेतकरी वर्ग उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती कृषी विज्ञान केंद्र घातखेड चे विस्तार विभागाचे शास्त्रज्ञ प्रा. अमर तायडे यांनी दिली तसेच कृषी विभाग अचलपूर येथील उपकृषी अधिकारी श्री प्रवीण मडघे सर यांनी सोयाबीन पीकासाठी महत्वपूर्ण माहिती दिली, सहायक कृषी अधिकारी श्री शंशाक कुरळकर गावात कृषी योजना कश्या राबविण्यात येणार यांची पुरे पुर माहिती दिली,श्रि भागवत सोमटकर सहायक कृषी अधिकारी यांनी पिकावरील किड नियंत्रण कसे करायचे जैविक व रासायनिक खते कशी वापरायची या संदर्भात मौल्यवान मार्गदर्शन केले, कृषी विभाग सहायक कृषी अधिकारी रवींद्र कासट यांनी एकात्मिक किड नियंत्रण कसे करायचे व ए आय चा वापर भविष्यात कसा करता येईल यांची माहिती दिली.

तसेच कृषी विभाग अचलपूर मंडळ कृषी अधिकारी मनिषा ताई ठाकरे यांनी कृषी मधे येणाऱ्या समस्या निर्माण होतात व कश्या हाताळायच्या यांचें खुप चांगला प्रकारे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात सहभागी झाले ते म्हणजे गावच्या सरपंच सौ सुषमा प्रकाश वानखडे ,उपसरपंच श्री अमोल नारायण राउत, ग्रामपंचायत सदस्या सौ वैष्णवी सागर ठाकरे, अश्विनी राजेश जपुलकर, मंगेश शाळीग्राम येवकार यांनी उपस्थिति दर्शविली व या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले फार्मर प्रोड्युसर कंपनी संचालक व शेतकरी मिलिंद जि गोदे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते व बहुसंख्येने शेतकरी यांनी उपस्थित दर्शविली होती

# धनगर समाजाच्यावतीने डॉ. अमोल नरोटे यांचा सत्कार

### 51 किडनी ट्रान्सप्लांट करून उल्लेखनीय कामगिरी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ६ :** नुकत्याच अमरावती येथे पार पडलेल्या कार्यक्रमात मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विधान परिषद सभापती मा. राम शिंदे यांच्या हस्ते अमरावती येथील मल्टी सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे विभागीय वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रपती पुरस्काराकरिता डॉ. अमोल नरोटे यांची शिफारस करण्यात आली. त्याचबरोबर मा. प्रकाशराव आबिटकर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी स्वत: रुग्णालयाला भेट देऊन या कार्याची पुष्टी केली आणि रुग्णालयातील मोफत उपचार कार्याबद्दल माहिती घेतली. जागतिक आरोग्य दिनानिमित्त मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. अमोल नरोटे व सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, डॉ. प्रणित काकडे, डॉ. नयन काकडे, डॉ. प्रतिक चिरडे, दुर्गा घोडिले,



नीलिमा तायडे, अविनाश राठोड यांच्या सहकार्याने आतापर्यंत 51 किडनी ट्रान्सप्लांट यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या आहेत. या कामगिरीसाठी रुग्णालयाला स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन विविध ठिकाणी गौरविण्यात आले. डॉ. अमोल नरोटे यांनी 51 किडनी ट्रान्सप्लांट करून त्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी सन्मान मिळवला. सार्वजनिक आरोग्य विभागातील उत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांमधील रुग्णालयांना गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत उत्तम कामगिरी करणाऱ्या संस्थांमध्ये अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाला किडनी ट्रान्सप्लांट मध्ये उल्लेखनीय कामगिरीसाठी डॉ. अमोल नरोटे यांना गौरविण्यात आले.

ही कामगिरी इतर रुग्णालयांसाठी एक प्रेरणादायी ठरली आहे. याच बाबींचे औचित्य साधून डॉ. अमोल नरोटे यांनी उत्तम कामगिरी केल्याबद्दल धनगर समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार करतेवेळी छबुताई मातकर, घनश्याम बोबडे, सरपंच मुकुंद पुणसे, अर्चनाताई तालन, सेवा सहकारी सोसायटी अध्यक्ष बबलू महात्मे, निखिल घूरडे, प्रेमाताई लव्हाळे, अविनाश बोबडे, जानराव घटारे, अमित महात्मे, नानासाहेब लव्हाळे, नंदाताई चाफले, पद्माताई फुटाणे, कल्पनाताई ढोके, छायाताई अवघड, वर्षाताई मोहोड, अल्काताई मुंदाणे, डॉ. दिव्यांनी नरोटे, गौरीताई आदी धनगर समाज बंधू आणि भगिनी उपस्थित होते.

# गांधी रिसर्च फाउंडेशन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा उपक्रम

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जनजागृतीचे विविध कार्यक्रम यशस्वी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ६ :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गांधी रिसर्च फाउंडेशन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने जळगाव शहरात जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महात्मा गांधी उद्यान, भाऊंचे उद्यान, तसेच जळगाव बस स्टॅण्ड व रेल्वे स्टेशन परिसरात हे कार्यक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगावचे उपप्रादेशिक अधिकारी करणसिंग राजपूत, क्षेत्र अधिकारी राजेंद्र सूर्यवंशी आणि गांधी रिसर्च फाउंडेशनचे उदय महाजन व मदन लाठी यांचे विशेष योगदान लाभले. उपक्रमांचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण रक्षणाविषयी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे हे होते.







### महात्मा गांधी उद्यानात पर्यावरणावर सुसंवाद

सकाळी साडेसात वाजता महात्मा गांधी उद्यानात पर्यावरण व निसर्ग विषयक सुसंवाद साधण्यात आला. यावेळी करणसिंग राजपूत यांनी संवाद साधला, तर मदन लाठी यांनी उपस्थितांना पर्यावरण शपथ दिली.

### गांधी रिसर्च फाउंडेशनकडून जनजागृती

गांधी रिसर्च फाउंडेशनच्या सहकाऱ्यांनी कमी मायक्रॉनच्या प्लास्टिक कॅरिबॅगच्या वापराचे दुष्परिणाम आणि कापडी पिशव्यांच्या उपयोगाचे महत्त्व अधोरेखित करणारे पथनाट्य सादर केले. या सादरीकरणात मदन लाठी, सुधीर पाटील, प्रशांत सूर्यवंशी व विक्रम अस्वार यांनी सहभाग घेतला.

### विद्यार्थ्यांचे पथनाट्य सादरीकरण

उज्वल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनावर आधारित प्रभावी पथनाट्य सादर करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या पथनाट्याच्या यशस्वी आयोजनासाठी पुरोहित सर व विजय वानखेडे यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी विजय विसपुते, कांचन पाटील व स्वप्नील बोरसे यांची उपस्थिती होती.

प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण, प्राणी व मानव आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे प्लास्टिकच्या अति वापरावर नियंत्रण आणल्यास आपले पर्यावरण, आरोग्य आणि भविष्यासाठी अधिक सुरक्षित, स्वच्छ जग निर्माण करता येईल. प्रत्येकाने जबाबदारी उचलण्याची गरज असल्याचा संदेश करणसिंग राजपूत आणि राजेंद्र सूर्यवंशी यांनी दिला. कार्यक्रमाच्या शेवटी मदन लाठी यांनी पर्यावरण शपथ दिली व उपस्थितांना कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात

### रेल्वे स्टेशन व एसटी स्टॅण्डवर प्रबोधन

जळगाव रेल्वे स्टेशन व एसटी स्टॅण्डवर प्रवाशांना सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन करणारे प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. करणसिंग राजपूत, सुधीर पाटील आणि मदन लाठी यांनी प्रवाशांना मार्गदर्शन केले व कापडी पिशव्यांचे वाटप केले. उपस्थितांना पर्यावरण शपथही दिली. जळगाव रेल्वे स्थानकावर राजेंद्र सूर्यवंशी, विजय पाटील, संदीप गायकवाड, अतुल भाऊसर, नामदेव लाखे, नामदेव बारी, शंकर मोरे, तसेच गांधी रिसर्च फाउंडेशनचे मदन लाठी, सुधीर पाटील, विक्रम असवार, प्रशांत सूर्यवंशी व समाधान महाजन यांचा सहभाग होता. रेल्वे प्रशासनाकडून अरुणकुमार नाफडे (उप स्टेशन व्यवस्थापक), धर्मवीर सिंग (मुख्य आरोग्य निरीक्षक), कांतिलाल कनाडे (हाउसकीपिंग सुपरवायझर), राजीव यादव (कार्यालय अधीक्षक), प्रफुल्ल खर्चे (एसआय, आरपीएफ), मिलिंद तायडे (आरक्षक, आरपीएफ) यांची उपस्थिती होती. एसटी स्टॅण्डवर आयोजित कार्यक्रमातही मदन लाठी यांनी पर्यावरण शपथ दिली, उज्ज्वल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. यावेळी एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक भगवान शंकर जगनोर आणि आगार व्यवस्थापक संदीप पाटील आदींचा सहभाग होता.

## घटना -घडामोडी



### सोनार महिला संघटनेतर्फे पर्यावरण दिन साजरा

**यवतमाळ :** जागतिक पर्यावरण दिनाचे (५ जून) औचित्य साधून अखिल माळवी सोनार महिला संघटनेतर्फे गुरुवारी यवतमाळ येथील प्रयास वनात वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. अमोलकचंद महाविद्यालयाच्या मागील नयनरम्य परिसरात झालेल्या या कार्यक्रमात दोन्ही सोनार संघटनांचे पदाधिकारी व सदस्य आवर्जून सहभागी झाले. अखिल माळवी सोनार महिला संघटनेच्या अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी वर्गासोबतच अखिल माळवी सोनार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही या कार्यक्रमात सक्रिय उपस्थिती दर्शवून या स्तुत्य उपक्रमास सहकार्य केले. प्रशांत गोडे यांनी यावेळी सर्व महिला सदस्यांना वृक्षारोपण कसे करावे, रोपांची निवड व त्यांची निगा कशी राखावी, याबाबत अत्यंत मोलाचे आणि शास्त्रीय मार्गदर्शन केले. तसेच, त्यांनी प्रयास वनातील विविध प्रेक्षणीय स्थळांची आणि तेथील समृद्ध निसर्गसंपदेचीही उपस्थितांना रंजक माहिती दिली. त्यांच्या या अमूल्य सहकार्य आणि या मार्गदर्शनाबद्दल अखिल माळवी महिला सोनार संघटनेने तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमातून निसर्ग संवर्धनाचा आणि सामाजिक एकतेचा सुंदर आणि प्रेरणादायी संदेश प्रभावीपणे देण्यात आला.



### नेर येथे पर्यावरण दिन साजरा

**नेर :** जागतिक पर्यावरण दिनाचे (५ जून) औचित्य साधून, वनविभाग यवतमाळ आणि वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, नेर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी नेरमध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. आरोग्यवर्धिनी आयुर्वेदिक दवाखाना आणि ग्रामपंचायत कार्यालय परिसरात वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याची भावना व्यक्त करत हा उपक्रम साजरा झाला. ग्रामपंचायत कार्यालय परिसरात पोलिस पाटील प्रफुल नेरकर यांच्याहस्ते वृक्षारोपणास प्रारंभ झाला. याप्रसंगी अंगणवाडी मदतनीस नागदेवते, माकडे, देवानंद गायनर, मुन्ना गायनर, गजानन दाढे आणि वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते. आरोग्यवर्धिनी दवाखान्यातही वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल भेंडे यांच्याहस्ते वृक्षलागवड झाली. येथे वनपाल एस.वाय. वाघमारे, वनरक्षक पी.ए.बोरकर, पल्लवी साबळे, सामाजिक वनीकरणचे निखील खासदार, अतुल उडाखे, खुशाल गावंडे, सुरेंद्र चहांदे, अनंत पडघन व अन्य मान्यवर हजर होते.

### रेती व गिट्टी टाकल्यावरून वाद

**नेर :** रस्त्यामध्ये रेती व गिट्टी टाकल्यावरून वाद करण्यात आला. याप्रकरणी संगणमत करून रोडच्या मध्ये रेती व गिट्टी टाकल्याने जाण्या येण्याच्या रस्त्याच्या कामावरून वाद करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून काठीने पाठीवर, हातावर मारून जखमी केले. याप्रकरणी पंजाबराव नारायण गेडाम यांच्या तक्रारीवरून जीवन राऊत, शुभम मारुती आरे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### मोटारपंप लंपास

**दारव्हा :** रिधी सिध्दी नगर येथुन मोटारपंप लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणीा अज्ञात चोरट्याने घरावर पाणी टाकण्यासाठी लावलेली टेक्समो कंपनीची मोटार व एक इंची १२० फुट पाईप १५० फूट सीआरआय चा केबल असा एकुण १८,१९५ रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी नंदु प्रकाश रतन चिरडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

# जिल्ह्यात 'बंगाली बाबां'चा वैद्यकीय थाट

## ग्रामीण आरोग्य धोक्यात; आरोग्य विभागावर हप्तेखोरीचा, पोलिसांवर नोंद न ठेवल्याचा गंभीर आरोप!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ : जिल्ह्यात बोगस 'बंगाली डॉक्टरां'मुळे ग्रामीण आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासकीय यंत्रणा यात सामील असल्याचा संशय व्यक्त होत आहे. तसेच आरोग्य विभागावर हप्तेखोरीचा व पोलिसांवर नोंद न ठेवल्याचा गंभीर आरोप होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नव्हेतर संपूर्ण जिल्ह्याभरात बंगाली बाबांचा वैद्यकीय थाट वेगळाच असल्याचे बोलले जात आहे.**




### 'डॉक्टर बिस्वास'च्या नावाखाली गोरखधंदा

**घाटंजी, आर्णी, झरी तालुक्यांतील पाटण, मुकूटबन यांसारख्या गावांमध्ये 'डॉक्टर बिस्वास' या नावाने अनेक बोगस दवाखाने सुरू आहेत. पदवी नसलेले हे कथित डॉक्टर रुग्णांना धोकादायक औषधे देतात. दोन वर्षांपूर्वी मुकूटबनमध्ये गर्भपाताचा गोरखधंदाही उघड झाला होता, तरीही प्रशासनाकडून ठोस कारवाई झालेली नाही.**

### प्रशासकीय अभयामुळे आरोग्य धोक्यात

**आरोग्य विभाग कथित हप्ता घेऊन कारवाई टाळत असल्याचा, तर पोलिस विभाग परप्रांतीय बोगस डॉक्टरांची नोंदही ठेवत नसल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रशासकीय अभयामुळेच हे कथित डॉक्टर नागरिकांच्या जीवाशी खेळत असून, एखादी मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा संतप्त सवाल विचारला जात आहे.**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात, विशेषतः घाटंजी, आर्णी आणि झरी तालुक्यांमध्ये, बोगस 'बंगाली डॉक्टरां'नी अक्षरशः हैदोस घातला असून, नागरिकांच्या आरोग्याशी जीवघेणा खेळ सुरू आहे. कोणतीही अधिकृत वैद्यकीय पदवी नसताना, अनेकदा चौथी-पाचवी पास असलेले हे कथित डॉक्टर गावागावांत खासगी दवाखाने थाटून बसले आहेत. केवळ पैसा कमाविण्याच्या उद्देशाने आलेल्या या डॉक्टरांना गोरगरीब नागरिकांच्या आरोग्याची कोणतीही पर्वा नसल्याचे चित्र आहे. हे बोगस डॉक्टर रुग्णांना हायपॉवरची इंजेक्शन्स आणि धोकादायक गोळ्या देत असल्याने, रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे. या गंभीर प्रकारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या आरोग्य विभागाची समितीच, दरमहा 'मोबदला' (हप्ता) घेऊन या बोगस डॉक्टरांवरील कारवाईकडे डोळेझाक करित असल्याचा खळबळजनक आरोप नागरिक करित आहेत. घाटंजी, आर्णी आणि झरी या तीन तालुक्यांतच ५० हून अधिक बोगस डॉक्टरांनी आपले बस्तान मांडले असून, 'डॉक्टर बिस्वास' या नावाने अनेक दवाखाने सुरू आहेत. सुमारे दोन वर्षांपूर्वी मुकूटबन येथे एका अशाच डॉक्टराचा गर्भपाताचा गोरखधंदा उघडकीस येऊनही, जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून या समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. याहूनही धक्कादायक बाब म्हणजे, पश्चिम बंगालमधून आलेल्या या बोगस डॉक्टरांची जिल्ह्यातील कोणत्याही पोलिस ठाण्यात नोंद घेतली जात नाही. त्यांची ओळख, पदवी आणि वास्तव्याची माहिती पोलिसांकडे नसल्याने, त्यांना मोकळे रान मिळत आहे. एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# कवितासंग्रह 'पाखरं'चा हिंदी अनुवाद 'पंछी' प्रकाशित

## डॉ. दिलीप गिरहे यांनी केले भाषांतर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ :** प्रख्यात साहित्यिक बाबाराव मडावी यांच्या 'पाखरं' या गाजलेल्या मराठी कवितासंग्रहाचा, प्रा.डॉ. दिलीप गिरहे यांनी अत्यंत समर्थपणे केलेला 'पंछी' हा हिंदी अनुवादित काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. कानपूर येथील शुभम पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या या २५० रुपये किमतीच्या संग्रहामुळे मडावी यांची संवेदनशील कविता आता राष्ट्रीय पातळीवरील वाचकांसाठी उपलब्ध झाली आहे.

'पंछी'मधील कविता उपेक्षित आणि वंचित माणसांचे जग प्रभावीपणे उलगडून दाखवतात, त्यांच्या अस्तित्वाच्या हक्कांसाठी लढताना त्या बंडखोरी करतात. कष्ट करून जगणाऱ्या सामान्य माणसांच्या खोलवरच्या व्यथा आणि वेदनांना शब्दरूप देतानाच, त्या शोषितांचे दबलेले हुंदके आक्रमकपणे प्रस्थापित व्यवस्थेवर सडेतोड कोरडे ओढतात. या कवितांमधून हळव्या, संवेदनशील जगाचा फेरफटका घडत असला तरी, त्या अंतिमतः परिवर्तनाच्या दिशेने, एका नव्या युद्धाच्या मैदानात उतरून वाचकांना विचार करण्यास प्रवृत्त करतात. मूळ रचनाकार बाबाराव मडावी आणि अनुवादक प्रा.डॉ. दिलीप गिरहे यांचे या महत्वपूर्ण साहित्यिक योगदानाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मारेगाव-मार्डी रस्ता बनला मृत्यूचा सापळा

## अर्धा डझन बळी, प्रशासन सुस्त; काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मारेगाव, दि.६:** मारेगाव-मार्डी हा दहा किलोमीटर अंतराचा रस्ता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला असून, या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे आजतागायत अर्धा डझनाहून अधिक लोकांचा बळी गेला आहे, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. असे असूनही प्रशासन या गंभीर समस्येकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत असून आता मारेगाव तालुका काँग्रेसने रस्ता दुरुस्तीसाठी जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून मारेगाव-मार्डी रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. संपूर्ण रस्ता उखडलेला असून, त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे वाहनधारकांसाठी जीवघेणी कसरत ठरत आहे. अपघातांची मालिका या रस्त्याच्या नशिबालाच जणू चिकटली असून, बळी जाणे किंवा गंभीर जखमी होणे हे नित्याचेच झाले आहे. या रस्त्यावरून पायी चालणेही दुरापास्त झाले आहे. प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष असून, आता उग्र आंदोलनाची तयारी सुरू झाली आहे. याबाबत माहिती देताना काँग्रेस तालुकाध्यक्ष मारोती गौरकार यांनी 'विटा न्यूज'शी (स्थानिक माध्यम) बोलताना सांगितले की, मारेगावपासून दोन किलोमीटर रस्त्यासाठी निधी उपलब्ध झाला असला, तरी काम सुरू करण्यास मुहूर्त सापडत नाही. प्रशासनाच्या या बेतालपणामुळे अपघात व जीव जाण्याचे प्रमाण वाढत असल्याने जनतेत चीड निर्माण झाली आहे. प्रशासन केवळ लोकांचे बळी जाण्याची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. हे सर्व असह्य होत असल्याने लवकरच जनआंदोलन उभारले जाईल, असा गर्भित इशाराही गौरकार यांनी दिला आहे.

# विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, महावितरणचा २० वा वर्धापनदिन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. ६ :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) २० व्या वर्धापन दिनानिमित्त, 'विद्युत सुरक्षा सप्ताह' अंतर्गत घाटंजी शहरात रविवार (दि. १) जून २०२५ रोजी जनजागृतीपर 'रन फॉर सेफ्टी' रॅलीचे आयोजन करण्यात आले. विजेमुळे होणारे अपघात टाळणे हा यामागील उद्देश होता.

या सप्ताहाचा मुख्य हेतू विजेशी संबंधित अपघात शून्यावर आणणे आणि वीज वापराबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. वीज उपकरणांचा सुरक्षित वापर, योग्य उपकरणांची निवड आणि आपत्कालीन परिस्थितीत कोणती खबरदारी घ्यावी, यावर रॅलीदरम्यान विशेष भर देण्यात आला. महावितरणच्या घाटंजी उपविभागीय कार्यालयापासून सुरू झालेली ही रॅली शहराच्या मुख्य रस्त्यांवरून मार्गस्थ झाली. सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरक्षा संदेश देणारे फलक आणि बॅनर्सद्वारे विजेच्या सुरक्षित वापराचे महत्त्व पटवून दिले. या जनजागृती रॅलीचे नेतृत्व उपकार्यकारी अभियंता श्यामसुंदर कुर्रा यांनी केले. या कार्यक्रमात सर्व अभियंते गौरव कनाके, नाईक, नैताम, देसाई, भांगे यांच्यासह उपविभागातील सर्व कर्मचारी, विद्युत कंत्राटदार, सुरक्षा रक्षक आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सक्रिय सहभागी झाले होते.

# ग्रामपंचायत स्तरावर नवीन कृषी पतपुरवठा संस्था नोंदणीस चालना

## सहकार से समृद्धी : प्रस्ताव सादर करा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.६:** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'सहकार से समृद्धी' योजनेंतर्गत, ज्या ग्रामपंचायतींमध्ये अद्याप प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था अस्तित्वात नाहीत, अशा ठिकाणी नवीन संस्थांच्या नोंदणीसाठी महाराष्ट्र शासनाने नुकतेच विशेष धोरण जाहीर केले आहे. यासाठी संबंधित ग्रामपंचायत स्तरावरून प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.

सद्य:स्थितीत यवतमाळ जिल्ह्यात एकूण ५९४ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था प्रभावीपणे कार्यरत आहेत. ज्या ग्रामपंचायत स्तरावर नवीन प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे प्रस्ताव नोंदणी करावयाचे आहेत, अशा इच्छुक शेतकरी सभासदांनी नवीन संस्था, शासन निर्णयातील अटी व निकषांनुसार नोंदणी करण्यासाठी संबंधित तालुक्याचे सहायक निबंधक, सहकारी संस्था या कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा. त्यांनी आपले परिपूर्ण प्रस्ताव तालुका कार्यालयामार्फत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळया कार्यालयास सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधण्यास निश्चित मदत होईल.

# ट्रॅक्टर नेल्याने एकास शिवीगाळ

**मारेगाव, दि. ६ :** तलावातील गाळ ट्रॅक्टरमध्ये भरून शेतात घेऊन जात असताना एका व्यक्तीने ट्रॅक्टर अडवून वाद घातला, शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना येथे नुकतीच घडली. याप्रकरणी मारेगाव पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी गुलाब शामराव गायधन यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते तलावातील गाळ त्यांच्या शेतात टाकण्यासाठी ट्रॅक्टरमधून घेऊन जात होते. यावेळी आरोपी मारोती भीवाजी घागी याने त्यांचा ट्रॅक्टर अडवला. "या रस्त्याने ट्रॅक्टर न्यायचा नाही," असे म्हणत त्याने वाद घालून गुलाब गायधन यांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी मारोती घागीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# दिग्रसमध्ये पर्यावरण दिन केवळ 'फोटोसेशन'पुरतेच

## झाड एक, लावण्यासाठी तब्बल पंधरा जण, वृक्षसंवर्धनाची हमी घेणार कोण, दिखाव्याच्या 'लोकॅलिटी'वर चर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ६ :** शहरात जागतिक पर्यावरण दिन वृक्षारोपणाने साजरा झाला, मात्र हे कार्यक्रम केवळ 'फोटोसेशन'पुरते मर्यादित असल्याचा सूर आहे. लावलेल्या रोपांच्या संवर्धनाची हमी कोणीही घेत नसल्याने, या दिखाव्याच्या पर्यावरणप्रेमावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वनस्पतींनाही भावना असतात,ङ्ख हे भारतीय शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांनी संशोधनाअंती सिद्ध केले आहे. मात्र, ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनी, प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी काही लोकांनी याच झाडांच्या 'अबोल भावनेला' तुडवण्याचे काम केल्याचे दिग्रस तालुक्यात दिसून आले. विविध क्षेत्रांतील लोकांनी झाडे लावून पर्यावरण दिन उत्साहात साजरा केला, परंतु यातील बहुतांश उपक्रम हे केवळ दिखावा ठरल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. वृक्षारोपणासाठी स्थानिक, मजबूत आणि किमान एक ते तीन वर्षे वयाची रोपे वापरणे, तसेच जमिनीचा प्रकार आणि हवामानाचा विचार करणे आवश्यक असताना, यापैकी कोणत्याही बाबीचे तारतम्य बाळगल्याचे दिसले नाही. अनेक ठिकाणी एका झाडाची लागवड करण्यासाठी तब्बल दहा ते पंधरा जणांचे टोळके जमत होते आणि केवळ झाडाला हात लावून 'स्टेटस'साठी फोटो काढण्यावरच अनेकांचा भर होता. मात्र, एका व्यक्तीने किमान दहा-पंधरा झाडे लावण्याचे सौजन्य दाखवले नाही. त्यामुळे, लावण्यात आलेल्या या झाडांची आणि त्यांच्या भविष्याची हमी कोण घेणार, हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. जागतिक पर्यावरण दिन हा जागतिक तापमानवाढ, लोकसंख्यावाढ, प्रदूषण, शाश्वत विकास आणि वन्यजीव गुन्हे यांसारख्या गंभीर पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे एक जागतिक व्यासपीठ आहे. मात्र, दिग्रसमध्ये केवळ झाडे लावण्याच्या कार्यक्रमांपलीकडे या गंभीर विषयांवर कोणतीही चर्चा किंवा जनजागृती झाली नाही. या संकुचित दृष्टिकोनाच्या ('लोकॅलिटी') दिखाव्यामुळे पर्यावरणाचा खरोखर विकास होईल का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. कडक उन्हात डोक्याला रुमाल बांधून केलेले हे 'फोटोसेशन'रूपी वृक्षारोपण किती दूरगामी परिणाम करणार, हे येणारा काळच ठरवेल.



### झाड एक, लावणारे पंधरा!

**दिग्रसमधील पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमात अनेक ठिकाणी एकच रोप लावण्यासाठी दहा-पंधरा जणांची गर्दी दिसून आली. अनेकांनी केवळ झाडाला हात लावून छायाचित्रे काढण्यावरच भर दिला. यामुळे हा कार्यक्रम पर्यावरण संवर्धनासाठी होता की केवळ प्रसिद्धीसाठी होता, असा प्रश्न उपस्थित झाला. या दिखाव्यामुळे वृक्षारोपणाचा मूळ उद्देशच हरवला होता.**

# एस.एल. फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण, रक्तदान शिबिर

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे व मातृवंदनचा उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.६:** माजी प्राचार्य सु. ल. देशपांडे यांच्या जयंतीनिमित्त, एस.एल. फाउंडेशन (दाते कॉलेज माजी विद्यार्थी संघटना) व राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या संयुक्त विद्यमाने, शनिवारी ७ जूनला सकाळी ८ ते १२ दरम्यान विविध सेवाभावी उपक्रम दाते कॉलेज परिसरात आयोजित आहेत.

यामध्ये 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' याअंतर्गत महत्त्वपूर्ण वृक्षारोपण मोहीम आणि 'मातृवंदन' या नावाने रक्तदान शिबिर प्रामुख्याने आयोजित केले आहे. रक्तदात्यांना प्रोत्साहन म्हणून आकर्षक प्रमाणपत्रांसह प्रत्येकी एक रोपटेही आवर्जून भेट दिले जाईल. या सेवाभावी कार्यक्रमाच्या निमित्ताने वाघाडी येथील 'आम्ही साऱ्या सावित्री' या आश्रमालयातील बालवाचनालय व अभ्यासिकेकरिता उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येईल. तसेच, एस.एल. फाउंडेशनच्या माजी विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रेमाने संकलित केलेले चांगल्या स्थितीतील जुन्या कपड्यांचे वितरण परिसरातील उपेक्षित गरजू व्यक्तींना केले जाणार आहे. यवतमाळातील सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी, दाते कॉलेजचे माजी विद्यार्थी, पर्यावरण व आरोग्य विषयातील सेवा संस्थांचे प्रतिनिधी तसेच सर्व जागृत यवतमाळकरांनी या महत्त्वपूर्ण सेवाभावी उपक्रमात आवर्जून सहभागी व्हावे, असे आवाहन एस.एल. फाउंडेशन आणि दाते कॉलेजच्या एनएसएस पथकाने केले आहे.

### उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाची धडक कारवाई, तिघे जेरबंद!

# गुटखा तस्करीचा पर्दाफाश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि.६:** पुसदजवळ उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने कारमधून होणारी गुटखा तस्करी उधळून लावली आहे. तिघांना अटक करत, ४.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे कारंजा-'ुलसावंगी येथील मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता आहे.

राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखूची कारमधून तस्करी करणाऱ्या एका टोळीला जेरबंद करण्यात उपविभागीय पोलिस अधिकारी, पुसद यांच्या पथकाला मोठे यश आले आहे. शुक्रवारी, दि. ६ जून रोजी पहाटेच्या सुमारास जांब बाजार ते पुसद या मार्गावर सापळा रचून ही धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये तीन आरोपींना अटक



करण्यात आली असून, त्यांच्याकडून गुटखा, तंबाखू, एक स्विफ्ट डिझायर कार आणि तीन मोबाईल असा एकूण चार लाख १५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या जिल्ह्यात अवैध धंदे आणि गुन्हेगारी रोखण्याच्या निर्देशानुसार करण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांना एका स्विफ्ट डिझायर कारमधून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती 'िळाली होती. या माहितीच्या आधारे, त्यांच्या पथकाने पहाटे ४ ते ५ वाजताच्या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाजवळ सापळा रचून वाहन अडवले. वाहनाची तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित तंबाखू आढळून आला. पोलिसांनी तत्काळ शेख वाजीद शेख गणी (३५), तौफिक खान शरीद खान (३०) आणि सोहेल अहमद वाहिद अहमद (२१) या तिघांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे यवतमाळ जिल्ह्यात वाशीम जिल्ह्यातील कारंजा येथून होणाऱ्या गुटखा तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता निर्'ाण झाली आहे. जिल्ह्यातील 'ुलसावंगी येथे गुटख्याचे मोठे गोदाम असल्याची माहिती असून, पुसद येथून छोट्या चारचाकी वाहनांतून हा माल पोहोचवला जातो. 'बब्बू गोल्ड' आणि 'मजा जाफराणी' यांसारख्या गुटख्याची मागणी मोठी असल्याने, तो छत्तीसगड आणि कर्नाटकच्या बिदर जिल्ह्यातून आणला जातो. अटक आरोपींच्या चौकशीतून या आंतरराज्यीय रॅकेटच्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. ही यशस्वी कारवाई अभिजित सांगळे, संतोष सरकुंडे, नरेश नवाडे, सुनील चिरमारे, मुरलीधर बाभुळे, इरफान अगवान आणि संदीप चाहंदे यांच्या पथकाने केली.

### आंतरराज्यीय तस्करीचे मोठे जाळे

**ही गुटखा तस्करी केवळ जिल्ह्यापुरती मर्यादित नसून, तिचे धागेदोरे वाशिममधील कारंजा, तसेच छत्तीसगड आणि कर्नाटकच्या बिदर जिल्ह्यापर्यंत पोहोचले आहेत. जिल्ह्यातील बाभूळगाव, अकोला (बाजार) आणि फुलसावंगी येथे मोठे गोदाम असल्याची माहिती असून, अटक आरोपींच्या चौकशीतून या मोठ्या आंतरराज्यीय रॅकेटचा सुगावा लागण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.**

## थोडक्यात

### दोन लाखांचा मुद्देमाल लंपास

**पुसद :** प्रगती ले-आऊटमध्ये घरफोडी केल्याची घटना घडली. याप्रकरणी घराचे दरवाज्याची कडीकुंडी काढुन आत प्रवेश करून घरातील झीमप्रो कंपनीचा एलईडी जुनी वापरती, लोखंडी कपाटातील सोन्याचा गोप, अंगठी असा एकण २,००,७०० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना ५ जुन रोजी घडली. याप्रकरणी विकास सुनील खोडके यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### हळदीचे बेणे लंपास

**उमरखेड :** हळदीचे बेणे लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी शेतातील ४ क्विंटल हळदीचे बेणे किंमत १६ हजार रूपयाचे चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी शिवाजी माधवराव गावंडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातात एक ठार

**पांढरकवडा :** अपघातात इसम ठार झाल्याची घटना घडली. याप्रकरणी संदीप रामकृष्ण कुडमेथे हा वाहन क्र. एम.एच. २९ बी. वाय ९५८७ ने जात असतांना वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्योन वाहनावरील नियंत्रण सुटून दुचाकी स्लीप होवून मृतक हे गाडीसह खाली पडुन गंभीर जखमी होवून उपचारा दरम्यान मरण पावले. याप्रकरणी रामकृष्ण ईसरा कुडमेथे यांच्या तक्रारीवरून मृतक संदिप रामकृष्ण कुडमेथे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दुकानात चोरी

**यवतमाळ :** इलेक्ट्रीकच्या दुकानातुन साहित्य लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे न्यु इंडियन इलेक्ट्रीक दुकानाचे अलमारीचे अँगल तोडुन दुकानात प्रवेश करून गोल्ड मेडल कंपनीचे कॉपरचे दहा बंडल वायर किंमत १,४९,००० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना ५ जुन रोजी घडली. याप्रकरणी अली अजगर ताहेर हुसेन यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### एकास मारहाण

**यवतमाळ :** जुन्या भांडणातुन मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी गावातुन चारचाकी वाहनाने जात असतांना कुत्रे गाडीच्या मागे लागल्याने फिर्यादीने गाडी बाजुला थांबविली असता आरोपीस गाडीचा कट मारला असा गैरसमज झाल्याने तसेच जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद करून शिविगाळ करून लोखंडी पाईपने उजव्या पायाचे पंजावर मारून जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी प्रतिक दत्ताजी जोगे यांच्या तक्रारीवरून गौरव जायगुडे विरूध्द गुन्हा नोंद केला.

**CAPTION** रुटमार्च...




**यवतमाळ :** बकरी ईद निमित्त जिल्हा पोलिस दलाकडून आज शांतता रुटमार्च काढण्यात आला. विशेष म्हणजे, या रुटमार्चने शांतता राखण्यासाठी आवाहन करण्यात आले. यामध्ये शहरातील चारही पोलिस स्टेशनचे ठाणेदार तसेच जलद कृती दलाचे शिपाई सहभागी झाले होते.

(छायाचित्र : गणेश खडसे)

# कळंब येथे भरधाव ट्रकने सायकलस्वाराला चिरडले

### कळंब-बाभूळगाव मार्गावरील उड्डाणपुलाजवळील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

कळंब, दि.६: येथील बाभूळगाव 'ार्गावरील उड्डाणपुलाजवळ आज, शुक्रवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास नगरपरिषदेचा कचरा वाहून नेणाऱ्या भरधाव ट्रकने एका सायकलस्वाराला चिरडले. हा अपघात इतका भीषण होता की, यात सायकलस्वार रामदास गणपत देशकर (वय ६४, रा. प्रभाग क्र. ३, कळंब) यांचा जागीच मृत्यू झाला.



रामदास देशकर

मिळालेल्या माहितीनुसार, रामदास देशकर यांचे बाभूळगाव रोडवर शेत असल्याने ते सकाळी शेतकामाकरिता सायकलने गेले होते. शेतातून घरी परत येत असताना, पुण्यावरून आलेल्या ट्रकने (क्र. एमएच ४२, बीएफ ८१०९) त्यांना जोरदार धडक दिली. हा ट्रक बाभूळगाव-कळंब मार्गे नगरपरिषदेचा कचरा घुगुस येथील प्लांटेशनवर घेऊन जात होता. उड्डाणपुलाजवळ ट्रकने देशकर यांना मधल्या चाकाखाली चिरडले, ज्यात त्यांचा जागीच चेंदामेंदा होऊन मृत्यू झाला. अपघाताची माहिती कळताच कळंब पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेश राठोड, पीएसआय सागर भारस्कर आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी खोळंबलेली वाहतूक सुरळीत करत, घटनेचा पंचनामा केला आणि मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. अपघातग्रस्त ट्रक जप्त करण्यात आला असून, आरोपी ट्रकचालक आकाश नानासाहेब कदम (वय २३, रा. राक्षसभुवन, जि. बीड) याला अटक करून त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मृतक रामदास देशकर यांचे शहरातील नेहरू चौकात सलूनचे दुकान होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा मोठा आप्तपरिवार आहे. या आकस्मिक घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

### बाभूळगावात टँकरच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार




**बाभूळगाव :** भरधाव टँकरने मोपेड दुचाकीस्वारास जोरदार धडक दिली. यात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. ही घटना बाभूळगाव-कळंब रोडवरील महल्ले सभागृहासमोर, शुक्रवारी (दि. ६ जून) रोजी सकाळी ८.३० वाजताचे सुमारास घडली. यातील मृतकाचे नाव दमडूजी नारायण राऊत, (वय ६५ वर्षे), असून ते बाभूळगाव शहरातील आबाजी महाराज मंदिराजवळील रहिवासी आहेत. प्राप्त माहितीनुसार दमडुजी राऊत हे पाणीपुरवठा योजनेच्या कामावर रोजमजुरी करतात. ते कामावर जाण्यासाठी हिरो प्लेझर मोपेड दुचाकी (क्र. एम.एच.यु. १९०८) या वाहनाचा वापर करतात. नेहमीप्रमाणे घर जवळ पडत असल्याने बाभूळगाव शहरात जाण्यासाठी असलेल्या महल्ले सभागृहासमोरील रस्त्याचा वापर करतात. दि. ६ जून रोजी सकाळी ८.३० वाजताचे सुमारास त्यांनी महल्ले सभागृहापासून सदर रस्त्याकडे वळण घेतले, दरम्यान बसस्थानकाकडून कळंबकडे जाणाऱ्या टँकर (क्रं. जी.जे.१२, सी.टी ९८२९) च्या चालकाला सदर दुचाकी एकदम समोर आल्याचे जाणवल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. टँकर वाहनाचा वेग जास्त असल्याने सदर वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात दुचाकीसह दमडुजी राऊत फरफटत गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. यावेळी टँकर चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी प्रदीप दमडु राऊत याने बाभूळगाव पोलिस स्टेशनला फिर्याद नोंदविली. पुढील तपास बाभूळगाव पोलिस निरीक्षक लहुजी तावरे यांचे मार्गदर्शनात जमादार विजय लोखंडे, पोलिस नायक नीलेश भुसे करीत आहेत.

# राज्य अनुसूचित जमाती आयोगामुळे आदिवासींच्या विकासाला चालना

### आमदार राजू तोडसाम; फडणवीस सरकारचा ऐतिहासिक निर्णय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ,दि.६:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मंत्रिमंडळाने 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगा'च्या स्थापनेस ऐतिहासिक मंजुरी दिली. आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांच्या पाठपुराव्यामुळे व मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित मागणी प्रत्यक्षात उतरली, असे मत केळापूर-आर्णीचे आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी व्यक्त केले. ते येथे शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.



भारतीय जनता पक्षाच्या वतीने येथील विश्रामगृहावर शुक्रवारी,(दि.६) पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी माजी आमदार उत्तमराव इंगळे, भाजपच्या जिल्हाध्यक्ष डॉ. आरती फुफाटे, ॲड. प्रफुल्ल चव्हाण, राजू पडगिलवार, मोहन कनाके व नरेश गेडाम आदींची उपस्थिती होती. यावेळी फडणवीस सरकारने आदिवासींच्या विकासासाठी अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करून घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाचे आमदार तोडसाम यांनी स्वागत केले. या वैधानिक आयोगात एक अध्यक्ष व चार अशासकीय सदस्य असतील, ज्यासाठी २६ पदे व ४.२० कोटींची तरतूद केली आहे. हा आयोग शिक्षण, आरोग्य, रोजगार, जमिनीचे प्रश्न आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रित करून आदिवासींना न्याय देईल.' असे मत आमदार राजू तोडसाम यांनी व्यक्त केले. त्यांनी याप्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांचे याप्रसंगी आभार मानले.

# एका गुन्ह्याचा तपास करताना दोन दुचाकी चोरीचे गुन्हे उघड

### राळेगाव पोलिसांची मोठी कारवाई; एक लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि.६:** येथील पोलिसांनी ॲपे रिक्षा आणि दुचाकी चोरी प्रकरणातील आरोपीला अटक करत मोठी कारवाई केली आहे. ज्ञानेश्वर उर्फ नाना रमेश नेहारे (वय २३, रा. आपटी, ता. राळेगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून एक ॲपे रिक्षा आणि दोन मोटारसायकली असा एकूण एक लाख नव्वद हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी शेख खलिल शेख शब्बीर (वय ४७, रा. शिवाजी नगर, राळेगाव) यांनी ४ जून रोजी रात्री ७ वाजताच्या सुमारास त्यांचा ९० हजार रुपये किमतीचा ॲपे रिक्षा (क्र. एम.एच. २९/व्ही. ९४०४)



पशुवैद्यकीय दवाखाना येथून चोरीला गेल्याची तक्रार राळेगाव पोलिस ठाण्यात दिली होती. पोलिसांनी तत्काळ भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा (क्र. ०२३५/२०२५) नोंदवून तपास सुरू केला. आरोपी ॲपे घेऊन वर्धा रोडने पळाला असल्याची गोपनीय माहिती मिळताच, पोलिसांनी पाठलाग सुरू केला. कोसूर्ला गावाजवळ पोलिसांनी थांबवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी ॲपे रस्त्यावर सोडून पळाला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव ज्ञानेश्वर ऊफ नाना रमेश नेहारे, (वय २३ वर्ष, रा. आपटी ता. राळेगाव) असल्याचे सांगितले. त्याला पोलिस ठाण्यात आणून दुसऱ्या एका गुन्ह्याबद्दल (क्र. २३२/२०२५) विचारणा केली असता, त्याने २२ मे २०२५ रोजी त्रिमूर्ती मंगल कार्यालयातून हिरो होंडा पॅशन मोटारसायकल (क्र. एम.एच. २९, एस. ०७४१, किंमत ५०,००० रुपये) चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी ही मोटारसायकल आणि आणखी एक बजाज डिस्कव्हर मोटारसायकल (क्र. एम.एच. ३२, झेड ०९०५, किंमत ५०,००० रुपये) जप्त केली. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक शीतल मालते, पोलिस उपनिरीक्षक दीपक राणे, अंमलदार गोपाल वास्तर व सूरज चिमणे यांनी केली.

# यंदा नेर तालुक्यात उन्हाळी भुईमुगाचा पेरा घटला

### बदलत्या हवामानाचा फटका, लागवड केवळ ३१० हेक्टरवर आली!, खाद्यतेल उद्योगावर परिणाम



उमेश इंगोले
नेर (परसोपंत)
तालुका वार्तापत्र

**नेर (परसोपंत) :** नेर तालुक्यात बदलत्या हवामानामुळे उन्हाळी भुईमुगाचा पेरा ३१० हेक्टरवर आला आहे. तापमानवाढीने पीक परवडेनासे झाल्याने बाजारपेठ ओस पडली. मात्र, 'बागड ऑईल मिल'ने 'नेरच्या फल्ली तेला'ची ओळख विदर्भात कायम ठेवली आहे.

एके काळी विदर्भातील भुईमुगाची प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेर तालुक्यात, आज उन्हाळी भुईमुगाच्या लागवडीखालील क्षेत्र केवळ ३१० हेक्टरवर येऊन ठेपले आहे. गेल्या दशकात भुईमुगाचा पेरा सातत्याने कमी होत गेला असून, यामागे बदललेले हवामान आणि वाढते तापमान हे प्रमुख कारण असल्याचे शेतकरी सांगतात. तालुक्यात एकेकाळी मोठ्याप्रमाणात भुईमुगाची लागवड होत असे आणि आजूबाजूच्या तालुक्यांमधूनही शेतकरी आपल्या फल्ली शेंगा विक्रीसाठी नेरच्या बाजारात आणत असत. मात्र, आता ही ओळख पूर्णपणे पुसल्या गेली आहे.

शेतकऱ्यांच्या मते, उन्हाळी भुईमुगाची लागवड साधारणतः जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात होते आणि मार्च महिन्याच्या अखेरीस पिकाला शेंगा (घाटे) लागण्याची प्रक्रिया सुरू होते. ही पिकाच्या वाढीसाठी अत्यंत संवेदनशील अवस्था असते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून नेमके मार्च महिन्यातच तापमानाचा पारा प्रचंड वाढतो, ज्याचा थेट परिणाम शेंगा लागण्याच्या प्रक्रियेवर होतो. यामुळे उत्पादनात मोठी घट येते आणि शेतकऱ्यांना लागवडीसाठी केलेला खर्चही निघत नाही. अनेक शेतकऱ्यांनी दरवर्षी बियाणे बदलण्यासारखे वेगवेगळे प्रयोग करून पाहिले, पण त्यांना तोच निराशाजनक अनुभव आला. अखेरीस, तोट्याचा हा व्यवहार न परवडणारा ठरल्याने, बहुसंख्य शेतकऱ्यांनी भुईमूग लागवडीकडे पाठ फिरवली. या परिस्थितीमुळे जरी नेरची भुईमूग बाजारपेठ मोडकळीस आली असली, तरी शहरातील सन १९६५ पासून कार्यरत असलेल्या 'बागड ऑईल मिल'ने 'नेरच्या शुद्ध फल्ली तेला'चा नावलौकिक आणि ओळख आजही संपूर्ण विदर्भात कायम ठेवली आहे. स्थानिक पातळीवर भुईमूग उपलब्ध होत नसतानाही, ही ऑईल मिल आजूबाजूच्या इतर बाजारपेठांमधून भुईमूग शेंगा खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून आपल्या प्रसिद्ध फल्ली तेलाचे उत्पादन सुरू ठेवले आहे.

### 'नेरच्या तेला'चा सुगंध मात्र दरवळतोच

**नेरची भुईमूग बाजारपेठ संपुष्टात आली असली, तरी १९६५ पासून कार्यरत 'बागड ऑईल मिल'ने 'नेरचे शुद्ध फल्ली तेल' हा ब्रँड जिवंत ठेवला आहे. इतर बाजारपेठांतून भुईमूग खरेदी करून ते तेल उत्पादन करतात. या तेलाला संपूर्ण विदर्भात आजही मोठी मागणी असून, तीच नेरची ओळख बनली आहे.**

### हवामान बदलाचा पिकाला मोठा फटका

**मार्च महिन्यातील तापमानवाढ भुईमूग पिकासाठी मारक ठरत आहे. नेमक्या शेंगा लागण्याच्या अवस्थेत उष्णता वाढल्याने उत्पन्नात मोठी घट येते. यामुळे शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघत नाही. अनेक प्रयोग करूनही तोटाच होत असल्याने, शेतकऱ्यांनी भुईमूग लागवड करणेच सोडून दिले आहे, ज्यामुळे पेरा घटला.**

### विहिरीत मृतदेह आढळला

**पांढरकवडा, दि. ६:** शहरातील नेहरू वॉर्ड येथील रहिवासी गजानन नामदेव बंडावार (वय ५०) यांचा मृतदेह गुरुवारी (दि. ५) जून २०२५ रोजी सकाळी त्यांच्या ताडउमरी येथील शेतातील विहिरीत आढळून आल्याने खळबळ उडाली. गजानन बंडावार हे सकाही शेतावर गेले होते. मात्र, ते दुपारी १० वाजेपर्यंत परत न आल्याने त्यांचा मुलगा चेतन बंडावार शोध घेण्यासाठी गेला. तेथे वडिलांची दुचाकी, चप्पल व पाकीट विहिरीजवळ आढळल्याने त्याला शंका आली. त्याने तात्काळ पांढरकवडा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून स्थानिक तरुणांच्या मदतीने शोध घेतला असता, विहिरीत गजानन बंडावार यांचा मृतदेह आढळून आला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.